रायगड, मंगळवार, दि. ७ जानेवारी २०२५

# कृषीवल

किंमत ४ ₹

## दर मंगळवारी होणार ‘पोलखोल’

। अलिबाग । प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यातील वाचकांचं हक्काचं आणि लोकप्रिय वृत्तपत्र असलेल्या कृषीवलने कायमच कष्टकरी, कामगार, शेतकरी तसेच सर्वसामान्यांच्या हितासाठी आवाज उठविला आहे. खात्रीशीर वृत्त देण्यासाठी कृषीवल कायमच कटिबद्ध आहे.

नववर्षाच्या निमित्ताने कृषीवलमध्ये नवनवीन कॉलम सुरु करण्यात येत आहेत. वाचकांच्या मागणीनुसार हा कॉलम सुरु करण्याचा निर्णय कृषीवलने घेतला आहे. सध्याच्या परिस्थितीत भ्रष्टाचाराचं मूळ खोलवर रुजल्याचं प्रकर्षानं जाणवतं. पैशाची चणचण, बेरोजगारी, शेतीचं होणारं नुकसान, कंपन्यांनी बळकावलेल्या जमिनी, प्रकल्पग्रस्तांचे होणारे हाल, हवालदिल झालेले उपोषणकर्ते, प्रदूषणामुळे होणारा परिणाम आदी अनेक समस्यांनी रायगड जिल्ह्याला ग्रासले आहे. अशातच अनेक गैरकामांना ऊत आला आहे. सरकारी अधिकारी, प्रशासनही हात धुवून घेत आहे. प्रशासनावर, अधिकाऱ्यांच्या गैरव्यवहारावर, ठेकेदाराच्या निकृष्ट कामांवर, पोलिसांच्या हप्तेखोरीवर, कंपन्यांच्या प्रदूषणावर आता कृषीवलची नजर राहणार आहे. दर मंगळवारी पुराव्यानिशी कृषीवल पोलखोल करणार आहे. याबाबत नागरिकांनाही कोणते अनुभव आल्यास ते कृषीवलमध्ये पुरावे देऊ शकतात. समाजहिताच्या प्रश्नासाठी, न्याय मिळविण्यासाठी, तुमच्या हक्कासाठी कृषीवल कायमच तुमच्या पाठीशी ठामपणे उभे आहे. तुम्ही दिलेले पुरावे तपासल्यानंतर आपले नाव गुपित ठेवून बातमी प्रसिद्ध करण्यात येईल. – संपादक

संपर्क : राकेश लोहार - 9765610848
संतोष राऊळ - 8149696566

## तीन आरोपींना १८ पर्यंत पोलीस कोठडी

**बीड :** मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी तीन आरोपींची न्यायालयाने १८ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडीत रवानगी केली आहे. जयराम चाटे, प्रतिक घुले, महेश केदार अशी त्यांची नावे आहेत. प्रकरणातील मास्टरमाईंड सुदर्शन घुले (२६), सुधीर सांगळे (२३) या दोघांना शनिवारी पहाटे पुण्याच्या बालेवाडी भागातून अटक करण्यात आली आहे. सरपंचाची टीप देणाऱ्या सिद्धार्थ सोनवणेला कल्याणमध्ये बेड्या ठोकण्यात आल्या. तर आरोपींना पळून जाण्यासाठी मदत करणारा डॉ. संभाजी वायबसे याला पत्नीसह नांदेडातून ताब्यात घेण्यात आले.

# नक्षलींचा भ्याड हल्ला

## नऊ जवान शहीद, सहा गंभीर जखमी

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

छत्तीसगडमधील विजापूरमध्ये नक्षलवाद्यांनी सुरक्षा दलाच्या वाहनावर सोमवारी (दि.६) दुपारी भ्याड हल्ला केला. सुरक्षा दलाच्या वाहनाला आयईडीने लक्ष्य केले. या स्फोटात भारतीय लष्कराच्या आठ जवानांसह एक चालक शहीद झाला आहे. तर, सहाहून अधिक जवान गंभीर जखमी झाले आहेत, अशी माहिती बस्तरच्या पोलीस अधीक्षकांनी दिली आहे.

सोमवारी (दि.६) दंतेवाडा, नारायणपूर आणि विजापूरचे संयुक्त ऑपरेशन पूर्ण करून परतत असताना विजापूर जिल्ह्यातील कुत्रु-बेद्रे रस्त्यावर नक्षलवाद्यांनी हा घातपात केला. •➤पान २ वर



“जवानांच्या मृत्यूच्या वृत्ताने मला अत्यंत दु:ख झाले आहे. मी शूर जवानांच्या कुटुंबियांप्रती मनापासून संवेदना व्यक्त करत श्रद्धांजली अर्पण करतो. हे दु:ख शब्दात मांडणे अशक्य आहे. पण, आपल्या जवानांचे बलिदान व्यर्थ जाणार नाही, याची मी खात्री देतो. तसेच मार्च २०२६ पर्यंत आम्ही भारतीय भूमीतून नक्षलवाद संपवू, असे देशवासियांना अश्वस्त करतो.
– अमित शह, केंद्रीय गृहमंत्री”

### ■ सरकार झुकणार नाही

जेव्हा जेव्हा सरकार नक्षलवाद्यांविरोधात अशा प्रकारेचे मोठे ऑपरेशन करते तेव्हा नक्षलवादी अशा प्रकारचे भ्याड हल्ले करतात, असे छत्तीसगडचे विधानसभा अध्यक्ष रमन सिंह यानी म्हटले आहे. नक्षलवादाच्या विरोधात छत्तीसगड सरकारने आक्रमक मोहीम सुरु केली आहे. तिचा वेग आणखी वाढविला जाणार आहे. सरकार अशा भ्याड हल्ल्यांना घाबरणार नाही. त्यांच्या विरोधात कठोर कारवाई सुरु राहील, असेही ते यावेळी म्हणाले.

### ■ हल्ल्याचा निषेध

नक्षलवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्याची माहिती विजापूरमधून आली आहे. मी शहीद जवानांच्याबद्दल शोक व्यक्त करतो. हा भ्याड हल्ला आहे. नक्षलवाद्यांना जवान संपवण्याच्या दिशेने काम करीत आहेत असे छत्तीसगडचे उपमुख्यमंत्री अरुण साओ यांनी म्हटले आहे.

## वे|ध|क

### आरोपपत्र दाखल

**मुंबई :** राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते, माजी मंत्री बाबा सिद्धीकी यांच्या हत्या प्रकरणात अखेर मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने सोमवारी (दि. ६) आरोपपत्र दाखल केले आहे. मुंबई सत्र न्यायालयातील विशेष मोक्का न्यायालयात तब्बल ४५९० पानी आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे. त्यामध्ये एकूण १८० साक्षीदारांची नावे दाखल आहेत. तर, १८० बीएनएसएस ७४ रेकॉर्ड केलेले स्टेटमेंट, बीएनएसएस १४ अंतर्गत रेकॉर्ड केलेले स्टेटमेंट यासह गुन्ह्याच्या वेळी वापरलेली पाच हत्यारे व सहा मॅगझीन आणि ८४ राऊंड यांचा समावेश आहे.

### बाजार घसरला

**मुंबई :** आठवड्याच्या पहिल्या दिवशी शेअर बाजार आणि निफ्टीने ग्रीन झोनमध्ये दैनंदिन व्यवहार सुरू केले. सुरुवातीचा काही काळ दोन्ही निर्देशांक वधारले आणि मुंबई शेअर बाजाराच्या निर्देशांकात २८० अंकांची वाढ पाहायला मिळाली होती. तर, निफ्टी ८५ अंकांनी वधारलेला पाहायला मिळाला. मात्र, अवघ्या दोन तासांतच चित्र पलटले. निर्देशांकातील ३० शेअर्सचा निर्देशांक ८४९.५० (१.०७ टक्के) च्या मोठ्या घसरणीसह ७८,३७३.६१ च्या पातळीवर पोहोचला. तर निफ्टीदेखील तो २६६.५० अंक (१.११ टक्के) घसरून २३,७३८.२५ च्या स्तरावर पोहोचला. या घसरणीदरम्यान टाटा स्टीलचा शेअर सर्वात अधिक घसरला.

### प्रजासत्ताकदिनी राष्ट्रध्वज कोण फडकवणार?

## तटकरे, गोगावले की अन्य कोण?

**रायगडकरांच्या लागल्या नजरा**

। रायगड । खास प्रतिनिधी ।

राज्यात महायुतीचे सरकार आता बऱ्यापैकी विसावले आहे. मंत्रिमंडळ विस्तार आणि त्यांना खात्यांचे वाटपही झाले आहे. मात्र, अद्यापही पालकमंत्रीपदाचा तिढा कायम आहे. त्यामध्ये प्रामुख्याने रायगडचा पालकमंत्री कोण, हा प्रश्न रायगडवासियांना सतावत आहे. प्रजासत्ताक दिन जवळ येत आहे. प्रथेनुसार पालकमंत्र्यांच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकवण्यात येतो. रायगडच्या पालकमंत्रीपदासाठी रोजगार हमी व फलोत्पादन मंत्री भरत गोगावले अथवा महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे की अन्य कोणाचे नाव पुढे येते, याकडे रायगडवासियांचे लक्ष लागले आहे.

राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये पालकमंत्र्यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. भाजपा, शिंदे शिवसेना आणि अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यामध्ये काही नावांवर अद्याप एकमत न झाल्याने पालकमंत्री कोण याचे भिजत घोंगडे पडले आहे.



जिल्ह्यावर एकहाती एकाधिकारशाही गाजवता येते, सर्व यंत्रणा पालकमंत्र्यांच्या इशाऱ्यावर सहज काम करतात. त्यामुळे पालकमंत्रीपदाचे महत्त्व अधोरेखित होते. महाविकास आघाडी सरकारच्या कालावधीत पालकमंत्रीपदावर आदिती तटकरे यांचीच वर्णी लागली होती. तटकरे यांच्यावाढत्याहस्तक्षेपालाकंटाळून जिल्ह्यातील तीन आमदारांनी तटकरे यांच्याविरोधात बंड केले होते. त्यानंतर राज्यात सत्तांतर झाले. पुढे पालकमंत्रीपदाची जबाबदारी शिंदे •➤ पान २ वर

## रायगडकरांना भरली हुडहुडी

। अलिबाग । वार्ताहर ।

रायगड जिल्ह्यासह राज्यभरात उत्तरेकडील वाऱ्यामुळे चांगलाच गारठा वाढायला सुरुवात झाली आहे. गेल्या काही दिवसांपासून गायब झालेली थंडी पुन्हा सुरु झाली असून अनेक भागात किमान तापमानात घसरण झाली आहे. येत्या काही दिवसात थंडीचा जोर आणखी वाढणार असून, तापमान १ ते ३ अंशांनी खाली जाण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. जिल्ह्यात पहाटे पारा २० अंशांवर आल्याने रायगडकर गारठले आहेत. आधीच रायगडकर थंडीचा आनंद घेत असताना काही दिवसांपूर्वी थंडी कमी झाली होती. मात्र, पुन्हा बदलेल्या वातावरणामुळे थंडीचा जोर वाढला आहे.

## निर्यातीमध्ये जिल्ह्याचे योगदान ५१,७०० कोटींचे

। रायगड । खास प्रतिनिधी ।

निर्यातीमध्ये महाराष्ट्राचे ५ लाख ५६ हजार कोटी एवढे योगदान आहे. त्यात जिल्ह्याचे ५१ हजार ७०० कोटींचे योगदान आहे. जिल्ह्यात एक लाखापेक्षा जास्त उद्योजकांनी उद्योजकता प्रशिक्षण घेतले आहे. मरीन आणि फिशिंगसाठी जिल्ह्यात इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट करण्यासाठी विशेष प्रयत्न करणार असल्याचे जावळे यांनी सांगितले. गणपती क्लस्टर व बांबू क्लस्टर या दोन महत्त्वाच्या योजनांवर जिल्ह्यात काम सुरु आहे, असे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी सांगितले.

राज्याच्या निर्यात क्षेत्रात जिल्ह्याचा वाटा ९.३ टक्के आहे. ते प्रमाण वाढवण्यासाठी, जिल्ह्यात निर्यात क्षेत्रास प्रोत्साहन देण्यासाठी तसेच रोजगारनिर्मितीचे लक्ष साध्य करण्यासाठी आणि निर्यातवाढीच्या उपक्रमाला प्रोत्साहन देण्यासाठी निर्यात प्रचालन कार्यशाळा उपयुक्त आहे, असे जावळे •➤ पान २ वर



- ■ मरीन, फिशिंगसाठी जिल्ह्यात इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंटसाठी प्रयत्न
- ■ जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते निर्यात प्रचालन कार्यशाळेचे उद्घाटन

## कत्तलीसाठी नेणाऱ्या गुरांची सुटका

। कर्जत । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील पिंपळपाडा गावाच्या बाजूकडून साळोख गावाकडे गुरे कत्तल करण्यासाठी घेऊन जाणारा टेम्पो पोलिसांच्या सतर्कमुळे पकडण्यात आला. कर्जत पोलिसांनी याबाबत गुन्हा दाखल केला असून, ४ लाख २२ हजारांचा ऐवज जप्त करुन जनावरांची सुटका केली आहे. याबाबत पुढील तपास कर्जत पोलीस करीत आहेत.

गुरांची चोरी करून कत्तलीसाठी जाणारा टेम्पो कर्जत पोलिसांनी पकडला याबाबतची घटना अशी कर्जत पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचारी लालासो तोरवे आणि पोलीस कर्मचारी राहूल जाधव हे ६ जानेवारी रोजी पहाटे साडेचारच्या वाजता कर्जत पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालीत असताना एक टेम्पो त्यांना संशयास्पद आढळला. त्यांनी तो अडवला. टेम्पोची तपासणी केली असता टेम्पोमध्ये गुरे आढळली.



- ■ टेम्पासह चार लाखांचा ऐवज जप्त
- ■ कर्जत पोलिसांची कामगिरी

टेम्पोमध्ये एकूण सात गोवंश जातीची जनावरे आढळली. ही गुरे चोरी करून साळोख गावाकडे घेऊन जाताना पोलिसांना मिळाली. पोलिसांनी टेम्पो •➤ पान २ वर

## डोक्यात नारळ पडून एकाचा दुर्दैवी मृत्यू

। मुरुड । प्रतिनिधी ।

मुरुड समुद्रकिनारी शहाळे खरेदी करण्यासाठी गेले असताना राजपुरी गावातील ४८ वर्षांच्या इसमाचा डोक्यात नारळ पडल्याने दुर्दैवी मृत्यू झाला. जयेश पांडुरंग गीते असे या मृत इसमाचे नाव आहे. राजपुरी येथील शिव मंदिरामध्ये अभिषेक पूजेसाठी शहाळे खरेदी करण्यासाठी गेले असता ही घटना घडली. यामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.



रविवारी (दि. ५) सायंकाळच्या सुमारास मुरुड समुद्रकिनारी श्रीयश रुग्णालयाच्या बाजूला असलेल्या चंदन खोत यांच्या शहाळे स्टॉलवरून शहाळे खरेदी करून निघण्याच्या तयारीत असताना येथे असलेल्या ९० फूट उंच नारळाच्या झाडावरून वेगाने नारळ डोक्यात पडल्याने जयेश तिथल्या तिथेच जागीच गतप्राण झाला. या दुर्दैवी घटनेनंतर संपूर्ण मुरुड तालुक्यासह राजपुरी गावात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

## शेतीच्या वादातून तिघांची हत्या, दोघे गंभीर

। संभाजीनगर । प्रतिनिधी ।

येरमाळ्यातील बावी गावात एक धक्कादायक घटना घडली आहे. रविवारी रात्री येथील पारधी समाजातील दोन गटात शेतीच्या वादातून जबरदस्त हाणामारी झाली. या घटनेत तीन जणांचा मृत्यू झाला असून, दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार या घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांची नावे ही आप्पा काळे, सुनील काळे आणि वैजनाथ काळे अशी आहेत. तर जखमींना तातडीनं रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

पोलिसांनी घटनेचा तपास सुरू केला असून प्राथमिक माहितीनुसार, शेतीच्या वादातून हाणामारी झाली असल्याचं सांगण्यात येत आहे. चौकशीसाठी पोलिसांनी दोन्ही गटातील दहा जणांना ताब्यात घेतल्याचंही कळतं आहे.

## अल्पवयीन मुलीवर अत्याचार

### रेवदंड्यात मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर

। अलिबाग । प्रतिनिधी ।

रेवदंडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून तिला गरोदर ठेवल्याचा प्रकार घडला. या घटनेने परिसरात संतापाची लाट उसळली आहे. रेवदंडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत अशा प्रकारच्या घटना वाढत असल्याने महिला, मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

पीडित अल्पवयीन मुलीशी मैत्री करून तिच्याशी शारीरिक संबंध ठेवले. तिच्या अज्ञानपणाचा फायदा घेऊन केलेल्या प्रकारामुळे ती मुलगी गरोदर राहिली. याप्रकरणी रेवदंडा पोलीस ठाण्यात अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अल्पवयीन मुलीशी केलेल्या या कृत्याबाबत परिसरात खळबळ उडाली आहे. मागील काही दिवसांपूर्वी कोर्लई परिसरातील एका मुलीवर अत्याचार केल्याचा प्रकार घडला होता. ही घटना घडून अनेक दिवस उलटून गेले. त्यानंतर पुन्हा अशाच प्रकारची घटना घडल्याने सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. रेवदंडा पोलिसांचा असे कृत्य करणाऱ्यांवर धाक राहिला नसल्याची चर्चा जोरात सुरु आहे. मागील वर्षभरासून जिल्ह्यातील अनेक भागात अल्पवयीन मुलींवरील अत्याचाराच्या घटना घडल्या आहेत. पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत. परंतु, त्यावर अंकुश ठेवण्यास पोलीस अपयशी ठरल्याची प्रतिक्रिया जनमानसातून उमटत आहे.

### बंगळुरूमध्ये आढळला दुसरा रुग्ण | तीन चिमुकल्यांना विषाणूची लागण

## मानवी मेटान्यूमोचा भारतात शिरकाव

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

चीनमध्ये एचएमपीव्ही व्हायरसने धुमाकूळ घातला आहे. या व्हायरसने आता भारतातही हातपाय पसरायला सुरुवात केली आहे. देशात नवी मेटान्यूमो व्हायरसचे (एचएमपीव्ही) तीन रुग्ण आढळले आहेत. दोन रुग्ण कर्नाटकात, तर एक रुग्ण गुजरातमध्येही आढळला आहे. कर्नाटकात एका आठ महिन्यांच्या मुलाला आणि तीन महिन्यांच्या मुलीला व्हायरसची लागण झाली आहे. तर अहमदाबादमध्ये दोन महिन्यांच्या मुलाला लागण झाली आहे. त्यामुळे भारतातही आरोग्य प्रशासन अलर्ट मोडवर आले आहे.



भारतातील या व्हायरससंबंधी परिस्थितीबद्दल माहिती देताना केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने निवेदन जारी केले आहे. ज्यामध्ये एचएमपीव्ही भारतासह जागतिक स्तरावर आधीपासूनच प्रसारित झाला आहे आणि विविध देशांमध्ये एचएमपीव्हीशी संबंधित श्वसन आजारांची प्रकरणे नोंदवली गेली आहेत, अशी माहिती देण्यात आली आहे. या संक्रमणावर लक्ष ठेवले जात असताना भारतातही याची तीन प्रकरणे आढळून आली आहेत. या तिन्ही रुग्णांनी कुठलाही आंतरराष्ट्रीय प्रवास केलेला नाही, म्हणजेच भारतात आढळलेल्या संक्रमणांचा चीनमधील संसर्गाच्या वाढलेल्या प्रकरणाशी काहीही संबंध नाही, असेही या निवेदनात सांगण्यात आले आहे.

भारतात एचएमव्हीपी संसर्ग हा बॅप्टिस्ट हॉस्पिटल-बेंगळुरूमधील एका तीन महिन्याच्या मुलीला आणि आठ महिन्याच्या मुलाला झाल्याचे आढळून आले आहे. दोन्ही मुलांमध्ये न्यूमोनियाची लक्षणे आढळून आली होती, त्यानंतर सध्या मुलीला डिस्चार्ज देण्यात आला असून, मुलावर उपचार केले •➤ पान २ वर

### लक्षणे काय?

ह्युमन मेटापन्यूमो व्हायरस (एचएमपीव्ही) सामान्य सर्दी आणि कोरोना व्हायरससारखी लक्षणे दर्शविते. त्यामध्ये खोकला, ताप व सर्दी यांसारख्या लक्षणांचा समावेश आहे. कोविड-१९ नंतर पाच वर्षांनंतर ह्युमन मेटापन्यूमो व्हायरस (एचएमपीव्ही)चा प्रादुर्भाव चीनच्या अनेक भागांमध्ये वाढत आहे, ज्यामुळे अधिकारी चिंतेत आहेत. परिणामी, अधिकारी लोकांना मास्क घालणे आणि वारंवार हात धुणे यांसारखी खबरदारी घेण्याचे आवाहन करीत आहेत.

### ह्युमन मेटापन्यूमो व्हायरस काय आहे?

ह्युमन मेटापन्यूमो व्हायरस (एचएमपीव्ही) हा आरएनए विषाणू आहे, जो न्यूमोव्हिरिडे कुटुंबातील मेटाप्युमोव्हायरस वंशातील आहे. २००१ मध्ये डच संशोधकांनी सर्वात पहिल्यांदा याचा शोध लावला होता. हा विषाणू श्वसन संक्रमणास कारणीभूत ठरतो. एचएमपीव्ही प्रामुख्याने खोकताना आणि शिंकताना बाहेर काढलेल्या श्वसनाच्या थेंबांद्वारे पसरतो. संक्रमित व्यक्तींच्या जवळच्या संपर्कातून किंवा दूषित वातावरणाच्या संपर्कातूनदेखील या विषाणूचे संक्रमण होऊ शकते.

### रुग्णाला बघायला आल्या नि पडल्या....

## दोन महिलांच्या पायाला फ्रॅक्चर

। रायगड । खास प्रतिनिधी ।

अलिबाग येथील जिल्हा सरकारी रूग्णालयात रुग्णांना भेटायला आलेल्या महिला पाय घसरुन पडल्याची घटना घडली. रुग्णालयातील बाथरुममध्ये पाणी साचल्याने सदरचे ठिकाण निसरडे झाले आहे. दोन्ही महिलांवर उपचार करण्यात येत आहेत. जिल्हा सरकारी रूग्णालयाची अवस्था बिकट असल्याची माहिती मनसेचे शॅडो कॅबिनेट सदस्य देवव्रत पाटील यांनी दिली. हे प्रकरण समोर आणून त्यांनी रुग्णालयातील परिस्थिती दाखवली आहे.

सोमवारी (दि. ६) रूग्णालयात एक आजी आणि एक तरूण महिला दुसऱ्या मजल्यावरील विभागात रुग्णांना भेटण्यासाठी आल्या होत्या. त्यावेळी तेथील दोन वेगवेगळ्या बाथरूममध्ये पाणी साचले होते. त्या ठिकाणी पाणी साचल्याने सदरची जागा निसरडी झाल्याने त्यांचा पाय घसरुन त्या पडल्या. त्यांच्या पायाला फॅक्चर झाले असल्याचे पाटील यांनी सांगितले.




अपघात विभागातून पेशंट वॉर्डमध्ये नेण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या व्हिलचेअरची दुरवस्था झाली आहे. त्या दोन्ही चेअरला फूटरेस्ट नाही आणि त्यामुळे पेशंट बसल्यानंतर त्यांना आपले पाय सांभाळणं जास्त जिकिरीचं होत असल्याकडेही पाटील यांनी लक्ष वेधले. •➤ पान २ वर

# ‘पत्रकार हा समाजाचा मोठा घटक’

## पत्रकारदिनी पत्रकारांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव



। चिरनेर । प्रतिनिधी ।

**पत्रकारितेच्या माध्यमातून समाजामध्ये जी जडणघडण होते, जी प्रगती होते, ती कायमस्वरूपी वृत्तपत्राच्या माध्यमातून समाजामध्ये मांडण्याचे काम ही पत्रकार मंडळी करत असतात. पत्रकार हा समाजाचा मोठा घटक आहे, असे प्रतिपादन वीर वाजेकर कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य अमोद ठक्कर यांनी केले.**

मराठी वर्तमानसृष्टीचे जनक दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या २१३ व्या जयंती व महाराष्ट्र शासन वाचन पंधरवडा अंतर्गत, फुंडे येथील वीर वाजेकर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या सभागृहात सोमवार (दि.६) रोजी केलेल्या आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. याप्रसंगी पत्रकारांना सन्मानचिन्ह देऊन महाविद्यालयाच्या वतीने गौरविण्यात आले.

यावेळी व्यासपीठावर ज्येष्ठ पत्रकार प्रदीप पाटील, जगदीश तांडेल, अजित पाटील, सूर्यकांत म्हात्रे, दत्तात्रेय म्हात्रे, पंकज ठाकूर, दिनेश पवार, राजकुमार भगत, जीवन केणी, महेश भोईर, मिलिंद खारपाटील तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.

यापुढे बोलताना अमोद ठक्कर यांनी, बाळ रडल्याशिवाय आई त्याला दूध पाजत नाही. तसेच समाजातील ज्या काही चांगल्या वाईट घटना आहेत. त्या घटना पत्रकारांनी वर्तमानपत्रातून मांडल्याशिवाय त्यावर आवाज उठत नाही. अर्थात, वस्तुस्थिती जशी आहे तशी मांडणे यामध्ये खूप कष्ट असतात.आज वाचन संस्कृती महत्त्वाची असून, ती सर्वांमध्ये रुजली पाहिजे. यातून तुम्ही करिअरसुद्धा घडवू शकता. पत्रकारिता ही समाज परिवर्तनाची मोठी ताकद आहे. तुम्हीही या क्षेत्रात पुढे या. तुमचे आयुष्य उज्ज्वल करण्यासाठी पत्रकारिता एक करिअर म्हणून निवडा. ते समाजासाठी उपयुक्त ठरेल. असे सांगून आज पत्रकारदिनी आमच्या महाविद्यालयातर्फे आपला सन्मान करण्याचा संधी आम्हाला मिळाली, याचे आम्हाला समाधान वाटते.

प्राध्यापक गजानन चव्हाण यांनी आपले मनोगत व्यक्त करताना, समाजातील मुकेपणाला बोलतं करण्याचे काम पत्रकार करत असतात. आपल्या समाजामध्ये परिपूर्ण लोकशाही नांदायची असेल तर तुमच्या कार्याचे महत्त्व हे फार मोठे आहे. पत्रकारितेचा हा प्रवाह असाच सतत प्रवाहित राहावा, आणि यातून समाजाचे प्रश्न मार्गी लागावेत, असे आवाहन केले. सूत्रसंचालन प्रा. चिंतामण दिनदळे यांनी केले. तर आभार प्रा. नेवरे यांनी व्यक्त केले.

# पत्रकार दिनानिमित्त रुग्णांना फळांचे वाटप

## • माणगाव तालुका पत्रकार संघाचा स्तुत्य उपक्रम



। माणगाव । प्रतिनिधी ।


माणगाव तालुका पत्रकार संघातर्फे पत्रकार दिन मोठया उत्साहात व विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला. सालाबादप्रमाणे यावर्षीही तालुका पत्रकार संघातर्फे उपजिल्हा रुग्णालय माणगाव येथे सोमवार, दि.६ जानेवारी रोजी पत्रकार दिनानिमित्त औषध व फळवाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

औषध व फळ वाटप कार्यक्रम माणगाव नगरीच्या नगराध्यक्षा शर्मिला सुर्वे, राजिपचे माजी शिक्षण व आरोग्य समिती सभापती ज्ञानदेव पवार, उद्योजक रामनारायण मिश्रा, उद्योजक मंगेश पोळेकर, माजी सभापती संगीता बक्कम, उपनगराध्यक्षा हर्षदा काळे, नगरसेविका ममता थोरे, भाजपच्या संयोजिका शर्मिला सत्वे, सामाजिक कार्यकर्त्या सुवर्णा जाधव, आदर्श शिक्षक शंकर शिंदे, व्यापारी असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष लक्ष्मण दळवी, तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष सलीम शेख, कार्याध्यक्ष प्रभाकर मसुरे, उपाध्यक्ष मजिद हाजीते, पत्रकार संघाचे मार्गदर्शक विजय मेथा, सल्लागार सुभाष दळवी, आजेश नाडकर, पत्रकार स्वप्न साळुंके, आरोही सुर्वे, व्यापारी निलेश लिलाचंद शेट व मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी माणगाव उपजिल्हा रुग्णालयाच्या प्रभारी वैद्यकीय अधीक्षक अरुणा पहुरे, आदर्श शिक्षिका विनया जाधव यांनी पत्रकार संघाच्या कार्याचा गौरव करीत पत्रकारांना पत्रकार दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पत्रकार संघाचे अध्यक्ष सलीम शेख यांच्या मार्गदर्शनाखाली मजिद हाजिते, कार्याध्यक्ष प्रभाकर मसुरे, मार्गदर्शक विजय मेथा, सल्लागार सुभाष दळवी, आजेश नाडकर, स्वप्ना साळुंके, भालचंद्र खाडे, संजय गांधी आदींसह संघटनेच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांनी सहकार्य करीत परिश्रम घेतले.

# पालिकेच्या स्वच्छतागृहाची दुर्दशा

## • नागरिकांसह पर्यटकांना मुरडावी लागताहेत नाके



। मुरुड जंजिरा । वार्ताहर ।

मुरुडला सुंदर शहरासाठी २०१८ साली राज्याचा स्वच्छता पुरस्कार (रोख रक्कम ३ कोटी) आहे. परंतु, आज याच सुंदर शहर म्हणून गौरविण्यात आलेल्या मुरुडच्या बाजारपेठेतील बस स्थानकासमोरील पालिकेच्या स्वच्छतागृहाची अवस्था दयनीय झाली आहे. त्यामुळे स्थानिक नागरिकांसह पर्यटकांनाही नाके मुरडत माघारी फिरावे लागत आहे.

रिक्षा स्टँडशेजारी असल्याने मुरुडला येणार पर्यटक या स्वच्छतागृहाचा वापर करतात. परंतु या स्वच्छतागृहांचे दरवाजे तुटलेले असून, त्यांची दुरवस्था झाली आहे. अनेक पर्यटकांनी व नागरिकांनी तक्रार करूनही याची दुरुस्ती होत नाही, याबाबत संताप व्यक्त होत आहे.

मुरुडची बाजारपेठ म्हणजे इतिहासाची साक्ष देणारी आहे. नाबाबकाळापासून या आझाद चौकात अनेक आंदोलने झालीत. अशा चौकातील स्वच्छतागृहाची ही दशा का झाली, असा प्रश्न विचारला जात आहे. पालिकेच्या आरोग्य निरीक्षक राकेश पाटील यांना याबाबतची माहिती देण्यात आली. यावर ते म्हणाले, मुरुड मध्ये कोळीवाड्यातदेखील हीच परिस्थिती आहे. स्वच्छतागृहाचे दरवाजे तुटले आहेत. त्यांचे दुरुस्तीचे काम लवकरच सुरू करण्यात येईल.

ते म्हणाले की, पूर्वी स्वच्छतागृहांची निगा राखण्याचे काम पालिकेचे कर्मचारी करत असत; परंतु पालिका कर्मचारीकपातीमुळे अनेक कर्मचारी कमी केले, त्यामुळे अशा सार्वजनिक ठिकाणी मालमतेचे नुकसान होत आहे. दरम्यान, शासनाने तातडीने कर्मचारी नियुक्त करून स्वच्छतागृह अद्ययावत करुन पर्यटक व नागरिकांना उत्तम सेवा द्यावी, अशी मागणी होत आहे.

# नेत्रचिकित्सा शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद



। पनवेल । प्रतिनिधी ।

लायन्स क्लब ऑफ पनवेल, न्हावा शेवा कंटेनर ऑपरेटरर्स वेलफेअर असोसिएशन, लायन्स क्लब ऑफ वाळकेश्वर, मुंबई आयोजित ५५ वे मोफत नेत्रचिकित्सा शिबीर आयोजित करण्यात आले होते. यात विनामूल्य मोतीबिंदू शस्त्रक्रिया व अल्पदरात चष्मे वाटप करण्यात आले. या शिबिराला माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या.

लायन्स क्लब आपल्या अविरत सेवेमध्ये यंदा ६० व्या वर्षात पदार्पण करीत आहे. यांच्या माध्यमातून आजपर्यंत केलेला सर्व सामाजिक कार्याबद्दल त्यांचेसुद्धा आभार मान्यण्यात आले. यावेळी पनवेल महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांच्यासोबत अन्य मान्यवर उपस्थित होते.

**asREC (India) Limited**

बिल्डिंग क्र. २, युनिट क्र. २०१-२०२ए आणि २००-२०२बी, तळ मजला, सॉलिटेअर कॉर्पोरेट पार्क, अंधेरी-घाटकोपर लिंक रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई- ४०००९३.

**शुद्धिपत्रक**

दिनांक ०३.०१.२०२५ रोजी कृषीवल (रायगड) या वृत्तपत्रात प्रकाशित मे. सी. के. एंटरप्रायझेस व इतर यांच्या सिक्युरिटायझेशन अ‍ॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अ‍ॅसेटस् अ‍ॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८(६) आणि नियम ९ अंतर्गत स्थावर मत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचनेमध्ये दुसऱ्या परिच्छेद मधील दिनांक ३१.०१.२०२१ ऐवजी ३०.०१.२०२१ अशी वाचावी.

इतर मजकुर अपरीवर्तीत राहील.

**दिनांक : ०७.०१.२०२५** **सही/-**
**ठिकाण : मुंबई** **प्राधिकृत अधिकारी,**
**एएसआरईसी (इंडिया) लि.**

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

**ई निविदा सूचना क्रमांक ५८/२०२४-२०२५ (मुंबई)**

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | महाड औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा व सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरुस्ती.. महाड औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेच्या जलशुद्धीकरण केंद्र व विविध ठिकाणच्या एलटी पॅनेलची दैनंदिन देखभाल दुरूस्ती वार्षिक तत्वावर सुटे भाग व किरकोळ साहित्यासह करणे. (तिसरी मागणी) | ₹ १३,१६,०४३.०० |

उपरोक्त कामाचे निविदा प्रपत्र दिनांक ०६/०१/२०२५ ते दिनांक १३/०१/२०२५ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक ०७/०१/२०२५ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण/महामंडळाचा खुलासा दिनांक ०८/०१/२०२५ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

## पान १ वरून

### नक्षलींचा भ्याड हल्ला

नक्षलवाद्यांनी कुत्रू पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आंबेली गावाजवळ दुपारी २ वाजून १५ मिनिटांनी आयईडीचा स्फोट करून सुरक्षा दलाचे वाहन उडवले. यामध्ये आठ दंतेवाडा डीआरजी जवान आणि एक ड्रायव्हर यांचा मृतांमध्ये समावेश आहे. रविवारी पखंजूरमध्ये सुरक्षा दलाने पाच नक्षलवाद्यांचा खात्मा केला होता. आज पंखजूर येथून नक्षलविरोधी संयुक्त मोहीम राबवून जवान परतत होते. नक्षलवाद्यांनी बिजापूरच्या कुत्रू रोडवर जवानांचक वाहन आयईडीचा स्फोटने उडवले. दंतेवाडामध्ये संयुक्त मोहीम राबवून हे जवान छावणीत परत येत होते. यावेळी हा स्फोट घडवून आणल्याचे बस्तरचे पोलीस महानिरीक्षक सुंदरराज पी. यांनी दिला आहे. घटनास्थळी बचावकार्य सुरू आहे. अनेक डीआरजी कर्मचारी पिकअपमध्ये होते. असे सांगितले जात आहे की, आयईडी हा सुमारे तीन किलो वजनाचा स्फोटक होता. हा स्फोट एवढा भीषण होता की, जवानांच्या वाहनाचे तुकडे झाले. सहा जवान गंभीर जखमी झाले आहेत. यामुळे मृतांची संख्या वाढण्याची भीती व्यक्त होत आहे.

### तटकरे, गोगावले की अन्य कोण?

शिवसेनेचे उदय सामंत यांच्याकडे आली.

२०२४ च्या निवडणुकीत महायुतीने महाविकास आघाडीला धूळ चारली खरी; मात्र अद्यापही मंत्र्यांचे खातेवाटप, पालकमंत्री यावरुन सातत्याने धुसफूस सुरु आहे. सध्या रोजगार हमी व फलोत्पादन मंत्री भरत गोगावले आणि महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांच्यामध्येच सुप्त संघर्ष सुरु आहे. दोघांच्या समर्थकांकडून दावा करण्यात येत आहे. मात्र, अद्याप कोणाचेच नाव जाहीर करण्यात आलेले नाही. आयत्या वेळी मंत्री गोगावले आणि मंत्री तटकरे यांच्या नावांव्यतिरिक्त अन्य कोणाचे नाव पुढे येते का, हा प्रश्न आहे. तसे झाल्यास दोघांच्या समर्थकांसाठी हा फार मोठा झटका ठरणार आहे.

### निर्यातीमध्ये जिल्ह्याचे योगदान ५१,७०० कोटींचे

यांनी सांगितले.

जिल्हा नियोजन भवन येथे सोमवारी (दि. ६) जिल्हा उद्योग केंद्रामार्फत आयोजित एकदिवसीय निर्यात प्रचालन कार्यशाळेचे उद्‌घाटन झाले. त्याप्रसंगी ते बोलत होते.

पांढ्या कांद्याला जीआय मानांकन मिळाले आहे. पांढरा कांद्याचे उत्पादन क्षेत्र पूर्वी २५० हेक्टर होते ते यावेळी ५०० हेक्टरपर्यंत वाढवले आहे. पुढे १ हजार हेक्टर करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. बांबू क्लस्टरच्या माध्यमातून या यावर्षी मनरेगा योजनेमध्ये एक कोटी बांबू रोपे तयार करण्याचा मानस असल्याकडे जावळे यांनी लक्ष वेधेले.

असोसिएशन, उद्योजक यांच्यासोबत बँकर्स आणि शासकीय अधिकारी हे एकमेकांमध्ये समन्वय साधत चांगल काम करत आहे, चांगला प्रतिसाद देत आहेत. निर्यात क्षेत्रातही महाराष्ट्राने मोठी झेप घेतली असून, महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर आहे, असे सहसंचालक विजू शिरसाठ यांनी सांगितले. चालू वर्षामध्ये निर्यातीमधील जिल्ह्याचे योगदान वाढविण्याच्या दृष्टीने काम करु. या निर्यातीला प्रोत्साहन देण्यासाठी उद्योजकांना इन्फ्रास्टक्चर, स्टँप ड्युटी, वीज बील आदी बाबींवर देण्यात येणाऱ्या इन्सेटीव्हीची माहिती त्यांनी दिली.

उद्योजकांना कोणतीही अडचण असेल तर त्यांनी कार्यालयाशी संपर्क साधावा, शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ सर्व उद्योजकांनी घ्यावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. जिल्ह्यातील उद्योजक, नवउद्योजक यांना जिल्हा उद्योग केंद्रामार्फत देण्यात येणाऱ्या विविध सुविधा, त्यांच्यासाठी राबविण्यात येणारे विविध उपक्रम, शासनाच्या विविध योजनांची माहिती त्यांनी दिली.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्ज्वलन करुन करण्यात आली. याप्रसंगी कोकण विभागाच्या सहसंचालक विजू शिरसाठ, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक गुरुशांत हरळय्या, लीड बँकेचे महाव्यवस्थापक कुलकर्णी, संयुक्त संचालक जनरल ऑफ फॉरेन ट्रेड डिजीएफटी प्रवीण कुमार, मुख्य वित्त अधिकारीचे प्लेक्स कौन्सिल मुंबई हर्षद साळवी, व्यवस्थापन कार्यकारी अधिकारी रिषू मिस्त्रा, उपसंचालक प्रादेशिक विभागाचे अधिकारी टी.आर. गिबिनकुमार, एमअसाके सीफूड इंडस्ट्रीज अधिकारी मनिषा कोळी, सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम घटक निर्यातदार, निर्यातक्षम उद्योजक, नवउद्योजक, औद्योगिक संस्था व संघटना, औद्योगिक समूह, औद्योगिक वसाहती, शेतकरी सहकारी संस्था व उत्पादक, प्रक्रिया उत्पादक, केंद्र व राज्य शासनाचे तसेच संबंधित उपक्रमाचे अधिकारी, जिल्हा निर्यात प्रचालन समितीचे सदस्य, निर्यात संबंधित कामकाज करणारे घटक उपस्थित होते.

### कत्तलीसाठी नेणाऱ्या गुरांची सुटका

कर्जत पोलीस ठाण्यात आणून गुरे चोरणाऱ्यांवर कारवाई केली. यामध्ये अजय चंद्रकांत चवर (२०) व महेश अंकुश हीलम (१९) दोघेही रा. साळोख यांना ताब्यात घेतले असून, यामधील दोन अज्ञात इसम फरार आहेत.

दरम्यान, सात गोवंश जातीची जनावरे व टेम्पो असा एकूण ४ लाख २२ हजारांचा ऐवज पोलिसांनी जप्त केला आहे. जनावरांना नजीकच्या गोशाळेत पाठवण्यात आले आहे. पुढील तपास कर्जत पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हावलदार लालासो तोरवे करीत आहेत.

### दोन महिलांच्या पायाला फ्रॅक्चर

जनतेला रुग्णालयात चांगल्या प्रकारे सुविधा मिळाव्यात म्हणून मनसे सतत प्रयत्न करत राहील, असेही ते म्हणाले. दरम्यान, याबाबत अधिक माहिती जाणून घेण्यासाठी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अंबादास देवमाने यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता तो होऊ शकला नाही.

### मानवी मेटान्यूमोचा भारतात शिरकाव

जात आहेत आणि तो बरा होत आहे.

**विषाणू महाराष्ट्राच्या वेशीवर**

हा विषाणू महाराष्ट्राच्या वेशीवर पोहोचला आहे. त्यानुसार राज्य सरकारनेही यासंदर्भात योग्य खबरदारी घेण्यास सुरुवात केली आहे. राज्याची आरोग्य यंत्रणा सतर्क असल्याने नागरिकांनी घाबरून जाण्याचे कारण नाही. येत्या दोन दिवसांत आरोग्य विभागाची बैठक मुंबईत घेतली जाणार आहे. या बैठकीनंतर रोगाबद्दल घेण्यात येणाऱ्या काळजीबद्दलचे निर्देश जाहीर केले जातील, अशी माहिती आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली. तसेच नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असं आवाहनही त्यांनी केलं आहे.

**आजपासून प्राणी संग्रहालयं बंद?**

एकीकडे एचएमपीव्ही व्हायरसने भारतात शिरकाव केल्याने खळबळ उडालेली असताना, प्राणी संगहालयांमध्येदेखील एव्हियन फ्ल्यू विषाणूने उत्पात माजविला आहे. नागपूरमध्ये तीन वाघांच्या मृत्यूनंतर केंद्र सरकारने प्राणी संग्रहालये बंद ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. उद्यापासून प्राणी संग्रहालये बंद राहण्याची शक्यता आहे. प्राण्यांना एव्हियन फ्ल्यू विषाणूची लागण होत असल्याने केंद्र शासनाचे निर्देश आले आहेत. नागपुरतील गोरेवाडा येथील तीन वाघांच्या मृत्यूनंतर आता केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्राणी संग्रहालय बंद करण्यास सांगण्यात आले आहे. यामुळे उद्यापासून राज्यातील प्राणी संग्रहालय काही काळासाठी बंद ठेवण्यात येण्याची शक्यता आहे.

**हे करा :**

१. जेव्हा आपल्याला खोकला किंवा शिंका येत असतील, तेव्हा तोंड आणि नाक रुमाल किंवा टिश्यू पेपरने झाका. २. साबण आणि पाणी किंवा अल्कोहोल आधारित सॅनिटायझरने आपले हात वारंवार धुवा. ३. ताप, खोकला आणि शिंका येत असल्यास सार्वजनिक ठिकाणांपासून दूर राहा. ३. भरपूर पाणी प्या आणि पौष्टिक खा. ४. संक्रमण कमी करण्यासाठी सर्व ठिकाणी पुरेसे वायुविजन (व्हेंटीलेशन) होईल, याची दक्षता घ्या.

**हे करू नये :**

१. हस्तांदोलन, २. टिश्यू पेपर आणि रुमालाचा पुनर्वापर, ३.आजारी लोकांशी जवळचा संपर्क, ४. डोळे, नाक आणि तोंडाला वारंवार स्पर्श करणे., ५.सार्वजनिक ठिकाणी थुंकणे.,६. डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषध (सेल्फ मेडिकेशन) घेणे.

# महिला मेळावा उत्साहात

। कर्जत । प्रतिनिधी ।

चेतना सामाजिक संस्था आणि ग्रुप ग्रामपंचायत कोंदिवडे, कर्जत, रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने कोंदिवडे येथे कांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी कोंदिवडे, सालपे, खरवंडी, कोंढाणे येथील महिला, आशा वर्कर, अंगणवाडीच्या ताई उपस्थित होत्या.

कार्यक्रमाच्या सुरूवातीस अलका जाधव यांनी स्वागतगीत सादर केले. चेतना सामाजिक संस्थेतर्फे कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी कोंदिवडे ग्रापंचयतीचे सरपंच प्रमोद देशमुख, उपकेंद्राचे डॉ. शिरसाट, सिस्टर तन्वी मालूसरे यांचे गुलाबाचे फुल देऊन स्वागत करण्यात आले. कांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुजन सरपंच प्रमोद देशमुख, डॉ. शिरसाट, तसेच गावातील उपस्थित सदस्य यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शर्मिष्ठा घारपुरे यांनी केले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे, ग्रामसर्वोदय संस्थेचे अध्यक्ष प्रमोद पाटील यांनी आपल्या भाषणातून ग्रामसर्वोदय संस्थेची माहिती दिली. ग्रामसर्वोदय संस्था ही आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या मुलींची शिक्षणाची सोय करतात, असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन सुषमा पोतदार यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी लीला सुर्वे यांनी मेहनत घेतली.

**जाहीर नोटीस**

सर्वांना या नोटीसने असे कळविणेत येत आहे की,

१. मौजे नागांव, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड जिल्हा रायगड या गावचे शिवारातील भूमापन क्रमांक व उपविभाग ७८४/३, क्षेत्र ०-१७-४० हे. आर. पॉ, आकार ४=५४ या मिळकतीपैकी ०-०९-२५ हे. आर. पॉ. क्षेत्राची शेतजमिन व त्यांतील विहिर, झाडे ही मिळकत यांसी चतुःसीमा रेकॉर्ड ऑफ राईट्सप्रमाणे.

२. वर कलम १ मध्ये वर्णन केलेली ०-०९-२५ हे. आर. पॉ. ही मिळकत श्री. दत्तात्रेय शंकर नाईक, कांचन दत्तात्रेय नाईक यांचे मालकीची असून वर नमूद मिळकत निर्वेध व बिनबोजाची असल्याचे मालकांनी माझे अशिलांना खात्रीने व विश्वासाने सांगून विसाराची रक्कम स्विकारलेली आहे. तथापि सदर मिळकतीचे निर्वेधपणाची खात्री होणेकामी प्रस्तुतची जाहीर नोटीस प्रसिद्ध केली आहे.

३. सबब सदर मिळकतीबाबत कोणासही, कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार हितसंबंध वारसाहक्क, बोजा, जडजोखीम, सरकारी तथा निमसरकारी स्थानिक करांची थकबाकी, साठेखत करार पावती, मुखत्यारपत्र याप्रकारे अन्य अथवा तत्सम तसेच इतर अन्य कोणताही प्रकारचा संबंध गुंतवणूक असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसाचे मुदतीत खालील नमूद पत्त्यावर येऊन हरकती संबंधित कागदपत्र व साक्षी पुराव्यानिशी लेखी हरकत घेवून खात्री करून द्यावी. अन्यथा सदर मिळकत निर्वेध व बिनबोजाची असल्याचे समजून मी सदर मिळकतीचे मालकांबरोबर पुढील व्यवहार पूर्ण करीन.

४. नोटीस मुदतीनंतर तसेच परस्पर वर्तमानपत्रात जाहीर व प्रसिद्ध होणाऱ्या हरकती व लेखी नसलेली हरकत विचारात घेतली जाणार नाही व ती खाली सही करणार व सदर मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी

तारीख : ०६/०१/२०२५

ही जाहीर नोटीस आमचे मार्फत प्रसिद्ध
**अ‍ॅड. चैताली हरेष मगर**
मु. ढवर, पो. कुरूळ,
तालुका अलिबाग, जिल्हा रायगड

**माणगांव नगरपंचायत, माणगांव**

ता. माणगांव, जि.रायगड, पिनकोड ४०२१०४ Email-nagarpanchayatmangaon@gmail.com दु.क्र. ०२१४०२६३०५६
जा.क्र./मानपं/जा.नि./२२६०/२०२४-२०२५ दिनांक ०६/०१/२०२५

**जाहीर ई-निविदा सुचना**

मुख्याधिकारी, माणगांव नगरपंचायत, हे निम्ननिर्देशित खालील कामांकरीता राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागात योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत, अनुभवी व इच्छुक ठेकेदारांकडून ई निविदा पद्धतीने निविदा मागविणेंत येत आहे.

| अ. क्र | कामाचे नांव | कालावधी | कामाची रक्कम | इसारा रक्कम | निविदा फार्म फी |
|---|---|---|---|---|---|
| १ | माणगांव नगरपंचायत कार्यालयातील विद्युतीकरण व अनुषंगिक कामे करणे | दि.०७/०१/२०२५ ते दि. २१/०१/२०२५ | १३,९८,५४६/- | १३,९८५/- | १,५००/- |

**कामाच्या अटी व शर्ती**

वरील संपूर्ण प्रक्रिया ई-निविदाद्वारे ऑनलाईन पद्धतीने संगणक प्रणालीवर होईल. सदर ई-निविदा सुचना प्रसिद्ध, आवश्यक असणारी कागदपत्रे, शुद्धीपत्र इत्यादी माहिती https://www.mahatenders.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

**जाहीर निविदा सुचना/फेरनिविदा सुचना**

निम्ननिर्देशित कामाकरीता इच्छुक ठेकेदारांकडून दोन लखोटा पद्धतीने सिलबंद निविदा खाली नमुद कालावधी पर्यंत मागविण्यात आले आहेत. कोरी निविदा मागणी अर्ज खाली नमुद कालावधीपर्यंत लेखी स्वरूपात माणगांव नगरपंचायत कार्यालयात कोरी निविदा पत्राची फी (ना परतावा) भरून मिळू शकतील.

| अ.क्र. | कामाचे नांव | कालावधी | कामाची रक्कम | इसारा रक्कम | निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|---|---|
| १ | माणगाव नगरपंचायत हद्दीमध्ये धूर फवारणी करणे. | दि.०७/०१/२०२५ ते दि.१३/०१/२०२५ | -- | २०००/- | ५००/- |
| २ | माणगाव नगरपंचायत हद्दीतील लोकनेते अशोकदादा साबळे बालोद्यान येथे विद्युतीकरण, खेळणी दुरूस्ती व इतर अनुषंगिक कामे करणे या कामाचे दरपत्रक मागविणे | दि. ०७/०१/२०२५ ते दि.१३/०१/२०२५ | -- | -- | -- |
| ३ | माणगाव नगरपंचायत नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष यांचे दालन तयार करणे | दि.०७/०१/२०२५ ते दि.१३/०१/२०२५ | ३,९१,२९६/- | ३,९१३/- | ५००/- |

कामाच्या अटी व शर्ती
वरील कामाच्या निविदा बाबतची अटी, शर्ती व निविदा फॉर्म माणगाव नगरपंचायत कार्यालयामध्ये उपलब्ध आहेत.

सही/-
मुख्याधिकारी
माणगाव नगरपंचायत

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिलानी मौजे शिरगाव, तालुका मुरूड, जिल्हा रायगड येथील, तलाठी सजा वळके यांचे हद्दीतील गट क्रमांक व उपविभाग १४२/१, खराब्यासह एकुण क्षेत्र २-६१-० (हे.आर. पॉ.) आकार १.६८ (रू.पै.) हि मिळकत, सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. जितेंद्र चंद्रकांत सरतांडेल, राहणार रेवदंडा, ता.अलिबाग, जि. रायगड यांचेकडून कायम विकत घेण्याविषयी ठरविले आहे व त्या अनुषंगाने विद्यमान मालकांबरोबर व्यवहाराची बोलणी सुरू आहेत.

सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असलेबाबत विद्यमान मालकांचे म्हणणे आहे.

तरीही वर वर्णन केलेल्या मिळकतीचे संदर्भात कोणाचाही, कसलाही हक्क, हितसंबध, मालकी, गहाण, दान, लिज, विक्रीचा करार, पोटगी, चार्ज, बक्षीस, ताबा, जाण्यायेण्याचा हक्क, वहिवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा, ट्रस्ट, कुळ हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह नोटीस प्रसिद्ध झालेपासून चौदा दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे आपली लेखी हरकत नोंदवावी.

वरील मुदतीत तशा प्रकारची हरकत न आल्यास वर नमुद मिळकतीत कुणाचाही, कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही, व मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागावून आलेली तक्रार आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग, **(अ‍ॅड. महेश एकनाथ घरत)**
दिनांक : ०७/०१/२०२५ ‘गुरूकृपा’ मु.पो. खंडाळे,
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९८२२६३५५१२

# निवडक



## सतीश कुलकर्णी सेवानिवृत्त

। रोहा । वार्ताहर ।

धाटाव येथील स्पेकट्रम फार्मा कंपनीचे मॅनेजर सतिष बाळकृष्ण कुलकर्णी हे नुकतेच सेवानिवृत्त झाले. यावेळी ठाणे मुंबईच्या व्हाईस प्रेसिडेंट सुचिता अंकोलेकर, उच्च पदस्य पाधिकारी रजनीश नातू, पुण्याचे पदाधिकारी तसेच स्थानिक मॅनेजर फिलिप्स जोसेफ अन्य कंपनीतील अधिकारी गजानन बामणे, दिनेश धनवी, संतोष कुलकर्णी, संघ प्रचारक विनायक कुलकर्णी, मॅनेजर दत्तात्रय वाघमारे. अभिजित वारंगे, मनिष करंबे, राकेश पाटील, जगन्नाथ धनावडे, रवींद्र मरवडे, संगीता पवार, समीर साळवी, परेश सारदल व शेकडो कामगार वर्ग यांनी शाल, श्रीफळ व भेटवस्तू प्रदान करून शुभेच्छा दिल्या.

## ४७ जणांचे मोबाईल परत

**पनवेल** : पनवेल शहरासह खांदेश्वर पोलीस ठाणे हद्द, कामोठे पोलीस ठाणे हद्द, उरण पोलीस ठाणे, न्हावा शेवा पोलीस ठाणे हद्द परिसरात ४७ जणांचे महागडे मोबाईल हरविले होते. त्याचा कसून शोध घेत सदर मोबाईल आज त्यांना परत करण्यात आले. गुन्हे शाखा कक्ष २ पनवेलचे वपोनि उमेश गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या पथकाने या संदर्भात विशेष मोहिम राबवून वेगवेगळ्या ठिकाणी हरविलेले अशा प्रकारचे ४७ मोबाईल यांचा तांत्रिक तपासाच्या आधारे शोध घेवून ते आज गुन्हे शाखा कक्ष २ पनवेलच्या कार्यालयात संबंधित मालकांची ओळख पटवून त्यांना ते परत करण्यात आले. यावेळी अनेकांच्या डोळ्यात आनंदाश्रु उभे राहिले.



## मुरुड शहरात पुन्हा हुडहुडी!

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

मुरुड शहरासह पंचक्रोशी भागात तापमानात मोठी घसरण झाल्याने गारठा मोठ्या प्रमाणात वाढला आहे. यामुळे पुन्हा एकदा हुडहुडी भरुन आली आहे. गारठा वाढल्यामुळे नागरिक ठिक ठिकाणी शेकोट्या पेटवत आहेत. सायंकाळी पाच वाजल्यापासुन गार वारे सुरु झाल्याने अंगात स्वेटर व कानटोपी घालावी लागत आहे.या भागात दोन धरणे, प्रचंड वनसंपदा व सध्या वालाची शेतीचा हंगाम सुरु झाल्याने गारवा अधिक प्रमाणत जाणवत आहे. थंडीचे प्रमाण वाढल्याने लोक उशिरा कामावर जात असल्याचे चित्र दिसत आहे. तसेच उबदार कपडे घेण्यासाठी मुरुड बाजारपेठेत लगबग सुरु झाली आहे. वयोवृद्ध लोकांना ही थंडी फार आव्हानात्मक असणार आहे.

## अभिजित पाटील यांना मातृशोक

**अलिबाग** : कुरुळ येथील सामाजिक कार्यकर्ते, रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे पंच अभिजित अशोक पाटील यांच्या मातोश्री लता अशोक पाटील, कुरुळ ग्रामपंचायत मा. सदस्य प्रज्ञा अभिजित पाटील यांच्या सासू यांचे अल्पशा आजाराने ३० डिसेंबर रोजी निधन झाले. त्यांच्यावर ३१ डिसेंबर रोजी कुरुळ येथील स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. मितभाषी, मनमिळाऊ स्वभावाच्या लता अशोक पाटील निधनासमयी ६२ वर्षांच्या होत्या.



लता पाटील यांच्या अंत्ययात्रेला अनेक राजकीय क्षेत्रातील मंडळी, कुरुळ येथील ग्रामस्थ, मा. सरपंच, सदस्य, नातेवाईक आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यांच्या पश्च्यात पती अशोक पाटील, मुलगा अभिजित पाटील, मुलगी अनिशा दरणे, सून, नातवंडे असा मोठा पाटील परिवार आहे. त्यांचे दशविधी कार्य (दहावे) बुधवार दिनांक ८ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ठीक ७.३० वाजता कुरुळ तलाव येथे होणार आहेत. निधनाची बातमी समजताच शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा नृपाल पाटील, माजी पंचायत समिती उपसभापती सुरेश पाटील, ग्रामपंचायत माजी सदस्य अवधूत पाटील, माजी सदस्य रेश्मा पाटील, माजी सदस्य वृषाली पाटील, सामाजिक कार्यकर्ते दिनेश पाटील, सतिश पाटील, अमोल नाईक, रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे पदाधिकारी, पंच आणि इतर राजकीय पक्षाची मंडळी यांनी घरी जाऊन पाटील कुटुंबियांचे सांत्वन केले.

# खासगी रुग्णालयांच्या मनमानीला चाप

**आरोग्य विभागाकडून राज्यभरात तपासणी मोहीम**

। रायगड । प्रतिनिधी ।

राज्यात खासगी रुग्णालयांची तपासणी करण्यासाठी आरोग्य विभागाने विशेष मोहीम हाती घेतली आहे. यासाठी राज्यभरात जिल्हा स्तरावर पथकांची नियुक्ती करण्याचे आदेश आरोग्य विभागाने दिले आहेत. तपासणी करून आरोग्य सेवा आयुक्तांकडे अहवाल सादर करण्यात येणार असून, त्यानंतर रुग्णालयांवर कारवाई केली जाणार आहे.

राज्यातील खासगी रुग्णालयांकडून नियमांचे पालन होते की नाही, याची तपासणी आरोग्य विभागाची पथके करणार आहेत. आरोग्य विभागाचे संचालक डॉ. नितीन अंबाडेकर यांनी याबाबतचा आदेश काढला आहे. या आदेशानुसार, रुग्णालयांकडून वैद्यकीय आस्थापना कायद्यासह इतर नियमांचे पालन होते का, याची तपासणी प्रामुख्याने केली जाईल. आरोग्य विभागाची पथके तपासणी करून नियमांचे पालन न करणाऱ्या रुग्णालयांची यादी एक महिन्यात सादर करतील. याचबरोबर रुग्णालयांना सुधारणा करण्यासाठी एक महिन्याचा कालावधी दिला जाईल. एक महिन्यानंतर पुन्हा तपासणी करून आरोग्य सेवा आयुक्तांकडे अहवाल सादर करण्यात येणार आहे. त्यानंतर या रुग्णालयांवर कारवाई करण्यात येईल.

आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी नुकतीच आढावा बैठक घेतली. या बैठकीत खासगी रुग्णालये नियमांचे पालन करीत नसून, आरोग्य विभागालाही जुमानत नसल्याचा मुद्दा उपस्थित झाला. त्यावेळी राज्यातील खासगी रुग्णालयांची तपासणी करून कारवाई करण्याची सूचना आरोग्यमंत्र्यांनी केली होती. यानंतर आरोग्य विभागाने ही तपासणी मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेची जबाबदारी प्रत्येक जिल्हा रुग्णालयातील जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा परिषदांमधील जिल्हा आरोग्य अधिकारी, महापालिकांचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांच्यावर देण्यात आली आहे.



### तपासणी नेमकी कशाची?

- खासगी रुग्णालयांनी दर्शनी भागात दरसूची लावली आहे का?
- जैववैद्यकीय कचरा विल्हेवाट सुविधा सुरू आहे का?
- अग्निशमन दलाचे ना हरकत प्रमाणपत्र आहे का?

## अंतर्गत रस्त्याच्या कॉंक्रिटीकरणाला सुरुवात

। खारघर। वार्ताहर ।

बेलपाडा भुयारी मार्गाकडून फॅशन टेक्नॉलॉजी महाविद्यालयाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कॉंक्रिटीकरणाच्या कामाला सुरुवात झाली आहे. त्यामुळे बेलपाडा ग्रामस्थ समाधान व्यक्त करीत आहेत. बेलपाडा भुयारी मार्गाकडून फॅशन टेक्नॉलॉजी महाविद्यालयाकडे जाणाऱ्या रस्त्यावर सांडपाणी वाहत होते.

विशेष म्हणजे पावसाळ्यात सांडपाण्यामुळे येथील स्थानिक रहिवासी आणि फॅशन टेक्नॉलॉजी, ए. सी. पाटील आणि येरळा आयुर्वेदिक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना दुर्गंधीयुक्त रस्त्यावरून ये-जा करावी लागत होती.

सिडकोने खारघर वसाहत निर्माण करताना पावसाळी गटारे, तसेच सांडपाणी वाहून नेणाऱ्या वाहिन्यांचे निकृष्ट दर्जाचे काम केल्यामुळे येथील रस्ते जलमय होत होते. सिडकोने ही समस्या दूर करावी यासाठी बेलपाडा ग्रामस्थ, तसेच माजी सरपंच संजय घरत यांनी सिडकोकडे पत्रव्यवहार केला होता, मात्र आश्वासनापलीकडे सिडकोकडून कोणतीही उपाययोजना करण्यात आली नाही. पालिका अस्तित्वात आल्यावर संजय घरत यांनी पालिकेचे आयुक्त, शहर अभियंता यांच्याकडे पत्रव्यवहार करून या रस्त्याचे कॉंक्रिटीकरण करून येथील सांडपाणी वाहिनी आणि गटाराचे योग्य प्रकारे काम करून समस्या दूर करावी, अशी मागणी केली होती.

पालिकेने या रस्त्यावरील सांडपाणी वाहून नेणाऱ्या गटारांची कामे करून कॉंक्रिटीकरणाचे काम हाती घेतले आहे. त्यामुळे येणाऱ्या पावसाळ्यात स्थानिकांसह विद्यार्थ्यांची दुर्गंधीयुक्त पाण्यातून सुटका होणार असल्याने समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

## सुरक्षा रक्षकाला केली मारहाण

। नवीन पनवेल । वार्ताहर ।

सुरक्षारक्षकाला तोंडाला रुमाल बांधून १८ ते २४ वयोगटातील तरुणांनी प्लास्टिक पाईपने मारहाण करून जखमी केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात अनोळखी इस्मान विरोधात गुन्हा दाखल केला.

पोपट आव्हाड हे रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळात सुपरवायझर आहेत. ते एनएमएमटी बस आगार आसुडगाव येथे काम करतात. काही सुरक्षारक्षकांनी त्या ठिकाणाहून आव्हाड यांची बदली व्हावी यासाठी दोन महिन्यांपूर्वी तक्रार अर्ज केल्याचे त्यांना समजले होते. २ जानेवारी रोजी ते मोटर सायकलने घोटकॅम्प येथील घरी जात असताना इंटरनेट बारच्या समोरून मुंबई पुणे एक्सप्रेस हायवे रोडच्या ब्रिज जवळ आले असता तीन ते चार अनोळखी इसम तोंडाला रुमाल बांधून उभे होते. त्यांनी प्लास्टिकचा पाईप फेकून मारला तो त्यांच्या हाताला लागला. त्यानंतर त्यांनी पळत येऊन आव्हाड यांना प्लास्टिकच्या पाईपने मारहाण केली. ३ जानेवारी रोजी अनोळखी इसमाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

## खाद्यतेलाच्या वाढत्या किमतीने सर्वसामान्य हैराण

। रायगड । प्रतिनिधी ।

वाढत्या महागाईत खाद्यतेलाचे भावही सतत वाढत असल्याने नागरिकांची चिंता वाढली आहे. दोन महिन्यांपासून खाद्यतेलाचे भाव २० ते २५ रुपयांनी वाढले आहेत. भाव असेच वाढत राहिले, तर येत्या काळात हॉटेल किंवा टपऱ्यांवरील खाद्यपदार्थही महागण्याची शक्यता आहे.

स्वयंपाकघरात जेवण बनवण्यासाठी खाद्यतेलाचा समावेश होतो. वरण, भाजीच्या फोडणीपासून ते चपाती भाजण्यापर्यंत खाद्यतेलाचा वापर केला जातो; मात्र दिवाळीनंतर तेलाच्या किमती टप्प्याटप्प्याने वाढल्याचे व्यापारी सांगत आहेत. वाशीतील एपीएमसी धान्य बाजार हे तेलाचे मोठे विक्री केंद्र म्हणूनही ओळखले जाते. या बाजारात दरम हा सात ते आठ टन खाद्यतेलाची आवक होत असते. मागणीपेक्षा खाद्यतेलाचा पुरवठा कमी झाल्याने तुटवडा जाणवत असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले आहे. भारतात ६० टक्के खाद्यतेलाची गरज बाहेरून आयात करून भागवली जाते, देशांतर्गत भुईमूग आणि सूर्यफुलाचे होणारे एकंदरीत उत्पादन देशातील एकूण खाद्यतेलाची तूट भरून काढू शकत नसल्याचे विश्लेषकांनी म्हटले आहे.

### पुढील दोन महिने भाव चढेच

**दोन महिन्यांपूर्वी १२२ रुपये किलो असलेले पामतेल सध्या बाजारात १४० रुपये किलोने विकले जात आहे. सूर्यफुल तेलाचे भावही १३० रुपयांवरून १४०-१४५ रुपये किलोवर पोहोचले आहेत. यासोबतच सोयाबीनच्या किमती १२० वरून १३० रुपये प्रतिकिलोपर्यंत पोहोचल्या आहेत. सर्वच तेलाच्या किमती किलोमागे १० ते २० रुपयांनी वाढत असून, पुढील दोन महिने तरी या किमती अशाच वाढत राहतील, अशी शक्यता व्यापाऱ्यांनी वर्तवली आहे.**

### हॉटेल व्यावसायिकांची चिंता

**खाद्यतेलाच्या किमती वाढल्याने हॉटेल व्यावसायिकांनीही चिंता व्यक्त केली आहे. २० ते २५ रुपये झालेली वाढ अशीच सुरू राहिली, तर येत्या काळात अन्नपदार्थांचे भावही वाढवावे लागण्याची शक्यता हॉटेल व्यावसायिक गुरूनाथ घाग यांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे एकूण हॉटेल व्यवसायावर परिणाम होण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली.**

## ठेकेदाराच्या चुकीमुळे प्लास्टिक पिशव्यांना आग

। नेरळ । प्रतिनिधी ।

माथेरान शहरात कचरा जळण्यास मनाई आहे, तसेच इतरत्र कचरा साठवून ठेवण्यास आणि कचरा टाकण्यास मनाई आहे. मात्र माथेरान पालिकेत रस्त्यांच्या कामासाठी आणलेल्या सिमेंटच्या रिकाम्या पिशव्या आर्टिस्ट पॉइंट येथे साठवून ठेवण्यात आल्या होत्या. दोन वर्षापासून पडून असलेल्या पिशव्या उचलण्यात आल्या नसल्याने अखेर त्या पिशव्यांना आग लागली आणि वृक्षसंपदेचे मोठी हानी झाली. या प्रकरणी पालिका प्लास्टिक पिशव्या साठवून ठेवणाऱ्या संबंधित ठेकेदारावर कोणती कार्यवाही करणार याकडे लक्ष लागून राहिले आहे.

माथेरान शहरातील आर्टिस्ट पॉइंट येथील कोपऱ्यावर त्या रिकाम्या पिशव्या टाकून देण्यात आल्या होत्या. त्या रिकाम्या पिशव्या दोन वर्षे तेथेच पडून होत्या आणि अखेर त्या पिशव्यांना अज्ञात व्यक्तीने आग लावली. त्या आगीमुळे आर्टिस्ट पॉइंट भागातील अनेक झाडांना आगीने आपल्या भक्ष्यस्थानी आणले. या आगीमुळे आजूबाजूची झाडे जळून गेली आहेत. त्या प्लास्टिक पिशव्या तेथे टाकण्यात आल्याने पर्यावरणाचादेखील ऱ्हास झाला आहे. आग लागल्याची माहिती मिळताच माथेरान पालिकेचे अग्निशमन केंद्र तत्काळ तेथे दाखल झाले. त्यानंतर आगीवर नियंत्रण मिळविण्यात यश आले असलेतरी आजूबाजूची झाडे जळून खाक झाली. या प्रकरणी माथेरान नगरपरिषद संबंधित ठेकेदार कंपनीवर कोणती कारवाई करणार याकडे लक्ष लागून राहिले आहे. राकेश कोकले हे आपल्या सहकाऱ्यासह गेली दोन वर्षे माथेरानच्या जंगलात फिरून प्लास्टिक पिशव्या जंगलातून दरीमधून बाहेर काढण्याचे काम करीत आहेत. दुसरीकडे दोन वर्षे पिशव्या पडून राहिल्याने त्या ठिकाणी नवीन झाडे उगविण्याची प्रक्रिया पुढे जात नाहीत. यामुळे जंगलाचा ऱ्हास होत असल्याचा आरोप कोकाले यांनी केला.



## क्युआरकोड अपडेटच्या बहाण्याने व्यापाऱ्याची फसवणूक

। पनवेल । वार्ताहर ।

गुगल-पेचा क्युआर कोड अपडेट करून देण्याच्या बहाण्याने आलेल्या एका भामट्याने पनवेलमधील ६६ वर्षीय व्यावसायिकाच्या मोबाईल फोनमधून गुगल-पेचा वापर करत त्याच्या खात्यातील ९५ हजाराची रक्कम आपल्या खात्यात वळती करून फसवणूक केल्याचा प्रकार घडला आहे.

शहरातील अगरबत्ती विक्रेते मनोहर वाधवानी यांच्या दुकानात एक भामटा आला व त्याने मी गुगले-पेमधून आलो असून तुमच्या दुकानातील क्युआर कोड अपडेट करून द्यायचा आहे. तसेच गुगले-पेच्या साऊंड बॉक्सच्या कॅश बॉक्सचे काम करून देणार असल्याचे त्याने सांगितले. यासाठी त्याने वाधवानी यांच्याकडून त्यांचा मोबाईल फोनचा लॉक काढून घेवून आपल्या हातात घेतला व वाधवानी यांचे दुर्लक्ष असल्याचे पाहून त्यांच्या मोबाईलमधील गुगल-पेच्या मदतीने ९५ हजार रुपयाची रक्कम आपल्या खात्यात वळती करून घेतली व तो निघून गेला. सदर घटनेची वाधवानी यांना माहिती पडताच त्यांनी याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दिली आहे.

## छाया गवई विशेष गौरव पुरस्काराने सन्मानित

। पाली/बेणसे । वार्ताहर ।

बहुजन हिताय बहुजन सुखाय ग्रुप शिक्रापूर पुणे,भारतीय संविधान विश्लेषण समिती महाराष्ट्र राज्य, द्वारकामाई महिला व बालकल्याण मागसवर्गीय विकास संस्था त्रिवेणीनगर पुणे, समीक्षा फाऊंडेशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भारतीय संविधान अमृत महोत्सव संमेलन वर्ष ३ रे नुकतेच धम्मदिक्षा सुवर्ण महोत्सव पुणे येथे आयोजित केला होता.



या कार्यक्रमात रायगड जिल्ह्यातील बहुजन व आंबेडकर चळवळीत तसेच धम्म चळवळीत कार्यकर्त्या भारतीय बौद्ध महासभेच्या केंद्रीय शिक्षिका आणि रायगड जिल्हा महिला कमिटीच्या सरचिटणीस छाया गवई यांना धम्म कार्याबद्दल विशेष गुणगौरव पुरस्कार मराठी लेखक, अभ्यासक व समीक्षक जेष्ठ साहित्यिक तथा मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीकांत सबनीस यांच्या हस्ते देण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विमल गायकवाड या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून दिलीप सरोदे, प्राध्यापक दि.बा.बागुल, संगीता भंडारे, स्वाती गायकवाड, भारती मोरे, सुनिल रोकडे, सरस्वती साबळे, कोकिळा गवई यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांनी घेतली ‘टीबी मुक्त भारत’ ची शपथ

। कोर्लई । वार्ताहर ।

देशाला क्षयरोगापासून मुक्त करण्याचे ध्येय बाळगले आहे, ते पूर्ण करण्यासाठी संपूर्ण देशपातळीवर राबविण्यात येत असलेल्या राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रमांतर्गत ७ डिसेंबर २०२४ ते २४ मार्च २०२५ या कालावधी दरम्यान शंभर दिवज्ञीय क्षयरोग मोहीम राबवण्यात आली आहे.

यामध्ये मोठ्या प्रमाणात सर्व लोकांमध्ये विविध माध्यरातून जनजागृती करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून जिल्हा क्षयरोग केंद्र रायगड अंतर्गत क्षयरोग पथक मुरुड यांच्या मार्फत मेहबूब एज्युकेशन ट्रस्ट, इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनियर कॉलेज ऑफ सायन्स विहूर येथे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. पायल राठोड यांनी विद्यार्थ्यांना क्षयरोगाची प्रतिज्ञा दिली व क्षयरोगाचे सखोल मार्गदर्शन केले. विद्यार्थी हे उद्याचे देशाचे उज्वल भविष्य घडवणारे आहेत त्यामुळे त्यांना जागरूक करून क्षयरोग बाबतची असणारी भीती नष्ट करण्याचा एक प्रयत्न रायगड जिल्ह्यामध्ये प्रथमच विहूर शाळेमध्ये राबवला. त्याप्रसंगी उपस्थित विद्यार्थ्यांनी टीबी हरेल, देश जिंकेल अशी घोषणाबाजी केली.




**प्रशांत नाईक यांच्या हस्ते दीपप्रज्ज्वलन** | **जेएसएम व अ‍ॅड. दत्ता पाटील कॉलेज ऑफ लॉ च्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा**

# ‘यादों की बारात’ उपक्रमाला उत्स्फुर्त प्रतिसाद

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबागमधील जे. एस. एम कॉलेज व अ‍ॅड. दत्ता पाटील कॉलेज ऑफ लॉ च्या माजी विद्यार्थ्यांच्या स्नेहमेळाव्याचे आयोजन रविवारी (दि.०५) महाविद्यालयाच्या प्रांगणात करण्यात आले. यादो की बारात पर्व दुसरे या उपक्रमाला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाली असून प्रेक्षकांकडूनदेखील चांगली दाद मिळाली.

जे. एस. एम. कॉलेज अ‍ॅल्युमनी असोसिएशन आणि अ‍ॅड. दत्ता पाटील कॉलेज ऑफ लॉ अ‍ॅल्युमनी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम पार पडला. स्नेहमेळाव्याच्या उद्घाटन अलिबाग नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष तथा महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी प्रशांत नाईक यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी समारंभाचे अध्यक्ष म्हणून जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. गौतम पाटील उपस्थित होते.

यावेळी जनता शिक्षण मंडळाच्या उपाध्यक्षा डॉ. साक्षी पाटील, सेक्रेटरी गौरव पाटील, महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. अनिल पाटील, अ‍ॅड. स्वप्नील पाटील, अ‍ॅड. महेश पटेल, जेएसएम महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सोनाली पाटील, अ‍ॅड. दत्ता पाटील लॉ कॉलेजच्या प्राचार्या अ‍ॅड. निलम हजारे आदी मान्यवरांसह जेएसएम व लॉ कॉलेजचे माजी विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

‘यादों की बारात-पर्व २’ या नावाने आयोजित केलेल्या स्नेहमेळाव्यात माजी विद्यार्थ्यांना एकत्र आणण्याचा सुवर्णयोग जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. गौतम पाटील यांच्या पुढाकाराने जुळून आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सादर करताना प्राचार्य डॉ. सोनाली पाटील, प्राचार्य अ‍ॅड. नीलम हजारे यांनी दोन्ही महाविद्यालयांच्या आजपर्यंतच्या प्रगतीचा आढावा घेतला.



यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना अ‍ॅड. गौतम पाटील यांनी स्व. नानासाहेब कुंटे, अ‍ॅड. दत्ता पाटील यांनी हे कॉलेज नावारुपास आणण्याकरिता केलेल्या कार्याची माहिती दिली. आगामी विकास योजनांची माहिती उपस्थितांना देत महाविद्यालयाच्या विकासात हातभार लावण्याचे आवाहन माजी विद्यार्थ्यांना केले. याप्रसंगी कला क्षेत्रात केलेल्या उत्कृष्ठ कामगिरीबद्दल महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी सचिन कांबळे यांचा अ‍ॅड गौतम पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



या कार्यक्रमासाठी जनता शिक्षण मंडळाच्या संचालक शैला पाटील यांसह संचालक मंडळाचे सदस्य व विविध ठिकाणाहून आलेले २०० माजी वद्यार्थी उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या प्रांगणात जुन्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी ‘खेळ पैठणीचा’ व संगीत खुर्ची अशा मनोरंजक खेळांचे आयोजनही करण्यात आले. अनेक माजी विद्यार्थ्यांनी गायन, नृत्य, अभिनयाचा आविष्कार घडविणारे बहारदार सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. स्ट्रिंग्स फॅमिली, अलिबाग यांच्या ‘म्युझिकल शो’ने कार्यक्रमात रंगत आणली.

# यांची सुस्ती उतरवा

भारतीय क्रिकेट पुन्हा आपल्या मूळ पदावर आले आहे. गेली काही वर्षे आपल्या संघाने खूप सातत्यपूर्ण कामगिरी केली होती. खेळात हार-जीत चालू राहते. पण वाईट खेळून हरणे हा प्रकार मध्यंतरी थांबला होता. गांगुली आणि नंतर धोनीच्या कर्णधारपदाच्या काळात भारत टिच्चून खेळू लागला होता. पण रोहित शर्माच्या संघाने पुन्हा भारताला जुन्या जमान्यात नेऊन ठेवले आहे. एखाद्या सामन्यात बरी कामगिरी आणि नंतर पुन्हा दहा सामने खराब असा प्रकार सुरू झाला आहे. ज्या भारतात वर्षाचे ३६५ दिवस व दिवसाचे सोळा तास सर्वत्र क्रिकेट अक्षरशः वाहत असते त्याची ही स्थिती अत्यंत दारुण व करूण म्हणायला हवी. ऑस्ट्रेलियात नुकत्याच संपलेल्या बॉर्डर-गावस्कर चषक मालिकेत भारताचा तीन-एक असा पराभव झाला. गेल्या दहा वर्षात पहिल्यांदाच भारताने सलगरीत्या तीन मालिका गमावल्या आहेत. यापूर्वी श्रीलंकेत आपण एक दिवसीय सामन्यांची मालिका हरलो. नंतर न्यूझीलंडने आपल्याला आपल्याच देशात येऊन सर्वच्या सर्व सामन्यात हरवले. असेदेखील अलिकडे कधी झाले नव्हते. त्यानंतर आता ही ऑस्ट्रेलियातील मालिका आपण गमावली आहे. विशेष म्हणजे साधारणपणे परदेशी मालिका खेळायला गेल्यावर पहिला सामना आपण अनेकदा हरत आलेलो होतो. यंदा मात्र पर्थचा पहिला सामना तब्बल २९५ धावांनी जिंकून कमाल केली. या मैदानावर आजवर कोणत्याही पाहुण्या संघाला सामना जिंकता आला नव्हता. याच सामन्यात विराट कोहलीने आपले एकमेव शतक झळकवले. मात्र तिथून भारतीय संघाच्या कामगिरीला जी गळती लागली ती थांबलीच नाही. याला मुख्यतः जबाबदार होती ती आपली बेजबाबदार फलंदाजी. यशस्वी जयस्वालचा एकमेव अपवाद वगळता ऑस्ट्रेलियासमोर ठाम उभे राहण्याचा निर्धार एकानेही दाखवला नाही. जैस्वाल हा अवघा २३ वर्षांचा आहे. मात्र त्याने प्रसंगी संयतपणे व गरज असेल तेव्हा आक्रमकपणे ज्या रीतीने ऑस्ट्रेलियाच्या गोलंदाजीचा मुकाबला केला तो नवोदितांसाठी आदर्श आहे. मालिकेत त्याने ट्रेविस हेडच्या (४४८) खालोखाल दुसऱ्या क्रमांकाच्या सर्वोच्च (३९१) धावा केल्या. बाकीच्या फलंदाजांपैकी एकाने जरी त्याच्याइतके सातत्य दाखवले असते तर आपली इतकी मोठी हार झाली नसती.

## फलंदाजांची हाराकिरी

कर्णधार रोहित शर्मा आणि विराट कोहली हे पूर्णतः अपयशी ठरले. कोहलीची या मालिकेतील सरासरी केवळ २४ इतकी आहे. त्यातही पर्थचे शतक वगळले तर ती वीसच्याही खाली जाते. रोहितची कामगिरी तर त्याहून भीषण आहे. पाच डावांमध्ये मिळून त्याने सहाच्या सरासरीने ३१ धावा केल्या. अखेर शेवटच्या कसोटीत संघ व्यवस्थापनाने नोटीस दिली म्हणा की त्यालाच लाज वाटली म्हणा तो खेळला नाही. तो कधी चौथ्या तर कधी पहिल्या क्रमांकावर खेळत राहिला. खरे तर वीस षटकांच्या सामन्यात देखील रोहित अलिकडे टिकाऊ खेळ करणे बंद झाले आहे. सलामीला येऊन दे-दणादण खेळ करायचा आणि ३०-४० धावा करून बाद व्हायचे ही त्याची रीत राहिलेली आहे. वीस षटकांमध्ये ते ठीक असते. पण कसोटी क्रिकेटसाठी वेगळा दर्जा लागतो. हे लक्षात घेता विराट व रोहित या दोघांनाही तात्काळ काढून टाकायला हवे. इरफान पठाणने विराटवर टीका करताना सुपरस्टार संस्कृती बंद करा असे म्हटले आहे. ते पूर्णतः खरे आहे. शुभमन गिल हादेखील असाच अति व अवास्तव लाडावलेला खेळाडू आहे. त्यालाही किमान एका हंगामात संघाबाहेर बसवण्याची गरज आहे. तो किंवा के. एल. राहुल यांच्या खेळात अजिबात सातत्य नव्हते. या सर्वांना सक्तीने रणजी सामने खेळायला लावले पाहिजेत असे सुनील गावस्कर यांनी म्हटले आहे. तेथे चांगली कामगिरी झाली तरच यांना संधी द्यायला हवी. त्या मानाने नीतीशकुमार रेड्डी या नव्या अष्टपैलू खेळाडूने चांगली कामगिरी केली. पर्थनंतर मेलबर्नला एकदाच आपण जी तीनशेपार मजल मारली त्यात नीतीशकुमार रेड्डीच्या तडफदार व झुंजार ११४ धावांचा मोठा वाटा होता. अशा तरुण खेळाडूंनाच अधिकाधिक वाव मिळायला हवा. रिषभ पंत यालाही इशारा दिला जाण्याची गरज आहे. या मालिकेत अनेकदा त्याने कारण नसताना खराब फटके मारून विकेट फेकल्याचे दिसले. शेवटच्या सामन्यात त्याने वेगवान अर्धशतक झळकवले. मात्र त्याच्याकडूनही अधिक सातत्य अपेक्षित आहे.

## हा संघ बदला

आपल्या संघात ध्रुव जुरेलच्या रुपाने चांगल्या फलंदाज यष्टिरक्षकाचा पर्याय उपलब्ध आहे. पूर्वी इंग्लंड व न्यूझीलंडविरुध्द त्याने चांगली कामगिरी केली होती. त्याला एखाद्या सामन्यात पंत वा राहुल यांच्या व्यतिरिक्त संधी द्यायला हवी होती. ज्या गावस्करच्या नावाने हा चषक दिला जातो त्याच्या काळात आपली फलंदाजी मजबूत होती. मात्र चांगले जलदगती गोलंदाज नसल्याने आपल्याला बचावात्मक खेळावे लागत असे. आता बुमरासारखा सर्वोत्कृष्ट गोलंदाज आपल्यापाशी आहे. या मालिकेत ऑस्ट्रेलियाकडून सर्वाधिक बळी कमिन्सने २३ घेतले. त्याउलट बुमराने तब्बल ३२ बळी घेतले व त्याची सरासरी केवळ तेरा आहे. यावरून आपली गोलंदाजी त्यांच्यापेक्षा किती सरस होती हे कळावे. सिराज, आकाशदीप, प्रसिध्द कृष्णा यांनीही बरी कामगिरी केली. मात्र ऑस्ट्रेलियाचा नॅथन लॉयन यशस्वी ठरत असताना आपला जडेजा वा वॉशिंग्टन सुंदर हे फिरकीपटू तितकीशी कमाल दाखवू शकले नाहीत. थोडक्यात आपला संघ अगदी ढेपाळला असून तो पूर्णतः नव्याने बांधण्याची गरज आहे. सतत क्रिकेट खेळत असल्याने आणि आयपीएलच्या हुकुमी कोट्यवधी रुपयांमुळे आपल्या क्रिकेटपटूंमध्ये एक प्रकारची सुस्ती आली आहे. पूर्वी परदेशी मालिकांआधी पूर्ण संघाची म्हणून शिबिरे होत असत. त्यामुळे एकत्रित कामगिरी होण्याला मदत होत असे. ऑस्ट्रेलिया व इंग्लंडचे संघ अजूनही हे करतात. किंबहुना, कोणत्याही मोठ्या मालिकांआधी त्यांचे सर्व खेळाडू आयपीएल छापाचे मसाला क्रिकेट सोडून आपल्या देशातील सराव शिबिरांमध्ये दाखल होतात. पण भारतीय खेळाडू व व्यवस्थापनाला इतका माज आला आहे की त्यांना याची गरजच वाटेनाशी झाली आहे. न्यूझीलंडविरुध्द हरण्याच्या नामुष्कीनंतरही त्यांना काहीही अक्कल आली नाही हेच ताज्या पराभवावरून दिसले. संघाचा प्रशिक्षक म्हणून गौतम गंभीर हाही कुचकामी असल्याचे दिसते. त्यालाही हाकलण्याची गरज आहे. अश्विनसारख्या वरिष्ठ खेळाडूने ऐन मालिकेत अचानक निवृत्ती घेतली तेव्हाच या संघात सर्व काही ठीक नाही हे दिसले होते. एकूण संघाची सुस्ती व मस्ती उतरवण्याची वेळ आली आहे.

## विचार

# मृत्यूचे हवाई द्वार!

**जगात सर्वात वेगवान प्रवासी वाहतुकीसाठी आता विमानांचा वापर वाढला आहे. लोकांच्या उत्पन्नात होत असलेली वाढ आणि विमानभाड्यात तुलनेने कमी झालेली वाढ यामुळे प्रवाशांचा विमान प्रवासाकडे कल वाढला आहे; परंतु त्याचबरोबर विमान अपघातांचे प्रमाण वाढले आहे. तंत्र कितीही प्रगत झाले असले, तरी अपघात रोखण्यात ते फार यशस्वी झाले असे म्हणता येत नाही.**



अजय तिवारी

मानवी चुका, हवामान आणि निसर्ग अशा अनेक कारणांमुळे विमान अपघात होतात. अलिकडेच जसे रशियाने चुकून अझरबैजानचे विमान पाडले, तशा चुकाही विमानप्रवाशांच्या मृत्यूला कारणीभत होत असतात. डिसेंबर महिना हा तर विमान प्रवाशांसाठी जणू काळच बनून आला. डिसेंबरमध्ये सहा विमान अपघात झाले. त्यात २३४ जणांचा बळी गेला, तर २०२४ मध्ये आतापर्यंत झालेल्या विमान अपघातात ४०२ प्रवाशांचा प्रवास अखेरचा ठरला. दक्षिण कोरियातील मुआन आंतरराष्ट्रीय विमानतळावर १८१ प्रवाशांना घेऊन जाणाऱ्या जेजू एअरच्या विमानाचा भीषण अपघात झाला. या घटनेत १७९ प्रवाशांचा मृत्यू झाला, तर दोघांना वाचवण्यात यश आले. विमान वाहतूक क्षेत्रातील सुरक्षा प्रोटोकॉल आणि तांत्रिक समस्यांबाबत आता प्रश्न उपस्थित केले जात आहेत. बँकॉकहून परतणाऱ्या या विमानाचा गिअर लँडिंगच्या वेळी न उघडल्यामुळे विमान धावपट्टीवरून घसरले आणि थेट काँक्रीटच्या सुरक्षा भिंतीला धडकले. आदळल्यानंतर विमानातून आगीचा मोठा लोळ बाहेर आला. त्यामुळे १७९ प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला. असे एकीकडे सांगितले जात असले, तरी चिमणी विमानाला धडकल्याने अपघात झाल्याचे अन्य एक कारण सांगितले गेले. चिमणी धडकून खरेच विमानाचा अपघात होतो का, असा प्रश्न कुणालाही पडू शकेल; परंतु दक्षिण कोरियातील मुआन आंतरराष्ट्रीय विमानतळाचा इतिहास असा आहे, की तेथे यापूर्वी चिमण्या विमानांना धडकून अपघात होण्याचे प्रमाण जास्त आहे. या आणि अशा अनेक विमान अपघातांनी या क्षेत्राचे आकाश अलिकडेच वादळी बनले.

२५ डिसेंबर रोजी अझरबैजान एअरलाइन्सचे विमान कझाकस्तानमधील अकताऊ विमानतळाजवळ क्रॅश झाले. त्यात ३८ लोक ठार झाले. हे विमान बाकूहून ग्रोझनीला जात होते. तांत्रिक अडचणी आणि खराब हवामानामुळे विमानाने ग्रोझनी विमानतळावर आपत्कालीन लँडिंग केले होते. त्या वेळी अपघात झाला. २२ डिसेंबर रोजी दक्षिण ब्राझीलमधील ग्रामाडो शहरात खासगी विमान कोसळून एका कुटुंबातील दहाजणांचा मृत्यू झाला. या विमानाचे उड्डाण करणारे ब्राझीलचे व्यापारी लुईझ क्लॉडिओ गॅलेझी यांची पत्नी, तीन मुली आणि इतर नातेवाइकांचा या अपघातात मृत्यू झाला. विमान रहिवासी भागात कोसळले. या घटनेत त्या ठिकाणी उपस्थित असलेले १७ जण जखमी झाले. पापुआ न्यू गिनीमध्ये झालेल्या अपघातात एक विमान २२ डिसेंबर रोजी पापुआ न्यू गिनीमध्ये क्रॅश झाले. त्यात सर्व पाच प्रवाशांचा मृत्यू झाला. हे विमान वासू विमानतळावरून ला-नादजाबला जात होते. दुसऱ्या दिवशी या विमानाचे अवशेष सापडले; मात्र कोणीही वाचले नाही. या घटनेचा तपास अजूनही सुरू आहे.

अर्जेंटिना येथील सॅन फर्नांडो विमानतळाजवळ बॉम्बार्डियर विमान क्रॅश झाले आणि दोन्ही पायलट ठार झाले. हे विमान पुंता डेल एस्टे विमानतळावरून सॅन फर्नांडोला जात होते. लँडिंग केल्यानंतर विमानाचा वेग वाढला आणि ते कुंपणाला धडकले. कामाका एअरचे एक उड्डाण विमान इनौये आंतरराष्ट्रीय विमानतळाजवळ क्रॅश झाले. त्यात दोन्ही पायलट ठार झाले. एटीसी कम्युनिकेशन्सनुसार, उड्डाणानंतर लगेचच विमानाचे नियंत्रण सुटले आणि ते एका इमारतीवर आदळले. प्रशिक्षणादरम्यान ही घटना घडली. दक्षिण कोरियामध्ये सरत्या आठवड्यामध्ये झालेल्या भीषण विमान अपघातामागे पक्ष्यांच्या टकरीचे कारण समोर आले आहे. अधिकाऱ्यांनी सांगितले की हवाई वाहतूक नियंत्रकांनी अपघाताच्या काही मिनिटांपूर्वीच विमानाला पक्षी धडकण्याच्या जोखमीबद्दल इशारा दिला होता. बचावलेल्या क्रू सदस्यांपैकी एकाने पक्ष्यांच्या धडकेचा उल्लेख केला होता; मात्र हा अपघात नेमका कशामुळे झाला याचा शोध घेतला जात आहे. अपघाताच्या वेळी विमानामध्ये एकूण १८१ लोक होते. दोन्ही क्रू मेंबर्सना ढिगाऱ्यातून काढून रुग्णालयात नेण्यात आले. आगीत ८४ महिला, ८२ पुरुष आणि ११ अन्य लोक जळून खाक झाले. त्यातील फक्त ६५ जणांची ओळख पटली. कर्मचाऱ्यांनी विमानाच्या ब्लॅक बॉक्समधून फ्लाइट डेटा आणि कॉकपिट व्हॉइस रेकॉर्डर मिळवले. या सर्वांची सरकारी तज्ज्ञांकडून चौकशी केली जात आहे.

कोरिया एअरपोर्ट कॉर्पोरेशनने संसदेत सादर केलेल्या आकडेवारीनुसार, दक्षिण कोरियाच्या १४ प्रादेशिक विमानतळांमध्ये मुआन विमानतळाने सर्वात जास्त पक्ष्यांनी धडका देण्याच्या घटनांची नोंद केली आहे. तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार पक्ष्यांच्या धडकेचे घातक परिणाम होऊ शकतात. विशेषत: मुआनमध्ये विमानतळ शेती आणि किनारी भागांच्या जवळ असल्यामुळे असा धोका जास्त आहे. स्थलांतरित पक्षी कायमचे रहिवासी बनल्यामुळे आणि विमानतळांवर दिसणाऱ्या पक्ष्यांच्या वेळेत आणि प्रजातींमध्ये बदल झाल्यामुळे ही वाढ झालेली असू शकते, असे मत पुढे आले. या अपघातांमागे पाच मुख्य कारणे आहेत. यामध्ये पायलटची चूक, यंत्रांमध्ये बिघाड, हवामानाची परिस्थिती, हवाई वाहतूक नियंत्रकाच्या चुका आणि दहशतवाद यांचा समावेश आहे. विमान अपघातात पायलटची चूक ही सर्वात मोठी भूमिका असू शकते. टेकऑफ, नेव्हिगेशन आणि लँडिंगदरम्यान वैमानिकांनी केलेल्या विविध चुकींचा यात समावेश आहे. अंदाजे २२ टक्के विमान अपघात यंत्रणेतील बिघाडामुळे होतात. हे बिघाड डिझाईन, देखभाल आणि उत्पादनातील त्रुटींमुळे होतात. त्यामुळे विमानाची सुरक्षा धोक्यात येते. अंदाजे १२ टक्के विमान अपघात खराब हवामानामुळे होतात. खराब हवामान फ्लाइटवर परिणाम करू शकते. विशेषतः टेक ऑफ आणि लँडिंग दरम्यान हा परिणाम जास्त असतो. कमी दृश्यमानता, वादळी वारे, हिमवर्षाव आणि पाऊस यामुळे टेक ऑफ आणि लँडिंग कठीण होऊ शकते.

एअर फ्रान्स फ्लाइट ४४७ हे विमान १ जून २००९ रोजी अटलांटिक महासागरात कोसळले. खराब हवामानामुळे विमानाच्या पिटोट ट्यूब बर्फाच्या स्फटिकांनी ब्लॉक केल्या. त्यामुळे क्रूचे नियंत्रण सुटले आणि सर्व २२८ प्रवासी आणि क्रू मारले गेले. वैमानिकांना हवामानाचे मूल्यांकन आणि नेव्हिगेशन तंत्राचे विस्तृत प्रशिक्षण दिले जाते. तथापि, अनपेक्षित हवामान अजूनही मोठे धोके निर्माण करू शकतात. प्रगत हवामान रडार प्रणाली वैमानिकांना प्रतिकूल परिस्थितीमध्ये उड्डाण मार्ग निवडण्यास मदत करते. एअर हवाई वाहतूक नियंत्रक त्रुटींमुळे अंदाजे तीन टक्के विमान अपघात होतात. नियंत्रक एकाधिक विमाने व्यवस्थापित करतात आणि टेकऑफ आणि लँडिंगदरम्यान त्यांच्यामध्ये सुरक्षित अंतर सुनिश्चित करतात; परंतु वाहतूक भारामुळे त्रुटींचा धोका वाढला आहे. विद्ध्वंस आणि दहशतवाद यामुळे सुमारे सात टक्के प्राणघातक विमान अपघात होतात. एअरलाइन्सने या धोक्यांचा सामना करण्यासाठी कर्मचाऱ्यांची पार्श्वभूमी तपासणी आणि विमानतळावरील स्क्रीनिंग प्रक्रियांचा कडक अवलंब केला आहे. याशिवाय प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे. विमान अपघातांची मुख्य कारणे समजून घेणे जागतिक स्तरावर विमान वाहतूक सुरक्षा वाढवण्यासाठी आवश्यक आहे. पायलट्सची त्रुटी, यांत्रिक विश्वासार्हता, हवामानविषयक आव्हानांचे प्रभावी व्यवस्थापन, हवाई वाहतूक नियंत्रक त्रुटी कमी करणे आणि तोडफोडीला सामोरे जाणे या सर्व बाबी सुरक्षित उड्डाणाचा पाया घालण्यास मदत करू शकतात. हा उद्योग भूतकाळातील घटनांमधून शिकून आणि नवीन तांत्रिक उपाय आणि धोरणे लागू करून उड्डाण-संबंधित जोखीम कमी करण्याचा प्रयत्न करत आहे. हवाई प्रवास हा जागतिक वाहतूक नेटवर्कचा एक महत्त्वाचा भाग असल्याने, प्रवासी आणि चालक दल दोघांचेही कल्याण सुनिश्चित करण्यासाठी सुरक्षिततेला प्राधान्य देणे आवश्यक आहे.

भारतासारख्या देशातही विमानप्रवास झपाट्याने वाढत आहे. भारतीय नागरी उड्डाण मंत्रालयाने अलीकडेच अनेक नवीन नियम लागू केले आहेत. ते विमानांची सुरक्षा सुनिश्चित करण्यावर लक्ष केंद्रित करतात. 'ब्यूरो ऑफ सिव्हिल एव्हिएशन सेफ्टी' (बीसीएएस) भारतातील नागरी विमान वाहतूक सुरक्षेसाठी मुख्य नियामक संस्था म्हणून काम करते. १९७८ मध्ये पांडे समितीच्या शिफारशींवर नागरी विमान वाहतूक महासंचालनालय (डीजीसीए) अंतर्गत सेल म्हणून त्याची स्थापना करण्यात आली. १९८७ मध्ये नागरी विमान वाहतूक मंत्रालयाअंतर्गत 'बीसीएएस'ची एक स्वतंत्र विभाग म्हणून पुनर्रचना करण्यात आली. 'डीजीसीए' भारतातील आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत हवाई वाहतूक सेवांचे नियमन करते आणि नागरी उड्डाणांशी संबंधित मानके आणि उपाय सेट करते. नागरी विमान वाहतूक मंत्रालयाने आंतरराष्ट्रीय मानकांनुसार विमान वाहतूक सुरक्षितता मजबूत करण्यासाठी विमान (सुरक्षा) नियम, २०२३ लागू केले आहेत. त्यात सुधारणा करण्यात आली आहे. अधिकृत आकडेवारीनुसार, विमान कंपन्यांना ऑक्टोबरमध्ये ६६६ बॉम्ब स्फोटाच्या धमक्या मिळाल्या, तर या नोव्हेंबर २०२४ पर्यंत अशा ९९९ धमक्या मिळाल्या. आता अशा धमक्या देणाऱ्यांवर एक लाख रुपयांचा दंड आकारण्यात येणार असून विमानप्रवासावर बंदी घालण्यात येणार आहे. अशा उपायांमधून आणि अपघातांमधून धडे घेऊन विमानप्रवास कितपत सुरक्षित करता येतो, ते आता बघायचे.

## चर्चा आजची

# राज्यकर्त्यांना पाझर फुटेल कधी?

राकेश लोहार

निसर्गाने भरभरुन दिलेल्या कोकणात सर्वाधिक पाऊस पडूनही नोव्हेंबर-डिसेंबरपासूनच पाणीटंचाईला सुरुवात होते. योग्य नियोजन नसल्याने पाण्याची टंचाई उद्‌भवते, हे सांगण्यास कुणा तज्ज्ञाची गरज नाही. पाणीटंचाई नेमकी कशामुळे निर्माण होते, हे शासनात बसलेल्यांनाही चांगले लक्षात आहे. मात्र, यातून मार्ग काढण्याऐवजी टंचाई कृती आराखडा तयार करण्यातच वर्षानुवर्षे स्वारस्य दाखविले जात आहे. यामागे नेमके कोणते अर्थकारण दडलंय, हे आता सर्वांना माहिती झालेय. रायगड हा कोकणातील एक प्रमुख आणि प्रगत जिल्हा अशी त्याची ओळख. एकीकडे प्रचंड औद्योगिकीकरण, दुसरीकडे पर्यटन आणि ऐतिहासिक स्थळांचा बोलबाला. १२० किलोमीटर लांबीचा समुद्रकिनारा रायगडाला लाभलेला आहे. सर्वाधिक पावसाची नोंद होऊन रायगडातील सावित्री, गांधारी, कुंडलिका, अंबा, पाताळगंगा या नद्यांना दरवर्षी प्रचंड पूर येतो. त्यात कोट्यवधींचे नुकसान होते. हा पूर पाहिल्यानंतर या जिल्ह्याला पाणीटंचाईचे चटके बसत असतील, यावर कोणी विश्वासही ठेवणार नाही. पुराचे पाणी थेट समुद्राला मिळते. त्यामुळे पावसाळा संपताच पाण्यासाठी बोंबा सुरू होतात. रायगडातील ग्रामीण आणि दुर्गम भागात पाण्यासाठीची वणवण पाचवीलाच पुजल्यासारखी झाली आहे. पावसाळा संपताच 'पाणी देता का हो कुणी' असे विचारण्याची वेळ ग्रामीण, दुर्गम भागातील जनतेवर येते. याला सरकारची आणि संबंधित प्रशासनाची मानसिकताच कारणीभूत आहे. मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्रात तुतलनेत पावसाचे प्रमाण कमी असूनही तेथे पाण्याचे उत्तम नियोजन करुन विविध पिकांचे उत्पादन घेतले जात आहे. त्यामुळे तेथील शेतकऱ्यांकडे आर्थिक सुबत्ता आलीय. इथे मात्र धो-धो पाऊस कोसळूनही डिसेंबरनंतर 'पाणी जपून वापरा हो' असे सांगण्याची वेळ येते. पावसाचे प्रचंड प्रमाण असताना, ते पाणी अडविण्यासाठी नियोजनबद्ध कार्यक्रमच आतापर्यंत राबविण्यात आलेला नाही. डोंगरमाथ्यावरुन खाली येणारे पाणी अडविण्यात येत नसल्याने ते थेट समुद्राला जाऊन मिळते. लोकसंख्यावाढीचा आलेख कायम चढता असताना, त्यामानाने पाणीयोजना राबविल्या जात नाहीत, याचे आश्चर्य वाटते. दरवर्षी इतके कोटी पाणीटंचाई निवारणार्थ खर्च केले आणि शेकडो टँकर उपलब्ध करुन दिले, हे सांगण्यातच धन्यता मानली जात आहे. दुर्गम किंवा अतिदुर्गम भागात टँकर पोहोचू शकत नाहीत, त्यामुळे तेथील महिलांना आजही डोक्यावर हंडा घेऊन पाण्यासाठी वणवण करावी लागते. चार-पाच मैलांची पायपीट केल्यानंतर हंडाभर पाणी मिळते, अशी अवस्था आहे. पाणी आणण्यासाठी महिलांबरोबर लहान-लहान मुलेही बाहेर पडतात, तर अनेकदा पुरुषांनाही धावावे लागते. दुर्गम भागात पाणीयोजना हाताच्या बोटावर पोहोचल्याही, परंतु त्या तकलादू निघाल्या, अशीच परिस्थिती आहे. त्यामुळे तहान भागवण्यासाठी हंडाभर पाण्यासाठी वाटेतील दगडधोंडे तुडवत जाताना होणाऱ्या वेदना या महिला किंवा पुरुषच सांगू शकतील. खरं तर, डोंगराळ भागात पाण्याचे नैसर्गिक स्त्रोत आहेत, त्या ठिकाणी नियोजन नसल्याने तेथील जनतेला पाणी-पाणी करावे लागते. अनेक संस्था, संघटना दरवर्षी पुढे येऊन आपापल्या परीने पाण्याचा थेंब-थेंब वाचविण्यासाठी 'वनराई बंधारे' बांधण्याची उपाययोजना करतात. पाणी अडवावे, हाच त्यामागचा प्रामाणिक उद्देश असतो. परंतु, ही उपाययोजना औटघटकेपुरतीच असते. म्हणूनच कायमस्वरुपी उपाययोजना आवश्यक आहे. पाणी मिळत नाही म्हणून जनतेने मोर्चे, आंदोलनाचा मार्ग स्वीकारायचा आणि नेत्यांनी, संबंधित अधिकाऱ्यांनी आश्वासनांवर त्यांची बोळवण करायची, हे असेच सुरू आहे. टंचाईग्रस्त भागात पाण्याचे टँकर आले म्हणजे पाणीटंचाई संपुष्टात आली, असे समजले जाते. टँकरमाफिया, संबंधित अधिकारी आणि स्थानिक नेत्यांची अभद्र युती पाणीटंचाई पोसत असते, असे म्हटले तर त्यात वावगे असे काही नाही. किनारपट्टीचा जिल्हा असतानासुद्धा रायगड जिल्ह्यात डिसेंबर उजाडताच ठिकठिकाणी पाण्याची कमतरता, हे दृश्य विचित्र वाटते. पिण्यायोग्य पाणी देताना होत असलेली तारांबळ पाहता, डोंगरावरुन समुद्राला मिळणारे पाणी कुठेतरी अडवा, हे जनतेने राज्यकर्त्यांना ओरडून सांगणे गरजेचे आहे. पाणी अडवले जात नसल्याने भूजल पातळीचे प्रमाण कोलमडून ती कोरडी पडत चालली आहे. रायगडातील काही ठिकाणी तर धरणांच्या कालव्यांची अवस्था दयनीय आहे. साफसफाईअभावी कचऱ्याचे ढिगारे या कालव्यांमध्ये दिसून येतात. धरण किंवा कालव्यांना गंभीरतेने न घेतल्याने येथील बागायती बहरल्याच नाहीत. त्यामुळे हंगामी पिके घेण्यावरदेखील आपसुकच बंधने आलीत. राज्यातील इतर भागांच्या तुलनेत रायगड म्हणूनच मागे पडला, हे खेदाने म्हणावेसे वाटते. लोकप्रतिनिधींनी आतातरी जागे व्हावे आणि सिंचन योजना प्रभावीपणे कशा राबविल्या जातील, यासाठी पाठपुरावा करुन दरवर्षी पाणीटंचाईत होरपळणाऱ्या जनतेचा दुवा घ्यावा. लोकसभा, विधानसभा निवडणुकीच्या काळात निवडणुकीच्या पाण्यासाठी प्रचार सभांमधून मोठ मोठी आश्वासने दिली. त्यामुळे सत्तास्थापनेनंतर सरकारच्या मनाला पाझर फुटावा आणि जिल्ह्यातील पाणीटंचाईचा प्रश्न कायमस्वरुपी निकाली निघावा, एवढीच माफक अपेक्षा!

## लोकसंसद

### ग्रामीण भागात बिबट्यांची दहशत

पूर्वी क्वचितच नजरेस पडणारे बिबटे आता सर्रास नागरी वस्तीत दिसू लागले आहेत. दररोज कुठे ना कुठे बिबट्याने घुसखोरी केल्याची बातमी वर्तमानपत्रात वाचायला मिळतेच. पूर्वी फक्त ग्रामीण भागात दिसणारे बिबटे आता पुण्या - मुंबई सारख्या मेट्रो शहरातही दिसत आहेत. पुण्या - मुंबई सारख्या मोठ्या शहरातील सोसायटी आणि कॉलनीतही बिबटे येत आहेत. बिबट्यांच्या या वाढत्या घुसखोरीमुळे नागरी वस्तीत भीतीचे सावट निर्माण झाले आहे. ग्रामीण भागात तर सर्रास बिबटे नजरेस पडत आहेत. सध्या ग्रामीण भागात ऊस तोडणी सुरू आहे. उसाच्या शेतात बिबट्यांची पिल्ले सापडत आहेत. ग्रामीण भागात बिबट्यांचा वावर नित्याचा बनला आहे. नागरी वस्तीत आणि शेतांमध्ये बिबट्यांचा वावर वाढल्याने बिबट्यांना पकडण्यासाठी वन विभागाकडून पिंजरे लावण्यात येतात. बिबटे नागरी वस्तीत घुसून पाळीव प्राण्यांचा फडशा पाडत आहे. काही वेळा तर बिबट्यांकडून नागरिकांवर जीवघेणे हल्ले देखील होत आहेत. दौंड, शिरूर या तालुक्यात बिबट्यांच्या हल्ल्यात एक महिला व दोन मुलांना जीव गमवावा लागला आहे. दौंड, शिरूर, आंबेगाव, जुन्नर या पुणे जिल्ह्यातील तालुक्यात बिबट्यांनी उच्छाद मांडला असून या भागात बिबट्यांची मोठी दहशत निर्माण झाली असून नागरिक भयभीत झाले आहे त्यामुळेच या नरभक्षक बिबट्यांना वन विभागाने ठार करावे अशी मागणी नागरिक करत आहेत अर्थात नरभक्षक बिबट्यांना ठार करणेच योग्य. याआधीही वन विभागाकडून नरभक्षक बिबट्यांना ठार मारण्यात आले आहे. काही वर्षापूर्वी जळगाव जिल्ह्यात एका नरभक्षक बिबट्याने उच्छाद मांडला होता. या नरभक्षक बिबट्याला वन विभागाकडून ठार मारण्यात आले होते. बिबट्यांना नागरी वस्तीत घुसखोरी का करावी लागते याचाही विचार आपण करायला हवा. बिबट्यांचा जो नैसर्गिक अधिवास समजला जातो ते जंगल आज राहिले नाही. माणसांनी स्वतःच्या फायद्यासाठी जंगलतोड केली. माणसांनी बिबट्यांच्या नैसर्गिक अधिवासात अतिक्रमण केले. माणसांनी बिबट्यांचा निवारा हिसकावून घेतला. माणसानेच आधी बिबट्याच्या निवाऱ्यात घुसखोरी केली त्यामुळे बिबट्याही आता नागरी वस्तीत घुसखोरी करीत आहेत. बिबट्यांनी जर नागरी वस्तीत घुसखोरी करू नये असे आपल्याला वाटत असेल तर बिबट्यांना पुन्हा त्याचा नैसर्गिक अधिवास मिळवून द्यायला हवा. यासाठी वन विभागाने ठोस उपक्रम राबवायला हवेत. जंगलतोड थांबवायला हवी. वृक्षतोड थांबवायला हवी. जंगलामध्ये रानावनामध्ये झुडपांची लागवड केली पाहिजे जर बिबट्यांना लपण्यासाठी झाडे झुडपे मिळाली तर ते शेतामध्ये येणार नाहीत. बिबट्यांना त्यांचा नैसर्गिक अधिवास मिळाला तर बिबटे नागरी वस्तीत घुसखोरी करणार नाहीत.

**– श्याम ठाणेदार, पुणे**

## दिनविशेष

# एक सशस्त्र क्रांतिकारक अनंत कान्हेरे

ज्यांनी भारताला ब्रिटीश राजवटीपासून मुक्त करण्यासाठी वयाच्या १८ व्या वर्षी आपले प्राण दिले असे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील एक सशस्त्र क्रांतिकारक अनंत लक्ष्मण कान्हेरे यांचा आज जन्मदिवस. ते गणेश दामोदर सावरकर आणि विनायक दामोदर सावरकर यांच्या पुढाकाराने स्थापन झालेल्या मअभिनव भारतफ या क्रांतिकारक संघटनेचे सदस्य होते.



नाशिकच्या इतिहासातील आणि भारतीय क्रांतिकारी संघर्षातील एक निर्णायक क्षण म्हणजे २१ डिसेंबर १९०९ रोजी अनंत कान्हेरे यांनी ब्रिटिश भारतात नाशिकचे जिल्हाधिकारी जॅक्सनची हत्या केली. अनंत कान्हेरे यांचा जन्म १८९२ मध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यातील आयनी मेटे या गावात झाला. त्यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण इंदूर आणि औरंगाबाद येथे पूर्ण झाले. १९०३ मध्ये कान्हेरे आपल्या काकांकडे पुढील शिक्षणासाठी औरंगाबादला गेले. तिथे काही काळ राहून १९०८ मध्ये ते पुन्हा औरंगाबादला परत गेले. तेव्हा ते गंगाराम रुपचंद श्रॉफ यांच्या घरात भाड्याने राहायचे. गंगाराम यांचा येवल्यात टोणपे नावाचा एक मित्र होता. त्या काळात अनेक गुप्त क्रांतिकारी संस्था कार्यरत होत्या. नाशिकमधील एका गुप्त संस्थेचा टोणपे हे सदस्य होते. गणू वैद्य आणि गंगाराम एकदा नाशिकमधील गुप्त क्रांतिकारी संस्थेसाठी शस्त्रे खरेदी करण्यासाठी केले होते. दोघेही औरंगाबादला असताना कान्हेरे वैद्यला भेटले. पुढे त्यांनी यावेळी झालेल्या मैत्रीवर ङ्गमित्रप्रेमम ही कादंबरी लिहिली. याच दरम्यान अनंत गुप्त क्रांतिकारी संघटनांच्या सदस्यांना भेटले आणि त्यानंतर क्रांतिकारी गटांच्या कार्याकडे ते आकर्षित झाले.

कृष्णाजी कर्वे यांच्या नेतृत्वाखालील क्रांतिकारक गटाने १९१० च्या पहिल्या महिन्यात जॅक्सनला संपवण्याचा निर्णय घेतला. सावरकर बंधू, मदनलाल धिंग्रा यांच्याकडून स्फूर्ती घेऊन अनंत कान्हेरे यांनी जॅक्सन याला ठार मारण्याचे ठरविले. २१ डिसेंबर १९०९ या दिवशी नाशिकमधील विजयानंद थिएटरमध्ये मशारदाफ या नाटकाचा प्रयोग जॅक्सनच्या निरोप समारंभासाठी ठरला होता. जॅक्सन मराठी भाषेचा आणि नाटकांचा चाहता असल्याने या प्रयोगास येणार होताच. नाटकाचा प्रयोग सुरू होण्यापूर्वी सर्वजण आपापल्या जागेवर स्थानपन्न होत असताना अनंतरावांनी जॅक्सनसमोर जाऊन खिशातले पिस्तुल काढून लागेपाठ तीन गोळ्या झाडल्या. यात जॅक्सन जागीच ठार झाला आणि कान्हेरेंना अटक झाली.

जॅक्सनच्या हत्येनंतर सुमारे चार महिन्यांनी १९ एप्रिल १९१० रोजी ठाणे तुरुंगात फाशी देण्यात आली. कान्हेरे यांनी वयाच्या १८ व्या वर्षी आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान दिले आणि अशा अनेक तरुणांच्या बलिदानामुळेच आज आपण स्वातंत्र्य उपभोगत आहोत. आपल्या प्राणाची आहुती देणारे हुतात्मा अनंत कान्हेरे यांना विनम्र अभिवादन!

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

७ जानेवारी

१) श्री.सखाराम रामचद्र पवार अलिबाग, ७-१-१९३३

२) श्री.अरविंद नथुराम तरे,अलिबाग, ७-१-१९४५

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**कै. प्रभावती महादेव पाटील स्मरणार्थ अलिबाग**

**स्व. परेश नवीनचंद्र गाला स्मरणार्थ सांताक्रूझ**

**स्व. कांतीलाल प्रेमजी गोसर, स्मरणार्थ, मुलुंड**

# सरकार कराड, मुंडेंना वाचविण्याच्या प्रयत्नात

## जितेंद्र आव्हाडांचा सरकारवर गंभीर आरोप

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

**मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणा संबंधित चर्चा करण्यासाठी विरोधकांच्या शिष्टमंडळातील नेत्यांनी राज्याचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची सोमवारी (दि.०६) भेट घेतली. या भेटीवेळी विरोधी पक्षातील नेत्यांनी राज्यपालांना निवेदन दिले. ज्यानंतर या नेत्यांनी राजभवानाबाहेर येऊन प्रसार माध्यमांशी संवाद साधला. सरकारला या प्रकरणी उशिरा शहाणपण सूचत असून सरकारकडून वाल्मीक कराड आणि मंत्री धनंजय मुंडेंना वाचविण्याचा प्रयत्न करण्यात येत असल्याचा गंभीर आरोप राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षाचे आ. जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे.**



यावेळी, आव्हाड म्हणाले की, हे जे जातीपातीचे राजकारण सुरू झाले आहे, ते पहिले थांबले पाहिजे. कारण संतोष देशमुख यांची हत्या झाल्यानंतर आम्ही त्यांची जात तपासली नाही. आम्ही सर्वजण एकत्र येऊन त्याविरोधात बोललो. अधिवेशनाच्या सुरुवातीलाच आम्ही याविषयी बोललो. मरणाला गेला, त्याला मारणाऱ्याचे उदात्तीकरण झाले तर महाराष्ट्राचे वाटोळे होईल, हे आम्ही आधीच सांगितले होते. मेलेल्या जात आहे का? या घटनेत माणुसकीची हत्या झाली. संतोष देशमुखांची निर्घृणपणे हत्या करण्यात आली. या सगळ्या प्रकरणाची घृणा पूर्ण महाराष्ट्रात आहे. यामध्ये कोणती जात आणायची. मी दुसऱ्याही समाजाला सांगतो की, तुम्ही एखाद्या खुन्याचे उदात्तीकरण कसले करता? त्यामुळे या प्रकरणी न्यायालयीन चौकशी करण्याचे कारण हे होते की याआधी जितके काही गुन्हे झाले आहेत, ते सर्व उघडकीस आले पाहिजेत, असे आव्हाडांकडून यावेळी सांगण्यात आले.

तर, बीडमधील राखेचे राजकारण, तिथल्या अवैध धंद्यांचे राजकारण, तिथे आजपर्यंत झालेल्या सर्व हत्या, त्या हत्येतील आरोपी या सर्वांचे न्यायालयीन चौकशी अंतर्गत चौकशी झाली पाहिजे. परंतु, आपण सर्वांनी जातीपातीमध्ये स्वतःला इतके कोंडून घेतले आहे की, या चौकशीची वाट लागेल, अशी चिंता आव्हाड यांनी व्यक्त केली आहे. तसेच, सोमनाथ सूर्यवंशी यांची परभणीत झालेली हत्या ही सुद्धा तितकीच गंभीर आहे. त्यामुळे हे प्रकरण झाकू नका. तसेच, संतोष देशमुख हत्या प्रकरणात सर्वात जास्त कोणाची चूक असेल तर पोलीस अधिकारी प्रशांत महाजन यांची आहे. जे मी विधानसभेत सुद्धा सांगितले. त्यावेळी सरकारने त्या अधिकाऱ्याची बाजू घेतली. त्याच महाजनची रविवारी बदली करावी लागली. महाजनने जर का अशोक सोनावणेची ॲट्रॉसिटी घेतली असती तर हा प्रकार झाला नसता. सरकारला उशीरा शहाणपण सूचत आहे. या सरकारकडून वाल्मीक कराड आणि मंत्री धनंजय मुंडेंना वाचविण्याचा प्रयत्न करण्यात येत असल्याचा आरोप आव्हाड यांनी केला आहे.

## मुंडेंच्या राजीनाम्याबाबत दानवे आक्रमक

**। मुंबई । प्रतिनिधी ।**



राज्यामध्ये कायदा सुव्यवस्था आहे की नाही, अशी स्थिती सध्या निर्माण झाली आहे. मराठवाड्यातील बीड जिल्ह्यात दिवसाढवळ्या सरपंचाची हत्या करण्यात आली. दुसरीकडे परभणीमध्ये सोमनाथ सूर्यवंशी या तरुणाचा पोलीस कोठडी पोलीसांच्या अमानुष मारहाणीमुळे मृत्यू झाला. या दोन्ही प्रकरणात राज्य सरकारने न्यायालयीन चौकशीचे आश्वासन दिले होते, मात्र अद्याप न्यायधीशांच्या नावाची घोषणा झालेली नाही. राज्य सरकार ऐकत नाही, त्यामुळे अखेर राज्याचे घटनात्मक प्रमुख राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांची सर्वपक्षीय पक्षाच्या नेत्यांनी भेट घेतली, असे विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी म्हटले आहे.

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणात मंत्री धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय गुंतलेले आहेत, त्यामुळे त्यांचा राजीनामा राज्यपालांनी घ्यावा, या प्रमुख मागणीसह इतर मागण्यांसाठी सर्वपक्षीय शिष्टमंडळाने राज्यपालांची भेट घेतली. माजी खासदार छत्रपती संभाजीराजे यांच्या नेतृत्वाखालील सर्वपक्षीय शिष्टमंडळाने राज्यपालांना मागणीचे निवेदन दिले.

यावेळी संभाजीराजे छत्रपती, खा. बजरंग सोनवणे, विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, काँग्रेस नेते आ. विजय वडेट्टीवार, राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षाचे आ. जितेंद्र आव्हाड, आ. संदिप शिरसागर, भाजपा आ. सुरेश धस, शिवसंग्राम पक्षाच्या ज्योती मेटे, स्वराज्य पक्षाचे सरचिटणीस धनंजय जाधव व उपाध्यक्ष अंकुश कदम उपस्थित होते.

## देशमुख हत्या प्रकरणावर मुंडे गप्प

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

बीडमधील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी सर्वपक्षीय नेत्यांचं शिष्टमंडळाने राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांची भेट घेतली आहे. कायदा सुव्यवस्थेप्रकरणी सर्वपक्षीय नेत्यांचं शिष्टमंडळ राजपाल राधाकृष्णनं यांना पत्र देणार आहे. भेटपूर्वी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना स्वराज्य संघटनेचे प्रमुख, मा. खा. संभाजीराजे छत्रपती यांनी मंत्री धनंजय मुंडे आणि मंत्री पंकजा मुंडे यांना सवाल विचारले आहेत.



संतोष देशमुख हत्याप्रकरणी पंकजा मुंडे का बोलत नाहीत? त्यांनी बोलायला पाहिजे. तसेच, तुरुंगात गेलेली माणसे धनंजय मुंडेंची कोण आहेत? असे प्रश्न संभाजीराजेंनी उपस्थित केले आहेत. संभाजीराजे म्हणाले की, संतोष देशमुख हत्याप्रकरणावर पंकजा मुंडे का बोलत नाहीत? त्यांनी बोलायला पाहिजे. हा महाराष्ट्राच्या अस्मितेचा प्रश्न आहे. हा काही एका जातीचा मुद्दा नाही. हा महाराष्ट्राचा मुद्दे आहे. अत्यंत क्रूर पद्धतीने ही हत्या केली आहे. असेच महाराष्ट्रात चालू राहिल. हे महाराष्ट्राला परवडणारे आहे का? मग कशाला शिवाजी महाराज, शाहू, फुले, आंबेडकर यांचे नाव घ्यायचे? वाल्मिक कराड हा कोणाचा माणूस आहे? तुमचा काही संबंध नाही, तर धनंजय मुंडेंनी राजीनामा द्यावा. त्याचे व्यावसायिक संबंध आहेत. वाल्मिक कराडला वटमुक्तीपत्र दिले आहे. वटमुक्तीपत्र कुणाला दिले जाते, जो विश्वासू आहे, असे संभाजीराजेंनी सांगितले.

## बांगलादेशी तरुणीला अटक

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

उल्हासनगर गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अशोक कोळी यांच्या पथकाने बुधवारी (दि.१) बांगलादेशी तरुणीला जेरबंद केले आहे. खडे गोळवली येथे गंगाविहार कॉलनीत बांगलादेशी तरुणी वास्तव्य करीत असल्याची माहिती मिळताच वरिष्ठ पोलिस निरीक्षक अशोक कोळी, सहायक पोलिस निरीक्षक बबन बांडे, हवालदार जाधव, सपकाळे, पाटील, शिपाई उगले, महिला पोलिस कुसुम शिंदे यांनी माहितीच्या अनुषंगाने सापळा रचून कारवाई केली होती. यावेळी सलमा शेख (२७) या तरुणीला ताब्यात घेतले आहे.

## शरद पवारांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणावरून खा. बजरंग सोनवणे, आ. सुरेश धस, आ. जितेंद्र आव्हाड, आ. संदीप क्षीरसागर, आ. प्रकाश सोळंके यांच्यासह अनेक लोकप्रतिनिधी सातत्याने आवाज उचलत आहेत. याच लोकप्रतिनिधींना गुंडांपासून जीवाला धोका निर्माण होऊ शकतो. याच पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून पोलीस संरक्षण पुरवावे, अशी मागणी केली आहे.



शरद पवार यांनी सोशल मीडीयावरील पोस्टमध्ये लिहिले आहे की, बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच स्व. संतोष देशमुख यांची महिनाभरापूर्वी काही गुंडांनी निर्घृण हत्या केली. या क्रूर घटनेला भला मोठा काळ उलटून गेला असला तरी देशमुख यांचे मारेकरी अद्याप मोकाटच असल्याची जनभावना आहे. त्यामुळे, या संपूर्ण घटनेला फार मोठी गुन्हेगारी पार्श्वभूमी असल्याचे निदर्शनास येते. असे असताना याच गुंडांपासून या लोकप्रतिनिधींच्या जीवाला धोका निर्माण झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी याचे गांभीर्य लक्षात घेऊन या लोकप्रतिनिधींच्या व इतर नेत्यांच्या सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेत त्यांना राज्य शासनामार्फत योग्य ते पोलीस संरक्षण पुरवावे, अशी मागणी शरद पवार यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

## जुन्या कसारा घाटात अपघात

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

मुंबई–नाशिक महामार्गावरील जुन्या कसारा घाटात रविवारी (दि.५) कंटेनर उलटल्याने आणि मालवाहू ट्रक रस्त्यात बंद पडल्याने वाहतुक कोंडी झाली होती. या वाहतुक कोंडीमुळे रविवारी सुट्टी निमित्ताने बाहेर पडलेल्या नागरिकांचे हाल झाले होते. अवघ्या १० ते १५ मिनिटांचे अंतर पार करण्यासाठी वाहन चालकांना सुमारे पाऊण तास लागत होता. या मार्गावर वाहतुक एकेरी मार्गिकेने संथ गतीने सुरू होती. सकाळी १० वाजेपर्यंत जुन्या कसारा घाटातील वाहतूक कोंडी सुटली नव्हती. त्यामुळे कोंडी सोडविताना पोलिसांच्या नाकी नऊ आले होते. काही बेशिस्त वाहन चालकांनी विरुद्ध दिशेने वाहने चालविण्यास सुरूवात केल्याने कोंडीत भर पडली. दरम्यान, आपत्ती व्यवस्थापन पथकाचे सदस्य वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी जव्हार फाटा येथे पोहचले. त्यांनी महामार्ग पोलिसांच्या मदतीने हलकी वाहने पर्यायी रस्त्याने वळविली. दुपारी १२ नंतर येथील वाहतुक कोंडी सुरळीत झाली.

## गायकवाडांच्या विधानावर राऊतांचा संताप

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

शिवसेना शिंदे गटाचे आ. संजय गायकवाड हे नेहमीच काही ना काही वादग्रस्त विधान करत असतात. बुलढाणा जिल्ह्यातील जयपूर येथे दोन दिवसांपूर्वी एका सत्कार सोहळ्यात गायकवाड यांनी मतदारांसाठी आक्षेपार्ह शब्द वापरला. इतकेच नाही, तर त्यांनी मतदारांना शिवीगाळ सुद्धा केली. गायकवाड यांचा हा व्हिडीओ आता सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. त्यांनी केलेल्या विधानामुळे शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे खा. संजय राऊत संतापले आहेत.



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या शिवसेनेतील या आमदाराचा राजीनामा घ्यावा, असे राऊतांनी म्हटले आहे.

आ. संजय गायकवाड यांनी एका सत्कार समारंभात भाषण करताना आमदारांना शिवीगाळ केली. ते म्हणाले की, तुम्ही फक्त एक मत मला देऊ शकत नाही. फक्त दारू, मटण आणि पैसे. अरे दोन–दोन हजारात विकले गेले भाड साले. यांच्यापेक्षा तर वेश्या बऱ्या. असे विधान केले होते. त्यांच्या या विधानाचा व्हिडीओ सगळीकडे जोरदार व्हायरल करण्यात आला. याबाबत खा. संजय राऊत यांनी संताप व्यक्त केला आहे. संजय राऊत यांनी सोमवारी (दि.०६) प्रसार माध्यमांशी संवाद साधला. तेव्हा ते म्हणाले की, मतदारांना जर कोणी वेश्या म्हणत असेल, लोकशाहीला कोणी रखेल म्हणत असेल, संविधानाला कोणी गुलाम मानत असेल आणि त्यातही ते सत्ताधारी पक्षाचे आमदार असतील तर देवेंद्र फडणवीस हे राज्याचे मुख्यमंत्री आहेत आणि ही त्यांची जबाबदारी आहे.

तसेच, दोन–दोन हजारांना मतदार विकत घेऊन, त्यांना अशा प्रकारे अश्लील बोलणे, वेश्या बोलणे या संदर्भात विधानसभेचे अध्यक्ष, राज्यपाल यांनी मत व्यक्त केले पाहिजे. महत्त्वाचे म्हणजे मतदारांना विकत घेण्यात आले, हे आम्ही आधीच सांगितले होते, असे यावेळी खासदार संजय राऊत यांच्याकडून सांगण्यात आले. तर, शिंदे गटाचे जे आमदार आहेत, संजय गायकवाड यांनी केलेले विधान हे अधिक गंभीर आहे. या महाराष्ट्रातील कोट्यावधी मतदारांना जर कोणी वेश्या म्हणत असेल तर त्यांच्या नेत्यांनी म्हणजे एकनाथ शिंदेंनी त्यांचा राजीनामा घेतला पाहिजे. यांना मतदार वेश्या वाटतात. त्यांचे मत तुम्ही लोकांनी पैसे देऊन विकत घेतले असेल, हे मी मान्य करतो. पण तुम्ही त्यांना वेश्या म्हणत आहात. मी तुमचा गुलाम आहे का? असे अजित पवार म्हणत आहेत. पण यांना कोणत्या गोष्टीचे नैराश्य आले आहे, हे या राज्याला समजले पाहिजे, असे म्हणत खासदार संजय राऊत यांनी आपला संताप व्यक्त केला आहे.

## महायुतीत कायमच धुसफूस राहणार

### खा. संजय राऊत यांचा आरोप

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

महायुतीचे सरकार स्थापन होऊन एक महिना झाला आहे. मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्र्यांच्या शपथविधीनंतर दहा दिवसांनी राज्य मंत्रिमंडळाचा पहिला विस्तार झाला. त्यालाही आता २२ दिवस होत आहेत. मात्र, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अजून पालकमंत्री नेमलेले नाहीत. तीन पक्षांचे महायुती सरकार असल्यामुळे देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असले तरी त्यांना पालकमंत्र्यांची नेमणूक करणे सोपे नाही. कोणाचीही पालकमंत्री म्हणून नेमणूक केली तरी धुसफूस सुरु राहणार आहे, असा टोला खा. संजय राऊत यांनी लगावला आहे.



संजय राऊत म्हणाले की, तीन पक्षांचे हे सरकार आहे. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असले तरी त्यांना पालकमंत्र्यांची नेमणुक करे सोपे नाही. कोणाचीही पालकमंत्री म्हणून नेमणूक केली तरी महायुतीमध्ये धुसफूस होणार आहे. फक्त एवढ्यावरच धुसफूस होणार नाही, त्यांच्यातील हा वाद शेवटपर्यंत असाच सुरु राहणार असल्याचा टोला राऊत यांनी लगावला आहे.

ते पुढे म्हणाले की, ठाणे, रायगड, गडचिरोली, पुणे, नागपूर या जिल्ह्यांचे पालकमंत्री नेमणुका करणे महायुती सरकारमधील नेत्यांसाठी सोपे नाही. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना त्यांना पालकमंत्रीपद जाहीर करता येत नाही, हे वाईट आहे. देशाचा प्रजासत्ताक दिन २० दिवसांवर आला आहे. अजूनही पालकमंत्र्यांची नेमणूक केलेली नाही. पालकमंत्री हे जिल्ह्याजिल्ह्यात प्रजासत्ताक दिनाला ध्वजारोहण करतात. मात्र, २६ जानेवारी जवळ येईपर्यंत पालकमंत्रीपद जाहीर करता न येणे वाईट आहे. पालकमंत्रीपदाचा हा तिढा शेवटपर्यंत कायम राहील, महायुतीमधील ही धुसफूस सुरुच राहणार आहे. असेही संजय राऊत म्हणाले आहेत.

## मुंडे धाराशिवचे पालकमंत्री नकोच




### मराठा समाजाचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

**। धाराशिव । प्रतिनिधी ।**

जिल्ह्यात पवनचक्कीचे जाळे पसरले आहे. पवनचक्कीसाठीच मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या करण्यात आली आहे. त्यातच बीड जिल्ह्यातील धनंजय मुंडे यांचे नाव धाराशिव जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदासाठी घेण्यात येत आहे. धाराशिव हा सुसंस्कृत जिल्हा असून बीडसारखी गुंडगिरी धाराशिव जिल्ह्यात नाही. त्यामुळे धनंजय मुंडे यांना धाराशिवचे पालकमंत्री करु नये. तसेच, धनंजय मुंडे यांचा तात्काळ राजीनामा घ्यावा व प्रकरणाची सखोल चौकशी करावी, अशा मागणीचे निवेदन सोमवारी (दि.६) मराठा समाज संघटनाच्यावतीने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना देण्यात आले आहे.

या निवेदनात म्हटले आहे की, बीड जिल्ह्यातील मंत्री धाराशिव जिह्याचा पालकमंत्री होण्यासाठी काही हालचाली सुरू आहेत. बीड येथील अवैध, गुन्हेगारी स्वरुपाची संस्कुती धाराशिव जिह्यात नाही. धाराशिव जिल्हा हा उद्धवराव पाटील, प्रमोद महाजन यांच्या विचाराने प्रेरित असून आपल्या जिल्ह्यात गुन्हेगारी वाढणार नाही, याची काळजी घेत आपण आपली वाटचाल करतो. पवनचक्कीसाठी झालेला संतोष देशमुख यांच्या हत्येची घटना गंभीर आहे. धाराशिव जिल्ह्यामध्येही असेच पवनचक्कीचे जाळे पसरले आहे. त्यामध्ये अशीच गुंड प्रवृत्तीचे लोक त्यांना या जिल्ह्यात आणण्यासाठी प्रयत्न करत आहेत.

आम्ही धाराशिवकर म्हणून हे कदापी होऊ देणार नाही. तसेच, या संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात आरोपी गुंड प्रवृत्तीचे सराईत गुन्हेगार असताना यांच्यावर बीड जिह्यातील मंत्री धनंजय मुंडे त्यांचा हस्तक वाल्मीक कराड व बगलबच्चे यांना वाचवण्याचे प्रयत्न होत आहेत. तसेच, चौकशी समिती एस.आय.टी जरी नेमली असली तरी त्या एस.आय.टीमध्ये त्यांच्या निकटवर्तीय अधिकारी असल्याचे काल पुराव्यानिशी नमुद केले आहे.

## अजित पवारांना भुजबळांचा सल्ला

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी रविवारी (दि.५) बारामतीत सतत निवेदन देणाऱ्या कार्यकर्त्यांना झापले होते. अजित पवार यांनी, तुम्ही मते दिली म्हणजे मालक नाही झालात, अशा शब्दांत कार्यकर्त्यांना सुनावले होते. अजित पवार यांच्या विधानानंतर राजकीय वर्तुळातून वेगवेगळ्या प्रतिक्रिया येत असताना राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी अजित पवार यांना सल्ला दिला आहे. अजित पवार यांनी नी एवढं बोलायला नको होते, एवढेच मी म्हणेन, असे मत छगन भुजबळ यांनी व्यक्त केले आहेत.

दरम्यान, एका कार्यकर्त्याने बरेच महिने झाले हे काम झाले नाही, असा धोशा लावला होता. त्यानंतर दुसऱ्याही कार्यकर्त्याने त्याच्या सुरात सूर मिसळला. हे पाहून अजित पवार यांनी 'तुम्ही मते दिली म्हणजे माझे मालक नाही झाला', असे सुनावले होते. यामुळे कार्यक्रमाच्या ठिकाणी शांतता पसरली. यावेळी, प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना छगन भुजबळ म्हणाले की, अजितद पवार यांनी एवढं बोलायला नको होते, एवढेच मी म्हणेन. जनता आपल्या मंत्र्यांचे मालक आहेत की नाही ही गोष्टच नाही. मतदाता हे राज्याचे आणि देशाचे मालक आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सगळ्यांना देशाचे मालक बनवले आहे. तसेच, बुलढाण्यातील




शिंदेंच्या शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी मतदानांना शिव्याची लाखोली वाहिली होती. यावर भुजबळांनी म्हटले की, एकनाथ शिंदेंनी संजय गायकवाडांना लगाम लावायला हवा. माझ्या बाबतीतही त्यांनी अशीच काही वक्तव्ये केली होती. एकनाथ शिंदेंनी त्यांना समजवायला हवे, असेही ते म्हणाले.

### पुन्हा दुर्घटना घडली तर जबाबदार कोण? | मुंबई जलवाहतूक संस्थेचा संतप्त प्रश्न

## समुद्रातील दिशादर्शक यंत्रणा ठप्प

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबईहून घारापुरी येथे जाणाऱ्या 'नीलकमल' बोटीच्या अपघातात १५ जणांचे बळी गेल्याची घटना ताजी असतानाच बंदर विभाग मात्र अद्यापही कुंभकर्णी झोपेत आहे. मोरा आणि रेवस सागरी मार्गावरील समुद्रातील दिशादर्शक यंत्रणाच गेल्या अनेक वर्षांपासून ठप्प असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. वाढत्या प्रदूषणामुळे धुरके पसरत असल्याने सिग्नल यंत्रणेअभावी या मार्गावर प्रवासी बोटी भरकटतात आणि गाळातही रुतून बसतात. त्यामुळे पुन्हा एकदा मोठी दुर्घटना घडली तर जबाबदार कोण, असा संतप्त सवाल मुंबई जलवाहतूक संस्थेने केला आहे.



मोरा आणि रेवस मार्गावर दररोज हजारो प्रवासी प्रवास करत असतात. शॉर्टकट आणि वाहतूककोंडी मुक्त प्रवासामुळे प्रवासी याच जलमार्गाला सर्वाधिक प्राधान्य देतात. या आधी मोरा आणि रेवस या दोन्ही बंदरांच्या दरम्यान दिशादर्शक सिग्नल यंत्रणा कार्यरत होती. समुद्रातच लाल आणि हिरव्या रंगाचे दिवे असलेले दिशादर्शक बोये टाकण्यात येत होते. त्यामधील समुद्र खाडी चॅनलमधून प्रवासी वाहतूक करणाऱ्या बोटी बिनदिक्कतपणे योग्य दिशेने अचूक मार्गक्रमण करीत असत.

परंतु, मागील काही वर्षांपासून मोरा आणि रेवस या दोन्ही बंदरांतून दिशादर्शक सिग्नल यंत्रणा बंद पडली आहे. यामुळे सकाळी पडणारे दाट धुके आणि रात्रीच्या प्रवासात प्रवासी वाहतूक करणाऱ्या बोटींच्या खलाशांना बंदरांचा अंदाज येत नाही. यामुळे खलाशी अंदाजे बोटी चालवत असतात. या बोटी मग भरकटतात आणि गाळात रुतून बसतात.

> **रेवस आणि मोरा या दोन्ही बंदरांतील चॅनल आणि जेट्टीवर दिशादर्शक सिग्नल यंत्रणा कार्यान्वित करण्याची मागणी सातत्याने आम्ही बंदर विभागाकडे करत आहोत. मात्र, बंदर विभागाचे अधिकारी त्याकडे दुर्लक्षच करीत असल्याची खंत आहे. तसेच, बंदर विभागाचे अधिकारी आणखी मोठी दुर्घटना घडण्याची वाट पाहात आहेत काय, असा संतप्त सवालही जनसामान्यांतून होत आहे.**
>
> **– शराफत मुकादम, सेक्रेटरी, मुंबई जलवाहतूक संस्था**

## निवडक



### ब्रह्मचैतन्य मासिक संगीत सभा संपन्न

**पनवेल :** श्री ब्रह्मचैतन्य मासिक संगीत सभेचे ३८ वे पुष्प संपन्न झाले. पनवेल येथील गोंदवलेकर महाराज नामस्मरण केंद्रामधे संपन्न झालेल्या या कार्यक्रमात पनवेल येथील प्रसिद्ध गायिका संध्या आघारकर-घाडगे यांनी गायन सेवा सादर केली. आपले वडील कै. प्रभाकर आघारकर तसेच कै. शैलजा तळेकर व कै. चारुशीला दिवेकर यांच्याकडून गायनाचे शिक्षण घेतलेल्या संध्या घाडगे यांनी आपल्या संगीत सभेची सुरुवात पूरिया धनश्री या रागाने केली. त्यानंतर त्यांनी रामाचे भजन, जनी म्हणे पांडुरंगा, नाम गाऊ नाम घेऊ, बोलावा विठ्ठल हे अभंग सादर केले.नंतर त्यांनी संगीत मंदरमाला नाटकातील 'सोहम हर डमरू वाजे' व 'मन हो राम रंगी रंगले' हे नाट्यगीत सादर केले.त्यानंतर त्यांनी 'अवघा तो शकुन' व 'पद्मनाभा नारायणा' हे अभंग सादर करून 'राम नाम ज्याचे मुखी' या भैरवी रागातील अभंगाने संगीत सभेची सांगता केली. संध्या घाडगे याना नंदकुमार कर्वे यांनी संवादिनी, गणेश घाणेकर यांनी तबला, मंगेश साळुंखे यांनी पखवाज, प्रतिक जेऊर्गी यांनी तालवाद्य आणि चेतना वालावलकर यांनी तानपुरासाथ केली. समीर सोमण यांनी कार्यक्रमाचे निवेदन केले. किरण गोखले यानी ध्वनिसंयोजन केले. ही सभा यशस्वी होण्यासाठी मठातील कार्यकर्ते आणि संगीत सभेच्या आयोजकांनी मोलाचे योगदान दिले.



### एनएसएसच्या शिबिराचा शुभारंभ

**तळे :** राष्ट्रीय सेवा योजना विशेष हिवाळी निवासी शिबीर उद्घाटन सोहळा वाशी हवेली येथे संपन्न झाला. या कार्यक्रमास उद्घाटक म्हणून संस्थेचे विश्वस्त मारुती शिर्के लाभले. तर या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संस्थेचे उपाध्यक्ष पुरुषोत्तम मुळे यांनी भूषविले. तसेच या सोहळ्याचे स्वागत अध्यक्ष महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन डॉ. श्रीनिवास वेदक हे होते. यावेळी कार्यकारी मंडळाचे सदस्यदीपक कोटिया, महादेव बयकर, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य बी. के. पटेल, वाशी हवेली गावचे अध्यक्ष, महिला अध्यक्षा, माजी सरपंच, ग्राम स्वच्छता कमिटी, नळ पाणी पुरवठा कमिटी, तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ व महिला उपस्थित होते. यावेळी ग्रामस्थांनी पारंपरिक पद्धतीने मिरवणूक काढून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे, पदाधिकाऱ्यांचे स्वागत केले. हे निवासी शिबीर दि.४ जानेवारी ते १० जानेवारी असे सात दिवस चालणार आहे. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक कार्यक्रम अधिकारी डॉ. कुंटेवाड यांनी केले. प्राचार्य मनोगत डॉ. नानासाहेब यादव यांनी केले. तसेच मारुती शिर्के, पुरुषोत्तम मुळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी महाराष्ट्र शासनाच्या वाचन संकल्प महाराष्ट्राचा या अभियान या अभियानांतर्गत ग्रंथ दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महिला मंडळ वाशी हवेली विद्यार्थी आणि ग्रामस्थ खूप मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता वाशी हवेली ग्रामस्थ, महिला मंडळ, महाविद्यालयीन प्राध्यापक व कर्मचारी या सर्वांचे सहकार्य लाभले.



### विज्ञान प्रदर्शनात पन्हेळीचे यश

**तळा :** तळा तालुका पंचायत समिती, अभिनव ज्ञान मंदिर उसर खुर्द व गणित विज्ञान अध्यापक मंडळ यांचे वतीने दि. ०२ जानेवारी २०२५ व ०३ जानेवारी २०२५ रोजी अभिनव ज्ञान मंदिर उसर खुर्द या वठकाणी तळा तालुकास्तरीय २१ वे विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. सदर प्रदर्शनात तळा तालुक्यातील प्राथमिक गट (इ. १ली ते. इ.५वी) गटात ०५, उच्च प्राथमिक गट (इ. ६ वी ते इ. ८ वी) गटात २५, माध्यमिक गट (इ. ९ वी ने इ.१०वी) - १० व उच्च माध्यमिक गट (इ.११ वी ते इ. १२वी) ०३ प्रतिकृतीसह विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.सदर विज्ञान प्रदर्शनात इ. ९ वी ते इ. १० वी माध्यमिक गटात डॉ. प्र.म. जोशी प्रशाला, पन्हेळी विद्यालयातील इ. ९ वी वर्गातील कु. जान्हवी जनार्दन पाखड या विद्यार्थीनीने कचरा संकलन प्रतिकृतीसह सहभाग घेतला. सदर माध्यमिक गटात कु.जान्हवी जनार्दन पाखड या विद्यार्थीनीने कचरा संकलन प्रतिकृतीस प्रथम क्रमांक पटकावला व सदर प्रदर्शनात घेण्यात आलेल्या प्रश्नमंजुषा स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावला. विज्ञान शिक्षिका देवयानी भौड व विद्यार्थीनीचे यशाबदल संस्था अध्यक्ष, उपाध्यक्ष सचिव व सर्व पदाधिकारी, शालेय समिती चेअरमन व सर्व सदस्य विद्यालयाच्या मुख्याध्यापिका, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग पंचक्रोशीतील ग्रामस्थ व पालक यांनी अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **जमिनीची खरेदी व विक्री** अलिबाग परिसरात NA. Plat उपलब्ध बुरुमखान, भुते, खडताळपुल, एरियामध्ये जागा उपलब्ध. सहाण, खानाव, भादाणेमध्ये जागा उपलब्ध. ऑफीस सन स्टोन रीयल इस्टेट अलिबाग, साईना कॉम्प्लेक्स, बायपास रोड ८६६९००६९०२,९२७०८८८८०३
- **Vacancy for Office staff** in Alibag Interested Graduate candidates can call 9923750549 For interview

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

### कुरवडे - मारळ पर्वतावरील बॉक्साईट मायनिंगला विरोध

# प्रकल्पाविरोधात नागरिक आक्रमक

**। हरिहरेश्वर । वार्ताहर ।**

दक्षिणकाशी तीर्थक्षेत्र म्हणून प्रसिद्ध असलेल्या हरिहरेश्वर जवळील कुरवडे - मारळ या दोन गावांना जोडुन असलेल्या मोरेश्वर पर्वतावर बॉक्साईट मालाच्या उत्खननामुळे येथील निसर्गरम्य पर्वत पूर्णपणे नष्ट होत असल्यामुळे येथील बॉक्साईट मायनिंग प्रकल्प तातडीने बंद करण्यात यावा या करीता येथील नागरिकांनी आक्रमक पवित्रा घेऊन शासनाकडे तक्रारी अर्ज दिला आहे. या दिलेल्या अर्जाच्या अनुषंगाने श्रीवर्धन तहसिल कार्यालयाकडून या बॉक्साईट मायनिंग प्रकल्पाची पहाणी करण्यात आली.



याबाबत सविस्तर वृत्त असे की, श्रीवर्धन तालुक्यातील कुरवडे आणि मारळ या दोन गावांच्या मध्ये असलेल्या मोरेश्वर पर्वतावर अलतगे स्टोन क्रशिंग इंडस्ट्रीज या कंपनीने मोठया प्रमाणात बॉक्साईट मालाचे उत्खनन करताना सुरुंग स्फोट घडवून तसेच पोकलन मशिन आणि जेसीबी मशिनद्वारे उत्खनन करुन येथील डोंगरपर्वत पूर्णपणे उध्वस्त केल्यामुळे या पर्वताला मोठमोठ्या भेगा पडून जमीन कमकुवत झाल्यामुळे भूस्खलनाचा धोका निर्माण झालेला आहे.

महाड येथील जुई, दासगांव आणि तळीये, खालापुर येथील ईर्शालवाडी, पुणे येथील माळीण आणि केरळ येथील वायनाड सारखी परिस्थिती भविष्यात उद्भवणार असल्यामुळे नागरिक भयभीत झाले आहेत. त्यामुळे बॉक्साईट उत्खनन करणाऱ्या कंपनीवर आणि संबंधितावर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी जोर धरत आहे.

श्रीवर्धनचे मंडळ अधिकारी कमलाकर गायकवाड आणि ग्राममहसुल अधिकारी बाळकृष्ण भामरे यांनी बॉक्साईट मायनिंग प्रकल्पाची पहाणी केली त्यावेळी उपस्थित नागरिकांनी त्यांचे लक्ष वेधुन हा बॉक्साईट मायनिंग प्रकल्प विनाशकारी असल्याबाबतची माहीती तसेच येणाऱ्या समस्या व अडचणी सांगितल्या आहेत.

यावेळी कुरवडे गावचे अध्यक्ष योगेश पडयाळ, मारळ गावचे अध्यक्ष दिपक कवडे आणि बाणगंगा गावचे अध्यक्ष अशोक शिगवण, दिपक आरेकर, पत्रकार संदिप जाधव, पत्रकार संतोष जाधव, मारळ माजी सरपंच मंगेश चाचले, माजी सरपंच सागर चाचले, दिनेश भोजने, दिपक गोरिवले,रमाकांत पडयाळ मितेश लोहार, प्रथमेश पड्याळ, आतेश भुवड, पराग मयेकर, अमृत शिगवण, वैभव पड्याळ, संदेश शेडगे, वामन तटकरे, दयाराम खोपटकर, सिताराम खोपटकर, वैभव खोपटकर तसेच कुरवडे, मारळ, बाणगंगा (कोंडी) आणि हरिहरेश्वर परिसरातील नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते. या बॉक्साईट मायनिंग प्रकल्पामुळे पौराणिक आणि निसर्गरम्य पर्वत नामशेष होऊन या दोन गावांना धोका पोहचणार आहे तसेच पर्यटन व्यवसायावरही त्याचा परिणाम होणार असल्यामुळे हा प्रकल्प कायमस्वरुपी बंद करण्याची मागणी पंचक्रोशीतील नागरिकांनी केली आहे.

### गोविंद माने यांचे निधन

**। खांब । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील बाहे गावचे रहिवासी असणारे व आदर्श शेतकरी गोविंद जानू माने यांचे शुक्रवारी (दि.३) वयाच्या ७० व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. गोविंद माने यांनी आपल्या हयातीत शेती व्यवसाय स्वीकारून शेती क्षेत्रासाठी व आपल्या गावासाठी बहुमोलाचे योगदान दिले. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी यांच्यासह त्यांचे आप्तस्वकीय मित्रपरिवार सगेसोयरे यांनी त्यांच्या निवासस्थानी भेट देऊन त्यांचे अंत्यदर्शन घेऊन त्यांच्या परिवाराचे सांत्वन केले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सुन, नातवंडे असा परिवार असून त्यांचे दशक्रियाविधी व अंतिम धार्मिकविधी हे दोन्ही विधी रविवारी (दि.१२) राहत्या निवासस्थानी होणार असल्याची माहिती त्यांच्या निकटवर्तीयांकडून देण्यात आली आहे.

### कोलाड लायन्स क्लबच्या वतीने

## आदिवासी विद्यार्थ्यांना ब्लँकेट वाटप

**। कोलाड । वार्ताहर ।**

जिल्हा परिषद शाळा धानकान्हे आदिवासी वाडी येथील विद्यार्थ्यांना अलंकार खांडेकर यांच्या सौजन्याने व कोलाड लायन्स क्लबच्या वतीने ब्लँकेट वाटप करण्यात आले.



कोलाड लायन्स क्लबचे बोर्ड ऑफ डायरेक्टर अलंकार खांडेकर यांच्या विशेष सौज्यन्यातून संस्थापक अध्यक्ष डॉ. सागर सानप, माजी अध्यक्ष नरेश बिरगावले, अध्यक्ष डॉ. मंगेश सानप यांच्या मार्गदर्शनाखाली कोलाड लायन्स क्लबच्या वतीने येथील विद्यार्थी वर्गाला थंडीच्या दिवसांत या उबदार पांघरूणाचे वाटप करण्यात आले.

यावेळी डॉ. श्यामभाऊ लोखंडे, रविंद्र लोखंडे, राजेंदर कप्पु, नंदकुमार कळमकर, दिलिप मोहिते, वैशाली सलागरे, मारोतराव कोरडे, शिक्षिका शोभा खांडेकर, पांडुरंग गोसावी, महादेव जाधव, संजना जाधव आदी उपस्थित होते.

## तरुणांनी वारकरी संप्रदायाकडे वळावे- कैलाश भोईर

**। नेरळ। प्रतिनिधी।**

वारकरी संप्रदाय हे कोणत्याही व्यक्तीला समाजात ताठ मानेने जगण्याची ऊर्जा देत असते. त्यामुळे या काळात प्रामुख्याने तरुणांनी वारकरी सांप्रदायाकडे वळावे, असे आवाहन कैलाश भोईर यांनी केले. तालुक्यातील फराट पाडा येथे आयोजित अखंड नामयज्ञ सोहळ्यात काल्याचे कीर्तन कार्यक्रमात ते बोलत होते.



कळंब वांगणी रस्त्यावरील फराट पाडा येथील श्रीराम ग्रामस्थ मंडळ यांच्या माध्यमातून अखंड नामयज्ञ सोहळा आयोजित करण्यात आला होता.

त्यावेळी दीपोत्सव निमित्त शीतल साबळे यांनी हरिकिर्तन सादर केले. काल्याचे कीर्तन कैलाश भोईर यांनी केले. नितीन मंगळ फराट यांनी बहरीनाम सप्ताह फराटपाडा गावात सुरू केला. संभाजी अनंता कडव, जगदीश सिंग (पापाजी) आणि कैलाश भोईर यांनी हा सप्ताह सुरू करण्यात महत्वाची भूमिका बजावली आहे.

## तालुकास्तरीय दोन दिवसीय विज्ञान प्रदर्शन उत्साहात

### प्रदर्शनात विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक प्रयोगांनी वेधले उपसिथत मान्यवरांचे लक्ष

**। माणगाव । वार्ताहर ।**

शाश्वत विकासासाठी विज्ञान तंत्रज्ञान हे ब्रीदवाक्य डोळ्यांसमोर ठेवून व भविष्यातील भारतासाठी शास्त्रज्ञ निर्माण करण्याहेतू माणगाव पंचायत समिती, अशोकदादा साबळे विद्यालय माणगाव व गणित विज्ञान अध्यापक मंडळ ता.माणगाव यांच्या संयुक्त विद्यमाने माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अशोकदादा साबळे विद्यालय, माणगाव येथे दोन दिवसीय विज्ञान प्रदर्शन भरविण्यात आले होते.



या विज्ञान प्रदर्शनात प्राथमिक गटात ४९ तर माध्यमिक गटात ३३ उपकरणांची मांडणी करण्यात आली असून नव साक्षरता अभियानासंदर्भात असलेला उल्हास नवभारत साक्षरतेचा विभाग मुख्य आकर्षणाचा भाग ठरत आहे. यावेळी गटशिक्षणाधिकारी सुरेखा तांबट यांनी आपल्या प्रास्ताविकेतून विज्ञान प्रदर्शनाचा मुख्य हेतू सर्वांसमोर मांडत शाश्वत कृषी पद्धत, स्वच्छता व आरोग्य संसाधन व्यवस्थापन याविषयीचे महत्त्व विशद केले. पहिल्याच दिवशी ७०० ते ८०० विद्यार्थ्यांनी सदर प्रदर्शन पाहण्यासाठी सहभाग नोंदविला. दरम्यान, सर्वच मान्यवरांनी विद्यार्थ्यांना अंधश्रद्धेपासून लांब राहून विज्ञानाची कास धरण्याचे आवाहन केले.

विज्ञान शिक्षकांनी विज्ञानाबाबत जनजागृती करुन अंधश्रद्धामुक्त भारत घडविण्याचे आव्हान केले. याप्रसंगी अशोकदादा साबळे विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त सावित्रीबाईंवर एकपात्री नाटिका व आपले मनोगत सादर करत उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

## ममदापूर गावात स्वखर्चातून रस्त्याचे कॉंक्रिटीकरण



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

ममदापूर ग्रामपंचायतीमधील कॉलेज रस्ता ते कृष्णा व्हॅली या रस्त्याचे कॉंक्रिटीकरण रोशन शिंगे यांनी केले. १२७ मीटर लांबीचा रस्ता दहा लाख रुपये खर्चून बनविल्याबद्दल स्थानिक रहिवाशांनी शिंगे यांचा सत्कार केला.

नेरळ विकास प्राधिकरणामध्ये असलेल्या मम दापूर ग्रामपंचायतीमधील बहुसंख्य रस्ते हे कॉंक्रिटीकरणापासून दूर आहेत. त्यातील नवीन वसाहत मधील कृष्णा व्हॅली ते कॉलेज रस्ता या रस्त्यावरून स्थानिक रहिवाशी यांना चालणे देखील कठीण होऊन बसले होते. त्याबद्दल स्थानिक रहिवाशी यांनी ममदापूर ग्रामपंचायतीमधील रोशन शिंगे यांची भेट घेवून सरकारी निधी उपलब्ध करून रस्ता बनविण्याची विनंती केली होती. मात्र शासन दरबारी प्रयत्न करून निवडणूक आचारसंहिता अडथळा येत असल्याने रोशन शिंगे यांनी शासनाचा निधी मिळाला नाही तर आपण स्वतः आर्थिक भार उचलून रस्त्याचे कॉंक्रिटीकरण करू असे आश्वासन दिले होते. रोशन शिंगे यांनी शासनाकडून रस्त्याचे काम मंजूर होईल किंवा नाही. याकडे लक्ष न देता आपल्या स्वतः कडून १० लाख रुपये खर्चून कृष्णा व्हॅली ते कॉलेज रोड हा १२७ मीटर लांबीचा रस्ता कॉंक्रिटीकरण करून घेतला. तब्बल सव्वा तीनशे फूट लांबीचा रस्ता रोशन शिंगे यांनी बनवून दिल्यामुळे स्थानिकांची गैरसोय दूर झाली आहे.

## क्षात्रैक्य समाज अलिबागचा वर्धापनदिन संपन्न

### रौप्य महोत्सवी वर्षाची शानदार सुरुवात!

**। अलिबाग । वार्ताहर ।**

क्षात्रैक्य समाज अलिबागचा वर्धापनदिन कुरुळ येथील भव्य सभागृहात संपन्न झाला. प्रारंभी ग.चि. पाटील यांच्या अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण, शालिनी राणे पुरस्कृत दत्तात्रय राणे दालनाचे उद्घाटन तसेच कृषींभूषण जयवंतराव चौधरी यांच्या गौरव विशेषांकाचे मान्यवरांच्या उपस्थितीत प्रकाशन करण्यात आले.

समाजासाठी कार्य करणाऱ्या डॉ. नीला व देवराव पाटील यांना स्व. कौशल जयवंत चौधरी क्षात्रैक्य जीवन गौरव तर स्व. कृष्णाजी नाईक तसेच स्व. सुमती कृष्णाजी नाईक क्षात्रैक्य भूषण पुरस्काराने अनुक्रमे श्रीकृष्ण सावरकर व सुधीर बळीराम म्हात्रे यांना सन्मानित करण्यात आले. 'स्व भागिरथी वामन नाईक कृषिनिष्ठ पुरस्कार' कार्ले येथील कांदे उत्पादक शेतकरी सतीश म्हात्रे यांना देण्यात आला. याचबरोबर के.डी.पाटील, अभय घरत, महेश कवळे, डॉ. सुचिता पाटील, भूपेंद्र पाटील, संजय गुंजाळ, प्रभाकर नाईक, विलास नाईक, महेश पाटील, कला पाटील, विजय म्हात्रे व इतर अन्य समाजबांधवांसह इयत्ता दहावी आणि बारावीतील विशेष प्रावीण्य मिळवणाऱ्या गुणवंतांचाही सत्कार करण्यात आला. या सोहळ्यासाठी उपस्थितांमध्ये प्रमुख पाहुणे बोरिवलीचे विकसक आंतरराष्ट्रीय शिपिंग कंपनीचे संचालक प्रकाश पाटील, डॉ रामदास माळी, जयवंतराव चौधरी, समाज अध्यक्ष द्वारकानाथ नाईक, माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, मनिषा कोटक, वामन पाटील, सचिव प्रदीप नाईक, श्रीकांत पाटील, रवींद्र वर्तक, मनोज राऊळ, अविनाश राऊळ, श्रीनाथ कवळे, महेश कवळे, प्रकाश पाटील, कार्यकारिणी सदस्य रमेश नाईक, ॲड. समाधान पाटील, ॲड. विलास नाईक, ॲड प्रसाद पाटील उपस्थित होते.

## उलवेत ओपन स्कायखाली प्रदर्शन

**उरण :** सावित्रीबाई फुले, जिजामाता आणि फातिमा शेख यांच्या संयुक्त जयंती निमित्त संविधान अमृत उत्सव समिती, उलवे यांच्या माध्यमातून उलवे शहरात प्रथमच 'ओपन स्कायखाली चित्रपट प्रदर्शन' आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी उलवे मधील विविध क्षेत्रात सामाजिक कार्य करणाऱ्या भगिनींचा सत्कार पनवेल पालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी सचिन घरत, सचिन राजे येरुणकर, सुहास देशमुख आदी उपस्थित होते.

उर्जा मंत्र्यांनी लक्ष देण्याची गरज | मुख्य अभियंत्यांचे प्रकल्पाकडे दुर्लक्ष

# उरणचा वायु विद्युत प्रकल्प बंद पडण्याच्या मार्गावर

**। उरण । वार्ताहर ।**

तालुक्यात गॅसवर चालणारा वायु विद्युत केंद्र प्रकल्प हा एकमेव सरकारी उपक्रम आहे. या प्रकल्पातील सहा संचातून ६७२ मेगावॅट विजेची निर्मिती केली जाऊ शकत असताना मुख्य अभियंत्यांनी वायु विद्युत प्रकल्पातील नादुरुस्त असलेल्या ब्लॉकमधील २ बॉयलर आणि १ स्टीम टरबाईनकडे दुर्लक्ष केल्याने वीजनिर्मिती कमी होत असून वायु विद्युत प्रकल्प बंद पडण्याच्या मार्गावर आहे.



राज्याचे मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेचे गांभीर्य ओळखून सदर प्रकल्पाची पाहणी करून अशा अकार्यक्षम मुख्य अभियंत्यांच्या जागेवर कार्यक्षम मुख्य अभियंत्यांची नियुक्ती करावी अशी मागणी जोर धरू लागली आहे. देशातील पहिले नैसर्गिक वायु पासून वीजनिर्मिती करणारा वायु विद्युत केंद्र प्रकल्प उरण तालुक्यात असून या प्रकल्पाची स्थापना १९८३-८४ साली करण्यात आली आहे. संपूर्ण जर्मन तंत्रज्ञानावर आधारित असलेल्या या वायु विद्युत केंद्राची क्षमता ९५२ मेगावॅट होती. या प्रकल्पातील सहा संचातून ६७२ मेगावॅट विजेची निर्मिती केली जाऊ शकते. काही वर्षांत गॅसपासून वीज निर्मित करणाऱ्या संचाची कार्यक्षमता ही या प्रकल्पात येणाऱ्या मुख्य अभियंत्यांच्या दुर्लक्षितपणामुळे कमी होत चालली आहे. मुख्य अभियत्यांना मेंटेनन्स विभागातील कामगारांकडून गंभीर बाब निर्दर्शनास आणून देऊन ही प्रकल्पातील नादुरुस्त बॉयलर आणि स्टीम टरबाईनच्या कामाकडे वारंवार दुर्लक्ष करत असतील तर या प्रकल्पात स्फोटाची पुनरावृत्ती होण्यास वेळ लागणार नाही अशी भिती रहिवाशी व्यक्त करत आहेत.

> राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांच्याकडे ऊर्जा हे खाते असल्याने त्यांनी उरण तालुक्यातील वायु विद्युत केंद्र प्रकल्पाची पाहणी करून वीज पुरवठ्याअभावी अंधारात गेलेल्या मुंबई शहराची विजेची वाढती गरज लक्षात घेऊन प्रकल्पात जास्त मेगावॅट वीजनिर्मिती कशाप्रकारे करता येईल. यासाठी पुढाकार घ्यावा तसेच वायु विद्युत केंद्र उरण या प्रकल्पाचे अकार्यक्षम मुख्य अभियंत्यांची खाते निहाय चौकशी करावी. - ॲड. सत्यवान भगत
> अध्यक्ष, उरण तालुका मनसे

# नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई

। उरण । वार्ताहर ।

उरण वाहतूक शाखेने रहदारीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या बेशिस्त वाहन चालकांना शिस्त लावण्याचे उद्देशाने तसेच वाहन अपघातांना आळा घालण्यासाठी २०२४ माहे जानेवारी ते डिसेंबर आत्तापर्यंत मोटर वाहन कायद्याखाली एकूण- ४५४६८ वाहन चालकांविरुद्ध विविध कलमाखाली दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या संबंधित वाहन चालकांना एकूण ३,८०,८५,९५०/- इतक्या रकमेचा दंड आकारण्यात आला असून, यापैकी एकूण रू. २७,११,६००/- इतकी दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली आहे. सदर कारवाई अंतर्गत रस्त्यावर चुकीच्या ठिकाणी वाहने पार करून रहदारीस अडथळा निर्माण करणाऱ्या वाहनांवर २०,८१३कारवाई करण्यात आली.

## जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेल्या जमिन मिळकतीपैकी ०-०६-०० आर्स जमिन मिळकत व त्याअंतर्गत असणारी ग्रामपंचायत चेंढरे कडील घर क्र. १६२९/१ व घर क्र. १६२९/२ अशी संपूर्ण मिळकत, श्रीमती सुषमा अविनाश पाटील, श्री. प्रतिक अविनाश पाटील व श्री. अभिलाष अविनाश पाटील, राहणार चेंढरे, ता. अलिबाग यांच्या मालकीची असून, सदरील जमिन मिळकत व त्याअंतर्गत असणाऱ्या घर मिळकतीसह सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझे अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान पूर्ण झाली आहेत. सदर जमिन मिळकत व त्याअंतर्गत असणारी घर मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्रीमती सुषमा अविनाश पाटील, श्री. प्रतिक अविनाश पाटील व श्री. अभिलाष अविनाश पाटील, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असलेबाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती / संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतींमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास खाली नमूद परिशिष्टांतील मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| चेंढरे, ता. अलिबाग, | ८५/३/अ/२ | ०-१६-९०<br>०-०३-१० पो.ख.<br>०-२०-०० एकूण | १-७० |

सदरील जमिन मिळकतीमधील ०-०६-०० आर्स जमिन मिळकत व त्याअंतर्गत असणाऱ्या ग्रामपंचायत चेंढरे कडील घर क्र. १६२९/१, व घर क्र. १६२९/२, ह्या घर मिळकती.

अलिबाग,
दिनांक : ०६/०१/२०२५

सही/-
**(ॲड. संजय म. भगत)**
हिराबाग सोसायटी
ए विंग, टिळक रोड,
अलिबाग-रायगड
खरेदीदाराचे वकील

## जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. महादेव कारभारी पालवे रा. सोकेवाडी, शिराळ, अहमदनगर यांनी खालील वर्णन केलेली जमीन मिळकत तिचे मालक कुलसुम हमीद पटेल रा. खोपोली, जि. रायगड यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे.

**मौजे सावेळे, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकतीचे वर्णन**

| स.नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार (रू.पै.) |
|---|---|---|
| ५/३/ब | ०-१५-२० | २.२५ |

सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असल्याचा दावा विद्यमान मालक यांनी आमच्या अशिलांना केलेला आहे.

तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कोणाचाही, कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, अथवा, गहाण, दान, लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, विक्री करार, खरेदी मेंटेनन्स, मेहेर, वारसाहक्क, लिन, चार्ज, ताबा, वहिवाट, इजमेंट हक्क, बँक लोन, वगैरेबाबत कसलाही हक्क व हितसंबंध अथवा हरकत वा तक्रार असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकतीसंबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली तक्रार अगर हरकत खाली सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आणून द्यावी. सदर मुदतीत तक्रार वा हरकत न आल्यास सदरचा व्यवहार आमचे अशिल पूर्ण करतील व मागाहून येणारी हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. मागाहून येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही हे सर्वांस कळावे.

ठिकाण : कर्जत
दिनांक : ०७/०१/२०२५

सही/-
**ॲड. गीतांजली जी. फुलावरे**
कार्यालय पत्ता : 'मधुतारा' बिल्डींग, कचेरी रोड, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८८८८०४५३७६/८६००३५२९८२

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल श्री. निलेश भगवान कोलेकर यांनी खालील वर्णन केलेली मिळकत तिचे मालक श्री. संजय वाळकु डांगरे यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन मौजे. बांधिवली, ता. कर्जत, जि. रायगड.**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| ६३ | ५ | ०-१६-७०<br>पो.ख. ०-००-५० | २-६३ |

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे

दि. ०७/०१/२०२५.

**ॲड. नरेश रामदास आहीर.**
पत्ता- शॉप नं. १२, शिवगंगा अपार्टमेंट, ब्राम्हणआळी, नेरळ
ता. कर्जत, जि. रायगड.
मो.- ९३२५०६००३७.

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे विहूर, ता. मुरुड, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेली शेतजमिन मिळकत नुरुद्दीन अ. रज्जाक लसणे, राहणार विहूर, ता. मुरूड, जि. रायगड यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान पूर्ण झाली आहेत. सदरील जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील नुरुद्दीन अ. रज्जाक लसणे, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असले बाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट या अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|---|
| विहूर ता. मुरुड | २०८/१ | ०-१७-५० एकूण | ३-९१ |

अलिबाग,
दिनांक : ०४/०१/२०२५

सही/-
**(ॲड. संजय म. भगत )**
हिराबाग सोसायटी,
ए विंग, टिळक रोड,
अलिबाग- रायगड
खरेदीदारांचे वकील

## जाहीर सूचना

आमच्या अशिलांच्या निर्देशांतर्गत याद्वारे सूचना देण्यात येत आहे की,आम्ही खालील विवरणीत केल्यानुसार हक्कांची चौकशी करीत आहोत :

**ए)** खालील **प्रथम अनुसूची** मध्ये विवरणीत जमिनीसंदर्भात (**"प्रथम जमीन"**), त्यावरील संरचनेसमवेत

१. **श्रीमती हनी अनिल हरीष ("हनी")**, भारतीय नागरिक, वय ६१ वर्षे, राहणार १३, सीसीआय चेंबर्स, दिनशॉ वाच्छा मार्ग, मुंबई – ४०० ०२० व

२. **श्री. अनिल हरीष ("अनिल")**, भारतीय नागरिक, वय ७० वर्षे, राहणार १३, सीसीआय चेंबर्स, दिनशॉ वाच्छा मार्ग, मुंबई – ४०० ०२० यांचे हक्क,

**बी)** खालील **दुसऱ्या अनुसूची** मध्ये विवरणीत जमिनीसंदर्भात (**"दुसरी जमीन"**), त्यावरील संरचनेसमवेत,**श्रीमती शोभा हरेश जगतीयानी ("शोभा")**, भारतीय नागरिक, वय ७६ वर्षे, राहणार एल १, पाल्म् स्प्रिंग्ज्, कफ परेड, मुंबई – ४०० ००५ यांचे हक्क,

**सी)** खालील **तिसऱ्या अनुसूची** मध्ये विवरणीत जमिनीसंदर्भात (**"तिसरी जमीन")**, त्यावरील संरचनेसमवेत,अनिल यांचे हक्क,

**डी)** खालील **चवथ्या अनुसूची** मध्ये विवरणीत जमिनीसंदर्भात (**"चवथी जमीन"**), त्यावरील संरचनेसमवेत, हनी यांचे हक्क,

**ई)** खालील **पाचव्या अनुसूची** मध्ये विवरणीत जमिनीसंदर्भात (**"पाचवी जमीन"**), त्यावरील संरचनेसमवेत, अनिल व शोभा यांचे हक्क, अधिकार व हितसंबंध व

**एफ)** पाचवी जमीन व खालील **सहाव्या अनुसूची** मध्ये विवरणीत जमिनीसंदर्भात स्थायी व विना अडथळा मार्ग हक्क व प्रवेशासंदर्भातील अनिल, हनी व शोभा यांचे हक्क, अधिकार व हितसंबंध (**"मार्ग हक्क"**).

प्रथम जमीन, दुसरी जमीन, तिसरी जमीन, चवथी जमीन व पाचवी जमीन यापुढे **"सदर जमीन"** म्हणून उल्लेखित. सदर जमीन, त्यावरील उभ्या असलेल्या संरचनेसमवेत ही यापुढे **"सदर मालमत्ता"** म्हणून उल्लेखित.

कोणीही व्यक्तीचा सदर जमीन वा तिच्या कोणत्याही भागासंदर्भात विक्री, हस्तांतरण, विकास हक्क, विनिमय, अभिहस्तांकन, भाडेकरार, उप–भाडेकरार, वहिवाट, उप–वहिवाट, लिव्ह ॲन्ड लायसेन्स, अनुज्ञप्ती, देखभाल तत्त्वावर, गहाण, उत्तराधिकार, हिस्सा, भेट, इच्छापत्र, धारणाधिकार, प्रभार, देखभाल, सुविधाधिकार, न्यास, इच्छापत्र, मृत्यूपश्चात वारसा, लाभ, ताबा, विमोचन, परित्याग वा अन्य कोणत्याही स्वरूपात कोणताही करार, कागदपत्रे, दस्तावेज, लिखापढी, अभिहस्तांकन करार, विकास करार, सामंजस्य करार, हेतू पत्र, इच्छापत्र, मृत्यूपश्चातवारसा, वारसा, कुटुंब व्यवस्था/तडजोड, दावाखटला, कोणत्याही विधि न्यायालयाचा निवाडा वा न्यायालयीन आदेश, कंत्राटे/करार वा भार वा अन्य कोणत्याही स्वरूपात कोणताही हिस्सा, हक्क, अधिकार, संपत्ती, दावा वा हितसंबंध स्वरूपात कोणताही दावा असल्यास किंवा ते असल्याचा दावा असल्यास त्यांनी त्यासंदर्भात लिखित स्वरूपात अधोहस्ताक्षरितांना कागदोपत्री पुराव्याच्या प्रमाणित प्रतींसमवेत आमचे कार्यालय पत्ता **एन.एम. वाडिया बिल्डिंग, २ रा मजला, १२३, महात्मा गांधी मार्ग, फोर्ट, मुंबई – ४०० ००१** येथे सदर सूचनेच्या तारखेपासून **१४ (चौदा) दिवसांच्या** आत सूचित करावे अन्यथा ते दुर्लक्षित केले जातील व पुढे असा कोणताही दावा, हक्क, अधिकार, संपत्ती वा हितसंबंध अस्तित्वात नाहीत असे समजण्यात येतील आणि ते अधित्यागित वा परित्यागित समजले जातील व आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत.

**वरील संदर्भित प्रथम अनुसूची**
**(प्रथम जमीन)**

पुढील विवरणीत पूर्ण स्वामीत्वाच्या शेतजमिनीचा सर्व तो भाग व भूखंड, एकत्रितरीत्या मोजमापित ७८३० चौरस मीटर व गट क्र. ४००/१ व ४००/२, गाव आक्षी, तालुका अलीबाग व जिल्हा रायगड येथील व सीमा पुढीलप्रमाणे :

उत्तरेस वा त्या दिशेस : गाव आक्षीची गट क्र. ४०१ व ४०७ धारक जमीन
दक्षिणेस वा त्या दिशेस : गाव आक्षीची गट क्र. ३९९ धारक जमीन
पूर्वेस वा त्या दिशेस : रस्ता, व
पश्चिमेस वा त्या दिशेस : गाव आक्षीची गट क्र. ४०१ धारक जमीन.

**वरील संदर्भित दुसरी अनुसूची**
**(दुसरी जमीन)**

पुढील विवरणीत पूर्ण स्वामीत्वाच्या शेतजमिनीचा सर्व तो भाग व भूखंड, मोजमापित १५१६० चौरस मीटर व गट क्र. ३९९ (पार्ट), गाव आक्षी, तालुका अलीबाग व जिल्हा रायगड येथील व सीमा पुढीलप्रमाणे :

उत्तरेस वा त्या दिशेस : गाव आक्षीची गट क्र. ३९९ (पार्ट) धारक जमीन
दक्षिणेस वा त्या दिशेस : गाव आक्षीची गट क्र. ३९६ व ३९७ धारक जमीन
पूर्वेस वा त्या दिशेस : अंशत: गाव आक्षीची गट क्र. ३९९ (पार्ट) धारक जमीन व अंशत: रस्ता, व
पश्चिमेस वा त्या दिशेस : गाव आक्षीची गट क्र. ३९८ धारक जमीन.

**वरील संदर्भित तिसरी अनुसूची**
**(तिसरी जमीन)**

पुढील विवरणीत पूर्ण स्वामीत्वाच्या शेतजमिनीचा सर्व तो भाग व भूखंड, मोजमापित ६२०६ चौरस मीटर व गट क्र. ३९९ (पार्ट), गाव आक्षी, तालुका अलीबाग व जिल्हा रायगड येथील व सीमा पुढीलप्रमाणे :

उत्तरेस वा त्या दिशेस : गाव आक्षीची गट क्र. ४०० (पार्ट) धारक जमीन
दक्षिणेस वा त्या दिशेस : गाव आक्षीची गट क्र. ३९९ (पार्ट) धारक जमीन
पूर्वेस वा त्या दिशेस : गाव आक्षीची गट क्र. ३९९ (पार्ट) धारक जमीन, व
पश्चिमेस वा त्या दिशेस : गाव आक्षीची गट क्र. ३९८ धारक जमीन.

**वरील संदर्भित चवथी अनुसूची**
**(चवथी जमीन)**

पुढील विवरणीत पूर्ण स्वामीत्वाच्या शेतजमिनीचा सर्व तो भाग व भूखंड, मोजमापित ११२४ चौरस मीटर व गट क्र. ३९९ (पार्ट), गाव आक्षी, तालुका अलीबाग व जिल्हा रायगड येथील व सीमा पुढीलप्रमाणे :

उत्तरेस वा त्या दिशेस : गाव आक्षीची गट क्र. ४०० (पार्ट)धारक जमीन
दक्षिणेस वा त्या दिशेस : अंशत: गाव आक्षीची गट क्र. ३९९ (पार्ट) धारक जमीन व अंशत: रस्ता
पूर्वेस वा त्या दिशेस : रस्ता, व
पश्चिमेस वा त्या दिशेस : गाव आक्षीची गट क्र. ३९९ (पार्ट) धारक जमीन.

**वरील संदर्भित पाचवी अनुसूची**
**(पाचवी जमीन)**

पुढील विवरणीत पूर्ण स्वामीत्वाच्या शेतजमिनीचा सर्व तो भाग व भूखंड, मोजमापित ४०४६.८५ चौरस मीटर व गट क्र. ३९८ (पार्ट), गाव आक्षी, तालुका अलीबाग व जिल्हा रायगड येथील व सीमा पुढीलप्रमाणे :

उत्तरेस वा त्या दिशेस : गाव आक्षीची गट क्र. ४०१ धारक जमीन व गट क्र ३९८ (पार्ट) धारक जमिनीचा उर्वरित भाग.
दक्षिणेस वा त्या दिशेस : गाव आक्षीची गट क्र. ३९७ व ५१३ धारक जमीन व गट क्र ३९८ (पार्ट) धारक जमिनीचा उर्वरित भाग.
पूर्वेस वा त्या दिशेस : गाव आक्षीची गट क्र. ३९९ धारक जमीन व गट क्र ३९८ (पार्ट) धारक जमिनीचा उर्वरित भाग.
पश्चिमेस वा त्या दिशेस : अंशत: गाव आक्षीची गट क्र. ५१३ धारक जमीन व अंशत: समुद्रकिनारा.

**वरील संदर्भित सहावी अनुसूची**

पुढील विवरणीत जमिनीचा सर्व तो भाग व भूखंड, मोजमापिता ६२०० चौरस मीटर व गट क्र. ३९८, गाव आक्षी, तालुका अलीबाग व जिल्हा रायगड येथील व सीमा पुढीलप्रमाणे :

उत्तरेस वा त्या दिशेस : गाव आक्षीची गट क्र. ४०१ धारक जमीन
दक्षिणेस वा त्या दिशेस : गाव आक्षीची गट क्र. ३९७ व ५१३ धारक जमीन
पूर्वेस वा त्या दिशेस : गाव आक्षीची गट क्र. ३९९ धारक जमीन, व
पश्चिमेस वा त्या दिशेस : अंशत: गाव आक्षीची गट क्र. ५१३ धारक जमीन व अंशत: समुद्रकिनारा.

**दिनांक : ०७.०१.२०२५**

**वाडिया घांदी आणि कंपनी करिता**
**(नितेश राणावत)**
**भागीदार**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटिसीने कळविण्यात येते की, मौजे वावंजे, तालुका पनवेल, जिल्हा - रायगड येथील खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही श्री अशोक नथू पाटील, रा- वावंजे, ता. पनवेल, जि. रायगड यांच्या मालकीची असून आमचे अशिल हे खाली वर्णन केलेली जमीन नोंदणीकृत खरेदीखताने मालकी हक्काने कायमस्वरूपी विकत घेण्याचा विचार करीत आहेत.

**वरीलप्रमाणे परीशिष्ट**
**मौजे वावंजे, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड**

| गट नं. व उपविभाग क्र | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| ८२/२/अ | सातबारा वरील एकुण क्षेत्र ०.५७.५४ पैकी माझे मालकीचे विक्री क्षेत्र ०.०३.१८ एवढे | ०.४१ |

सर्व तमाम जनतेस कळविण्यात येते की, वरील परिशिष्टातील वर्णन केलेल्या मिळकतीमधील हक्क, हितसंबंध व अधिकार आणि/किंवा इतर फायदे याबाबत ज्या कुणाची समझोता करार, साठेकरार, विकसन करार, फरोक्त, विक्री, विनिमय, गहाण, बोजा, दान, पोटगी, चार्ज, वारसा हक्क, ट्रस्ट, न्यास, ताबा, कुळ, वहिवाट, भाडेपट्टा, सबलीज, अंडरलीज, लियन किंवा इतर बाबींद्वारे हरकत, तक्रार, दावा, हितसंबंध असेल तर त्यांनी तशा प्रकारची हरकत, तक्रार, दावा, हितसंबंध ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून खालील सही करणार यांच्या खालील पत्त्यावर १५ (पंधरा) दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह सादर करावी. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तकार दावा वगैरे न आल्यास वरील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकती या निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत तक्रार, दावा, हितसंबंध नाही असे समजून माझे अशिल वरील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

दि. ०४/०१/२०२५

**वकीलाची सही**
**किशोर धाकड**
ॲडव्होकेट हायकोर्ट
ऑफिस नं. २१, म्युनिसिपल कॉम्प्लेक्स,
वसुदेव बळवंत फडके चौकाजवळ
नाट्यगृह, पनवेल, ता. पनवेल ४१०२०६
Email-kishordhakad@yahoo.co.in
मो.नं. ९८६७०५१३३०

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसने असे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तिचे मालक १. सविता रामेश्वर सिंग, २. पुजा अशोककुमार सिंग, तसेच सौ. श्वेता अशोकुमार सिंग सर्व रा. नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड यांचेकडुन कायमची खरेदी करणेचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे चोची, तालुका कर्जत, जिल्हा रायगड**

| सर्वे नं. हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर. पॉ.) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|
| ४४/४ | ०-१९-५० | ०=१४ |
| ४४/५ | ०-०३-३० | ०=०३ |
| १. सविता रामेश्वर सिंग, २. पुजा अशोककुमार सिंग यांचे सामाईक मालकीची | | |
| ४३/६ | ०-०६-६० | ०=०६ |
| सौ. श्वेता अशोकुमार सिंग यांचे मालकीची | | |

सदर मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजुन वरील मिळकतींचा व्यवहार पुर्ण केला जाईल मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे अशिल जबाबदार राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

दि. ७/१/२०२५

**ॲड. कैलास गणपत मोरे**
बी.एल.एस, एलएल. बी
प्रभात अपार्टमेंट, रूम नं. ४, दुसरा मजला,
सुनिल चिक्कीजवळ, ता. कर्जत, जि. रायगड
मो. नं. ९९६०८३८१६४/९०२८५०८४९६

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे वरसोली, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या भातशेती मिळकतीचे विद्यमान मालक श्री. श्रीकांत बाबासाहेब व्होरकाटे, रा. शतायु न्युरो साइकिएट्रिक सेंटर, शिवसागर रेस्टॉरन्टच्यामागे, उबले नगर, वाघोली, जि. पुणे ४१२२०७ यांच्या खुद्द मालकीची व त्यांचे कब्जातील खालील वर्णन केलेली भातशेती मिळकत आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | पोट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| वरसोली ता. अलिबाग | २९/२ | - | ०-२३-०० | ५.१५ |
| | | पो.ख. | ०-०२-५० | |
| | | एकूण | ०-२५-५० | |

या मिळकतीपैकी ०-०२-४८ हे. आर., आकार रु. ०.५६ पैसे या मिळकतीबाबत

तरी सदरहू मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, ताबा कब्जा, भाडेपट्टा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकतीबाबत कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे गृहीत धरुन माझे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : ०७/०१/२०२५

सही /-
**ॲड. विवेक रमेश साळवी**
शॉप नं.५, दुय्यम निबंधक कार्यालयासमोर,
अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड.

सही/-
श्री. श्रीकांत बाबासाहेब व्होरकाटे

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसने असे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तिचे मालक अस्पी बुरजोर छापघर, रा. फ्लॅट नं. ८, बिल्डींग नं. १०, टाटा कॉलोनी, कावसजी जहांगिर शाळेच्या जवळ, ताडदेव मुंबई, तुळसीवाडी मुंबई-४०००३४ यांचेकडुन कायमची खरेदी करणेचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे गौरकामथ, तालुका कर्जत, जिल्हा रायगड**

| सर्वे नं. हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|
| ८४/१ इ | १-२०-०० | ०=१० |

सदर मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पुर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे अशिल जबाबदार राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

दि.७/१/२०२५

**ॲड. कैलास गणपत मोरे**
बी.एल.एस, एलएल.बी
प्रभात अपार्टमेंट, रूम नं. ४,
दुसरा मजला, सुनिल चिक्कीजवळ,
ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं. ९९६०८३८१६४/९०२८५०८४९६

## जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिल श्री. सुनिल गोविंद कटारिया, मोबाईल नं. ९७६९३४१७७१, यांनी खालील वर्णन केलेली मिळकत तिचे मालक श्री. संजय बाबाजी कदम यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन मौजे-बार्णे, ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| १ | ८ | ०-०५-०० | ०-५८ |

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहिवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. कळावे.

दि. ०७/०१/२०२५

**ॲड. नरेश रामदास आहीर**
पत्ता : शॉप नं. १२, शिवगंगा
अपार्टमेंट, ब्राह्मणआळी, नेरळ
ता. कर्जत, जि. रायगड
मो.- ९३२५०६००३७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, श्री. रामचंद्र विठोबा पवार रा.मायनी (शेडाशी) ता.पेण, जि.रायगड हे येथील रहिवासी असून यांच्या मालकीची मिळकत मी स्वत: कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे, त्याचे वर्णन खालीलप्रमाणे...

| गाव | मालक | सर्व्हे नं/ गट नं. | हिस्सा नं. | एकूण क्षेत्र हे.आर. | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|---|
| शेडाशी कातकरीवाडी | रामचन्द्र विठोबा पवार | १८ | १३ | ०.१२.०० | ०.०७ |

वरील मिळकत मी स्वतः श्री. मिलिंद वामनराव चव्हाण ०.१२.०० हे.आर. एवढी मिळकत खरेदी करणार आहे.

तरी वर वर्णन केलेली जमिन मिळकत मी स्वतः कायमस्वरूपी विकत घेत आहे. तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही कुळ, वहीवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, खरेदीखत, गहाणखत, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रातील दान, जप्ती, लीज अथवा अन्य प्रकारची कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसाच्या आत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी येवून माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास मी स्वत: जमिन मिळकतीचे रजिस्टर्ड खरेदीखत करीन व मागाहुन येणारी कोणतीही हरकत माझ्यावर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

पेण
दि. ०७/०१/२०२५

**मिलिंद वामनराव चव्हाण**
रा.रानसई, ता. खालापूर, जि. रायगड
मो. ८०१०३८६५१५/९८२३३९७५३८

## जाहीर नोटीस

पेण येथील मे. तहसीलदार तथा न्यायदंडाधिकारी सो. यांचे कोर्टात

श्री. सिध्देश्वर अनंत म्हात्रे — अर्जदार
रा. कोंढरीपाडा, करंजा ता. उरण जि. रायगड

विरुद्ध

ग्रुप ग्रामपंचायत दिव — सामनेवाला

सर्व तमाम जनतेस कळविण्यांत येते की, अर्जदार यांचा आजोबांचा मृत्यु मौजे दिव, ता.पेण जि. रायगड येथे दि. २३/०१/१९८३ रोजी झालेला असल्याने त्यांच्या मृत्यु तारखेची नोंद ग्रुप ग्रामपंचायत दिव यांचे कार्यालयांतील मृत्यु नोंद रजिस्टरला नोंद करणेबाबत सदरचा अर्ज कोर्टात दाखल केलेला आहे.

तरी सदर अर्जास कोणाचीही हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाचे मुदतीत आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह मे. कोर्टात दाखल काराव्यात. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांचा अर्ज मागणी प्रमाणे मंजूर करण्याचे आदेश पारित करण्यात येतील व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही. यांची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस माझ्या सही शिक्यानिशी आज दि. ७/०१/२०२५ रोजी सही ने दिली.

**(तानाजी शेजाळ)**
तहसिलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी पेण

## महाराष्ट्र शासन

**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**
Email :- mahad.ee@mahapwd.gov.inPh.No. (०२१४५) २२२१६७
**निविदा सूचना क्रमांक ८६ सन २०२४-२०२५**

कार्यकारी अभियंता, महाड (सा. बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन - ४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५ - २२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडुन खालील प्रमाणे बी - १ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा. बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड यांनी राखून ठेवला आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | मौजे म्हसळा ता. म्हसळा तालुक्यातील संभाव्यदरडग्रस्त आमशेत गावामध्ये संरक्षण भिंत बांधणे. जि. रायगड | १,४४,३३,२८४/- | १,४५,०००/- | ११८०/- | १२ महिने | वर्ग चार |
| २ | मौजे म्हसळा ता. म्हसळा तालुक्यातील संभाव्यदरडग्रस्त वावे शेख मोहल्ला गावामध्ये संरक्षण भिंत बांधणे, जि. रायगड | १,३४,८२,९९४/- | १,३५,०००/- | ११८०/- | १२ महिने | वर्ग चार |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक ०६.०१.२०२५ (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक २०.०१.२०२५ वेळ १८.०० वाजेपर्यंत |
| २ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | अधीक्षक अभियंता, रायगड सा.बां. मंडळ, कोकणभवन, नवी मुंबई यांचे कार्यालयात दिनांक २२.०१.२०२५ वेळ १२.०० वाजता |

टिप :- परिपूर्ण निविदा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळांवर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धीपत्रके तसेच इतर काही दुरूस्त्या, शर्ती व अटी यावरील संकेत स्थळांवरच पाहता येतील.

जा.क्र.मवि/लेशा/निविदा/५९
दिनांक : ०३.०१.२०२५

कार्यकारी अभियंता
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**

# निवडक



## विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम

**कोलाड :** रोहा तालुक्यातील मंजुळा एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटीचे खांब येथील ज्ञानांकुर इंग्रजी माध्यम शाळेच्या विद्यार्थ्यांचे वार्षिक विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम शुक्रवारी (दि.३) मोठ्या उत्साहात पार पडले. यावेळी, प्रमूख पाहुणे संजीव सुर्यवंशी, डॉ. मंगेश सानप, सरपंच रविंद्र मरवडे, पांडूरंग गोसावी, धनवी आदींनी उत्तम मोलाचे मार्गदर्शन केले. तर, याप्रसंगी शाळेतील विद्यार्थी वर्गाने विविध कला सादर करत उपस्थितांची मने जिंकली. या कार्यक्रमाप्रसंगी सूत्रसंचालन रुपाली मरवडे, आर्या लोखंडे यांनी केले. तर, प्रास्ताविक रवींद्र लोखंडे यांनी केले. यावेळी, इंटर नॅशनल लायन्स क्लब ऑफ डिस्ट्रिक्ट ए-४ चे उपजिल्हा प्रांतपाल संजीव सूर्यवंशी व त्यांच्या पत्नी, डॉ. मंगेश सानप, रविंद्र मरवडे, सुरज कचरे, डॉ. श्यामभाऊ लोखंडे, राजेंदर कोप्पू, सुधीर लोखंडे, कृष्णकांत धनवी, उदय डवले, ॲड. अभिजित गायकवाड, रामचंद्र लढे, तेजश्री भोईर, संतोष महाडिक, विनायक गोसावी, पांडुरंग गोसावी, पूजा गोसावी, राजेश जाधव, शशिकांत जंगम, दिलीप मोहिते, तुकाराम भोईर, हरिश्चंद्र लोखंडे, मुख्याध्यापिका रिया लोखंडे यांच्यासह शिक्षवृंद, विद्यार्थी, शिक्षक व पालक वर्ग उपस्थीत होते.




## डॉक्टरांची क्रिकेट स्पर्धा संपन्न

**पनवेल :** पनवेल डॉक्टर जनरल प्रॅक्टिशनर्स असो.च्यावतीने परिसरातील डॉक्टरांसाठी रविवारी (दि.५) पनवेल जवळील महात्मा फुले महाविद्यालयात क्रिकेट सामन्यांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये खारघर फिनिक्स संघाने तळोजा टायगर्स या संघावर मात करत विजयश्री खेचून आणली. यावेळी मालिकावीर म्हणून डॉ. क्षितिज, उत्कृष्ट फलंदाज डॉ. अनिकेत भोईर, उत्कृष्ट गोलंदाज डॉ. नबिल, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक डॉ. असीम पटेल आदींची निवड करण्यात आली. पनवेल डॉक्टर जनरल प्रॅक्टिशनर असो. चा स्पर्धा ४ व ५ जानेवारी रोजी मोठ्या उत्साहात पार पाडल्या. शनिवारी (दि.४) सर्व डॉक्टरांसाठी कॅरम, बुद्धिबळ व बॅडमिंटन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. दुसऱ्या दिवशी डॉक्टरांसाठी पनवेल डॉक्टर्स प्रीमियर लीग या क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यात प्रामुख्याने खारघर फीनिक्स, उलवे युनायटेड, खारघर वॉरियर, सिद्धी खारघर, नेरूळ चॅम्पियन्स, तळोजा टायगर्स, पनवेल प्राईड, कर्नाळा वॉरियर्स, कामोठे किंग, पीडीजीपी टायगर्स, करंजडे वॉरियर्स, पनवेल वॉरियर्स आदींनी भाग घेतला होता.



## रांगोळी स्पर्धेत माधवी पाटील विजेती

**श्रीगाव :** अलिबाग तालुक्यातील पेझारी येथील विठ्ठल रूख्मीणी व भैरवनाथ मंदिरात टी हिरोज तर्फे रविवारी (दि.५) तालुकास्तरीय रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत प्रथम क्रमांक माधवी पाटील हिने पटकावला असून रोख रक्कम ४ हजार रु. देऊन गौरविण्यात आले. तसेच, द्वितीय क्रमांक श्रेयसी कोळी हिला रोख रक्कम ३ हजार रु., तृतीय क्रमांक अमित म्हात्रेला रोख रक्कम २ हजार रु. तर, चतुर्थ क्रमांक पारस पाटील, पंचम क्रमांक तन्वी पाटील यांना प्रत्येकी रोख रक्कम १ हजार रुपये व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. परीक्षक म्हणून अभय झेमसे, डॉ. युगेश पाटील, राजेंद्र पाटील, संतोष पाटील व ॲड. दामोदर पाटील यांनी काम पाहीले. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी टी हिरोजचे रोहीत पाटील, मंदार म्हात्रे, तनीष्का पाटील, आस्था पाटील, गायत्री पाटील, दीप पाटील, साई पाटील, हर्षद म्हात्रे, देवांश पाटील, स्वराज म्हात्रे, प्रज्वल म्हात्रे, अनय पाटील, अर्णव पाटील, निशाद म्हात्रे, सोहम पाटील यांनी अथक परिश्रम केले.



## वर्चस्व क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन

**कोलाड :** कोलाड-गोवे येथील श्रीमती गीता द. तटकरे तंत्रनिकेत शाळेत शनिवारी (दि.४) वर्चस्व क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटन मोठ्या उत्साहात पार पडले. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना डॉ अशोक जाधव, संस्थेचे ट्रस्टी संदीप तटकरे, रजिस्ट्रार अजित तेलंगे, प्राचार्य विपुल मसाल यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या वर्चस्व क्रीडा स्पर्धेत टेक्नीकल इव्हेंट यासह मैदानी खेळामध्ये क्रिकेट, कबड्डी, खो-खो, धावणे, गोळाफेक, थाळीफेक, भालाफेक, बॅटमिंटन आदि खेळ सादर होणार आहेत. यात सर्व शाखेच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला असून या स्पर्धा १८ जानेवारीपर्यत सुरू राहणार आहेत. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अशोक जाधव, यांच्यासह वानखेडे, संदीप तटकरे, अजित तेलंगे, विपुल मसाल, संजय हजारे, देशमुख, तसेच तटकरे ग्रुप ऑफ इंस्टीट्यूटचे सर्व विभाग प्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व कर्मचारी वृंद उपस्थित होते.

### आयर्लंडविरूद्धच्या मालिकेसाठी घोषणा

# स्मृती मानधनाकडे महिला संघाची धुरा

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

**भारतीय महिला क्रिकेट संघाचा आगमी एकदिवसीय मालिकेसाठी बीसीसीआयच्या निवड समितीने घोषणा केली आहे. भारतीय महिला संघाला आगामी काळात आयर्लंड महिला संघाविरुद्ध तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका खेळायची आहे. ही मालिका भारतातच होणार असून भारताच्या संघात १५ खेळाडूंना स्थान देण्यात आले आहे. तसेच, भारतीय महिला संघाची धुरा स्मृती मानधनावर सोपविण्यात आली आहे.**



भारत आणि आयर्लंड यांच्यातील एकदिवसीय मालिका १० जानेवारीपासून सुरू होणार आहे. या मालिकेसाठी भारतीय संघाची नियमित कर्णधार हरमनप्रीत कौर हिला विश्रांती देण्यात आली आहे. तिच्यासह गोलंदाज रेणुका सिंग ठाकूर हिला देखील विश्रांती देण्यात आली आहे. त्यामुळे या मालिकेत भारतीय संघाचे कर्णधारपद स्मृती मानधनाकडे सोपविण्यात आले आहे. या व्यतिरिक्त भारताच्या संघात फार मोठे बदल झालेले नाहीत.

भारतीय महिला संघाने नुकतेच मायदेशात वेस्ट इंडिज संघाला टी-२० आणि एकदिवसीय मालिकेत पराभूत केले आहे. त्यामुळे भारतीय संघ सध्या चांगल्या फॉर्ममध्ये आहे. स्मृती मानधनाचीही कामगिरी चांगली झाली असून तिच्याकडूनही या मालिकेत चांगल्या कामगिरीची अपेक्षा असणार आहे. मानधनाने वेस्ट इंडिजविरुद्ध टी-२० मालिकेतही हरमनप्रीतला दुखापत असताना भारतीय संघाचे नेतृत्व केले होते. आयर्लंडविरुद्धच्या मालिकेत तितास साधू, प्रिया मिश्रा, सायमा ठाकोर, तनुजा कन्वर यांच्यावर रेणूकाच्या अनुपस्थितीत गोलंदाजीची जबाबदारी असणार आहे. तसेच, फलंदाजी फळीत स्मृती मानधनासह जेमिमाह रोड्रिग्स, हर्लिन देओल या अनुभवी खेळाडूंचा समावेश आहे. तर, दिप्ती शर्मावर अष्टपैलू खेळाडू म्हणून मोठी जबाबदारी असेल. मात्र, यावेळी देखील शफाली वर्माला या मालिकेसाठी संघात संधी मिळालेली नाही.

आयर्लंड संघाविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत भारतीय महिला संघाला आयर्लंडविरुद्ध अनुक्रमे १०, १२ आणि १५ जानेवारी रोजी एकदिवसीय सामने खेळायचे आहेत. हे सर्व सामने राजकोटमधील निरंजन शाह स्टेडियमवर होणार आहेत. हे तिन्ही सामने भारतीय प्रमाणवेळेनुसार सकाळी ११ वाजता सुरू होणार आहेत.

### एकदिवसीय मालिकेसाठी भारतीय संघ

**स्मृती मानधना (कर्णधार), दीप्ती शर्मा (उपकर्णधार), प्रतिका रावल, हर्लिन देओल, जेमिमा रॉड्रिग्स, उमा चेत्री (यष्टीरक्षक), ऋचा घोष (यष्टीरक्षक), तेजल हसबनीस, राघवी बिस्त, मिन्नू मणी, प्रिया मिश्रा, तनुजा कन्वर, तितास साधू, सायमा ठाकोर, सायली सातघरे.**

# रासळ कबड्डी स्पर्धेत आपटवणे विजयी

**| पाली/गोमाशी | वार्ताहर |**



जय हनुमान क्रीडा मंडळ रासळ यांच्यावतीने रायगड जिल्हा कबड्डी व सुधागड तालुका कबड्डी असो.च्या मान्यतेने रविवारी (दि.५) कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत तालुक्यातील ३२ नामवंत संघाने आपला प्रवेश नोंदविला होता.

स्पर्धेतील अंतिम लढत ओम कालभैरव आपटवणे आणि वरदायिनी राबगाव या संघात झाली. या स्पर्धेतील ओम कालभैरव आपटवणे हा प्रथम क्रमांकाच मानकरी ठरला असूल रोख रक्कम १५ हजार रु. व आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले. तर, वरदायिनी राबगाव या संघाला द्वितीय क्रमांकांवर समाधान मानावे लागले असून संघाला रोख रक्कम १० हजार रु. व आकर्षक चषक देण्यात आले. तसेच, या स्पर्धेतील तृतीय क्रमांकांचा मानकरी नाथ भैरव झाप तर चतुर्थ क्रमांकाचा मानकरी रणधुरंधर पाली हे संघ ठरले असून दोन्ही संघांना प्रत्येकी ५ हजार रु. व आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले.

या स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू प्रतीक बामणे, उत्कृष्ट चढाई जयेश भोईर, तर उत्कृष्ट पक्कड कल्पेश देशमुख, पब्लिक हिरो दिपेश लहाने या खेळाडूंना मंडळाच्यावतीने आकर्षक बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात आले.



# आर.आर. अकॅडमीचे यश

**| खरोशी | प्रतिनिधी |**

नवी मुंबईतील घणसोली येथील न्यु बॉम्बे सिटि स्कूल येथे क्लब बॉक्सिंग चॅम्पियनशिप स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत पेण येथील आर.आर. म्हात्रे बॉक्सिंग अकॅडमीच्या खेळाडूंनी रविंद्र म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली ४ सुवर्ण व ५ रौप्यपदक पटकाऊन स्पर्धा यशस्वी केली. या स्पर्धेत सदफ पठाण, आर्यन म्हात्रे, स्मित म्हात्रे, अशरफ अली यांनी सुवर्णपदक, तर अऐशा बेगम, अनुज रणपिसे, आयुष पाटील, निशिगंध पाटील व संस्कार यादव यांनी रौप्यपदक पटकावले आहे. या स्पर्धेत विजयी झालेल्या खेळाडूंनचे युनायटेड चे अध्यक्ष डॉ. मंदार पनवेलकर यांनी कैतुक व अभिनंदन केले आहे. या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी शर्मिला पवार, तसेच बॉक्सिंग प्रशिक्षक इमरान खान व न्यु बॉम्बे सिटी स्कूलच्या सर्व मॅनेजमेंट कमिटीने मोलाचे सहकार्य केले.

# झिम्बाब्वेच्या विजयात राशिदचा खोडा

**| हरारे | वृत्तसंस्था |**

झिम्बाब्वे विरूद्ध अफगाणिस्तान यांच्यातील दुसऱ्या कसोटी सामन्यात अफगाणिस्तानने बाजी मारली आहे. पहिल्या डावात झिम्बाब्वेने आघाडी घेतली होती. सामना जिंकून झिम्बाब्वेला इतिहास रचण्याची संधी निर्माण झाली होती. परंतु, दुसऱ्या डावात अफगाणिस्तानने मोठी धावसंख्या उभारत आघाडी मिळवली. अंतिम डावात फिरकीपटू राशिद खानने झिम्बाब्वेचा निम्मा संघ तंबूत पाठवला व सामना जिंकत अफगाणिस्तानने झिम्बाब्ववर आपले वर्चस्व कायम राखले.

पहिल्या डावानंतर झिम्बाब्वेने ८६ धावांची आघाडी घेतली होती. परंतु, दुसऱ्या डावात रहमत शाह व इस्मत अलाम यांच्या शतकी खेळीच्या मदतीने अफगाणिस्तानने ३६३ धावा उभारत झिम्बाब्वेची आघाडी मोडली व सामन्यात २७७ धावांची आघाडी घेतली. झिम्बाब्वेला विजयासाठी २७८ धावांची आवश्यकता होती. परंतु, झिम्बाब्वे आणि विजयाच्यामध्ये फिरकीपटू राशिद खान उभा होता. राशिदने ७ बळी मिळवत झिम्बाब्वेचा निम्मा संघ तंबूत पाठवला. त्याने संपूर्ण सामन्यात एकूण ११ बळी घेतले आहेत. दुसऱ्या डावात कर्णधाराव्यतिरिक्त झिम्बाब्वेच्या कोणत्याच फलंदाजाने मोठी खेळी केली नाही.

## ५२ वर्षीय महिलेची ऐतिहासिक कामगिरी

**आंध्र प्रदेश :** काकीनाडा जिह्यातील गोली श्यामला या ५२



वर्षीय महिलेने पोहत १५० किमी अंतर पार करून ऐतिहासिक कामगिरी केली आहे. तिने विशाखापट्टणम ते काकीनाडापर्यंत समुद्रातून पोहत प्रवास केला आहे. २८ डिसेंबर पासून सुरू झालेला गोली शामला हिचा प्रवास शुक्रवारी (दि.३) संपला. यादरम्यान, श्यामला हिने प्रतिदिन ३० किमी अंतर पूर्ण केले आहे. याआधीही तिने पोहण्याच्या बाबतीत अनेक विक्रम नोंदविले आहेत. दरम्यान, यापूर्वी रामसेतु, श्रीलंका आणि लक्षद्वीपच्या समुद्रात डुबकी मारून तिने सर्कांनाच अवाक् केले आहे.

# अलिबाग येथे कराटे बेल्ट परीक्षा संपन्न



**| अलिबाग | वार्ताहर |**

कराटे बेल्ट परीक्षा अलिबाग येथे रविवारी (दि.५) संपन्न झाली. या स्पर्धेत २४ मुली आणि १३ मुलांनी सहभाग घेतला होता. या परीक्षांमध्ये कराटे कता, कराटे फाईट तसेच सर्व बेसिक कराटे किक, डक वॉक, मनी वॉक, क्योटस सीट, अप्स फिजिकल हे सर्व प्रकार विद्यार्थ्यांनी करून दाखवले. यावेळी, प्रमुख पाहुणे क्राईम ब्रँच असिस्टंट इन्स्पेक्टर ए.डी. नदाफ तसेच कराटे जिल्हा संघटनेचे अध्यक्ष संतोष कवळे, रायगड पोलीस नवनाथ गावडे, भारत खांडे, हरेश पाटील, रायगड पोलीस विश्वजीत पाटील यांच्याहस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र आणि बेल्ट देण्यात आले.

यावेळी, नदाफ यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, विद्यार्थ्यांनी शालेय स्पर्धा तसेच ऑलिंपिक स्पर्धेत जास्तीत जास्त सहभागी होऊन आपले कला, कौशल्य दाखवून सुवर्णपदक पर्यंत पोहोचावे. त्यांनी गावासह देशाचे नाव मोठे करावे. सर्वांनी मैदानी खेळ खेळा. दिवसातून दोन ते तीनवेळा अंगातून घाम निघेल एवढा सराव करा, म्हणजे आपले शरीर सुदृढ बनेल, निरोगी रहील आणि आपली बुद्धिमत्ता देखील वाढेल, असे देखील नदाफ यांनी सांगितले.

### कुमार-कुमारी राष्ट्रीय कबड्डी स्पर्धा | पुणे ग्रामीणच्या खेळाडूंवर नेतृत्वाची धुरा

# महाराष्ट्राचे दोन्ही कबड्डी संघ जाहीर

**| मुंबई | प्रतिनिधी |**

**भारतीय हौशी कबड्डी महासंघाच्या मान्यतेने व उत्तर प्रदेश राज्य कबड्डी असो. च्या विद्यमाने होणाऱ्या ५०व्या कुमार/कुमारी गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेकरीता महाराष्ट्राने दोन्ही संघ जाहीर केले आहेत. या स्पर्धेत पुणे ग्रामीणचे वैभवी जाधव व अनुज गावडे या दोन्ही खेळाडूंकडे अनुक्रमे कुमारी व कुमार गटाचे नेतृत्व सोपविण्यात आले आहे. तसेच, कुमार गटात रायगड जिल्ह्यातील राज मोरेचा देखील समावेश झाला आहे. नुकतेच सांगली येथे झालेल्या राज्य अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धेतून हे संघ निवडण्यात आले आहेत.**





सांगली येथील सांगलवाडी मैदानावर नुकत्याच झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेत रोहा येथील राज ज्ञानेश्वर मोरे याने रागडचे नेतृत्व स्विकारले होते. रायगडचा कर्णधार म्हणून कामगिरी बजावत असताना राजने उत्कृष्ठ चढाईतून पाचवेळा संघ निवडून देण्यात सिंहाचा वाटा उचलला आहे. तसेच, राज मोरे हा जय बजरंग रोहा कुमार गट कबड्डी संघाचा अष्टपैलू खेळाडू म्हणून कामगिरी बजावत आहे. त्याची महाराष्ट्राच्या कुमार गटात निवड झाल्याबद्दल सर्व स्तरातून कौतुक होत आहे. तसेच, सांगलीतील स्पर्धेत पुणे ग्रामिणच्या कुमार व कुमारी गटातील अनुज व वैभवी यांनी देखील संघाचे कर्णधार म्हणून महत्वाची भुमिका बजावली आहे. त्यामुळे या दोघांच्या खांद्यावर महाराष्ट्रच्या नेतृत्वाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. ही राष्ट्रीय कबड्डी स्पर्धा दि. ८ ते ११ जानेवारी या कालावधीत उत्तर प्रदेशातील हरिद्वार येथील रोशनबाद बंदिस्त क्रीडा संकुल येथे खेळविण्यात येणार आहेत. त्यासाठी म हाराष्ट्राचे निवडलेले हे दोन्ही संघ सोमवारी (दि.६) स्पर्धेकरीता रवाना झाले आहेत.

**कुमारी गट :** **वैभवी जाधव (संघनायिका), साक्षी रावडे, प्रतिक्षा लांडगे, सृष्टी मोरे (सर्व पुणे ग्रामीण), साक्षी गायकवाड, रेखा राठोड, भूमिका गोरे (सर्व पिंपरी चिंचवड), श्रेया गावंड (ठाणे), वैष्णवी काळे (अहमदनगर), मोनिका पवार (जालना), आरती चव्हाण (परभणी), कादंबरी पेडणेकर (मुंबई शहर पूर्व), प्रशिक्षक- महेंद्र माने, व्यवस्थापिका- निकिता लाड.**

**कुमारी गट :** **अनुज गावडे (संघनायक), महेश मोने, जयंत काळे (सर्व पुणे ग्रामीण), आफताब मंसुरे, रोहन तुपारे, आदित्य पिलाणे (सर्व ठाणे शहर), विजय तारे (परभणी), समर्थ देशमुख (कोल्हापूर), असीम शेख (नंदुरबार), आदित्य येसगुडे (सांगली), ओम् कुदळे (मुंबई उपनगर पश्चिम), राज मोरे (रायगड). प्रशिक्षक- आयुब पठाण, व्यवस्थापक- वैभव पाटील.**

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)